म. ग्रं. सं. ठाणे.
विषय निबंध
सं. क्र. ३१९८

सम्यक् क्रांती हमारा संकल्प



DALIT PANTHER OF INDIA

REFBK-0026732

दलित पँथर

शरणकुमार लिंबाळे

मराठी ग्रंथ संग्रहालय, दादर.

सूचना :—खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक/मासिक परत करावे, तसे न केल्यास घटना नियम क्र. ५ (८) नुसार प्रतिदिनी ५ पैसे जादा वर्गणी भरावी लागले.

5 DEC 1992

20 JAN 1993

1 SEP 1993

1 SEP 1993

(क्र. मा. पहा)
१००००–११–८९

संदर्भ
निबंध
३४६
२६३२
२२१०।९२

ठाणे

महाराष्ट्र ग्रंथ संग्रहालय ठाणे
निबंध
वर्ग क्र. ३४६
२६३२
२२१०।९२
संदर्भ ग्रंथ खाजा स्थळ

भारतीय दलित पँथर

शरणकुमार लिंबाळे

REFBK-0026732

प्रचार प्रकाशन
कोल्हापूर

प्रकाशन क्रमांक / १८१

प्रकाशक
सौ. नंदिनी तु. गवळी
५१३ ब प्लॉट नं. ४/अ
नलवडे कॉलनी
सम्राटनगर, सागरमाळ
कोल्हापूर – ४१६००८
फोन – २०६६८

© सौ. कुसुम लिंबाळे
यशवंतराव चव्हाण
महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ
नाशिक ४२२ ००५

प्रमुख वितरक
मे. सिद्धार्थ बुक सेंटर
१३ ई, महालक्ष्मी चेंबर्स
सेंट्रल एस. टी. स्टॅण्डसमोर
कोल्हापूर ४१६ ००१

मुद्रक
हरीश विनायक चौधरी
अंजीश कर्मशियल आर्ट प्रिंटर्स
६६९ ई, शाहूपुरी ३ री गल्ली
कोल्हापूर ४१६००१

मुखपृष्ठ
पोरे ब्रदर्स
सोलापूर

ब्लॉक्स
उदय प्रोसेस, कोल्हापूर

प्रथम आवृत्ती
जून, १९९२

मूल्य रु. ६० फक्त

भारतीय दलित पँथर	**Bharatiya Dalit Panther**
शरणकुमार लिंबाळे	**Sharankumar Limbale**

ॐ गं गणपतये नमः

डॉ. जनार्दन वाघमारे
आणि
डॉ. भास्कर भोळे
यांना ...

काही प्रश्नचिन्हं

भारत माझा देश आहे ? सारे भारतीय माझे बांधव आहेत ?

माझ्या देशावर माझे प्रेम आहे ? माझ्या देशातल्या समृद्ध आणि विविधतेने नटलेल्या परंपरांचा मला अभिमान आहे ? त्या परंपरांचा पाईक होण्याची पात्रता माझ्या अंगी यावी, म्हणून मी सदैव प्रयत्न करीन ?

मी माझ्या पालकांचा, गुरुजनांचा आणि वडीलधाऱ्या माणसांचा मान ठेवीन आणि प्रत्येकाशी सौजन्याने वागेन ?

माझा देश आणि माझे देशबांधव यांच्याशी निष्ठा राखण्याची मी प्रतिज्ञा करीत आहे ? त्यांचे कल्याण आणि त्यांची समृद्धी ह्यातच माझे सौख्य सामावले आहे ?

रमेशभाई खंडागळे
एन / ७ / सी १ / २४
सिडको, नवीन औरंगाबाद

प्रति,
मा. शरणकुमारजी यांस सविनय जयभीम.

आपणास बऱ्याच दिवसांपासून पत्र लिहिण्याचा प्रयत्न करीत आहे; परंतु आजपर्यंत ते शक्य झाले नाही. आठ दिवसांपासून आजारी आहे व डॉक्टरनी कम्प्लीट बेड–रेस्ट सांगितली आहे; म्हणून नाइलाजाने घरातच पडून आहे. तेव्हा आज सकाळी थोडंसं फ्रेश वाटल्यावर पत्र लिहीत आहे.

शरणकुमारजी, आपणास माहीत असेलच की, आम्ही औरंगाबाद इथं एक बैठक घेऊन भारतीय दलित पँथर पुन्हा गंगाधर गाडे यांच्या नेतृत्वाखाली सुरू केली आहे. औरंगाबाद येथील बैठकीला पुण्याहून रामचंद्र माने, मुंबईहून अशोक पाटील, शशिकांत कांबळे, जोगेंद्र गजभिये, अमरावतीहून शिरसाठ आणि मुंबईचा कीर्ती ढोले यांची तार, याशिवाय बरेच कार्यकर्ते उपस्थित होते. हे सर्व कार्यकर्ते तिसऱ्या फळीतील आहेत.

पहिल्या फळीचे लोक रामदास आठवले यांच्याबरोबर मंत्रीपदाच्या प्रतीक्षेत आहेत, तर दुसऱ्या फळीचे काहीजण एखाद्या कमिटीवर किंवा विधानपरिषदेवर जाता येईल, या आशेने आहे तिथेच आहेत; त्यामुळे पँथरमध्ये येणारा आजचा कार्यकर्ता हा एक तर सत्तेपासून कोसो दूर असलेला असा आहे व प्रामाणिकपणे सतत संघर्षरत राहिलेला असल्यामुळे, छावणीत चूपचाप पडून राहणे त्याला न जमल्यामुळे ज्यांची दमकोंडी झाली होती, असे तिसऱ्या फळीतील लोक आमच्याबरोबर येत आहेत.

आज आम्ही मराठवाड्यामध्ये औरंगाबाद, जालना, परभणी, माजलगाव, कळंब, लातूर या ठिकाणी बऱ्यापैकी पाय रोवण्यास सुरुवात केली आहे. मुंबईला आजच जिंकू म्हटले तरी शक्य नाही; कारण रामदास आणि त्याची सत्ता नाही म्हटले तरी प्रभाव टिकवून आहे. नगर आणि सातारा येथील कार्यकर्ते तसेच मनमाड व जळगाव येथील कार्यकर्ते संपर्क ठेवून आहेत. आजची परिस्थिती म्हणजे नव्याने दादला करून नवा संसार उभा करण्यासारखीच आहे. पँथरच्या गठणापासून आम्ही औरंगाबादला कार्यक्रम देण्यास सुरुवात केली आहे. २७ जुलैचा मोर्चा व १५ ऑगस्ट ' दलित बचाव दिन ' विशेषच गाजले.

हे सर्व आपणास सांगण्याचे कारण असे की, आपण पँथर चळवळीचे सहानुभूतिदार तसेच एक अभ्यासक आहात. आपण या चळवळीमध्ये काम केलेले आहे. या चळवळीसंदर्भात आपण अनेक अनुभव घेतलेले आहेत; त्यामुळे चळवळ

। पाच

आपण जवळून पाहिली, ओळखली, पारखली व अभ्यासली; म्हणून आज आम्ही जो निर्णय घेतला तो बरोबर आहे काय ? आमचा निर्णय योग्य आहे की, अयोग्य आहे ? आमच्या प्रयत्नाला भवितव्य आहे काय ? उद्याच्या या चळवळीला जर भवितव्य असेल तर या चळवळीसमोरील आव्हाने आणि तिच्यावर कोणकोणत्या प्रकारे मात करावयाची, यासंबंधात कोणता पवित्रा असावा, याविषयी आपल्या मार्गदर्शनाची आवश्यकता आहे. मार्गदर्शन आपणास अवघड वाटत असेल तर एक साथीदार म्हणून आपला सल्ला व संघटनेसंदर्भात आपले विचार सविस्तर कळवावेत.

आपला,

दि. २४ ऑगस्ट, १९९१ रमेशभाई खंडागळे

भारतीय दलित पँथर
उंटखाना चौक
नागपूर – ४४० ००९

माननीय शरणकुमार लिंबाळे यांस सप्रेम जयभीम.

' पँथर ' पत्रिकेचा धम्मचक्र प्रवर्तन दिन विशेषांक पाठविला आहे. तो मिळाला असेलच. कृपया अभिप्राय अवश्य पाठवावा. अंक यापुढे दरमहा काढणार आहोत. आपणाकडून नियमित लेखनसाहित्य मिळावे, असा आग्रह आहे. सध्याच्या कठीण परिस्थितीत संघटनेची भूमिका जनसामान्यांपर्यंत पोहोचविण्याचे प्रभावी माध्यम म्हणून हा उपक्रम राबविणार आहोत. आपल्यासारख्या विचारवंत साहित्यिक पँथरकडून या कामी वेळोवेळी सहकार्य मिळेल, असा विश्वास वाटतो.

गंगाधर गाडेनी पँथर घेऊन आपलं काम सुरू केलंय. विदर्भात कार्यकर्ते फोडायला सध्या फिरत आहेत. नागपुरात एक पत्रकार परिषद घेतली. पत्रकारांच्या प्रश्नाला ' मी प्रकाश वगैरेंशी बोलणार आहे, ' असे उत्तर दिल्याचे पत्रकार मला सांगत होते. मात्र निवडणुका लढवण्याची भूमिका त्यानी घेतलीय; यामुळे त्रासही सुरू झाला. रिपब्लिकन पक्षाप्रमाणे पँथरचे तुकडे होताहेत; यामुळे सर्वच अस्वस्थ वाटतात. आपण सध्यातरी दूर राहण्याचे ठरविले आहे. पुढील परिस्थिती व त्यांची वागणूक, कृतीनुसार काय ते ठरवू. या सर्व परिस्थितीत आपली काय भूमिका असावी व कशी चळवळ पुढे कशी रेटता येईल, याबाबत सविस्तरपणे लिहून कळवा. सध्या तरी काम व कार्यकर्त्यांची साथ असल्याने आपण मजबूत आहोत.

आपला

प्रकाश बन्सोड

सहा ।

मनोगत

श्री. रमेशभाई खंडागळ आणि श्री. प्रकाश बन्सोड यांच्या पत्रांतली मानसिकता व मागणी एकच आहे. मीही एक कार्यकर्ता–मित्र म्हणून त्यांना लिहिण्याचं ठरवलं आणि त्यातूनच पत्राऐवजी पुस्तक पूर्ण झालं. या पुस्तकाच सर्व श्रेय औरंगाबादचे श्री. रमेशभाई खंडागळे व नागपूरचे श्री. प्रकाश बन्सोड या पँथरना जाते.

प्रचार प्रकाशनच्या सौ. नंदिनी तु. गवळी यानी चळवळीची बांधिलकी स्वीकारून हे पुस्तक प्रकाशित केले आहे, त्यांचे आभार. कार्यकर्त्यांनी खूप वाचावं. खूप चर्चा करावी. सतत एकमेकांच्या संपर्कात असावं म्हणजे चळवळ निरोगी राहील.

यशवंतराव चव्हाण
महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ
नाशिक ४२२ ००५

शरणकुमार लिंबाळे

अनुक्रमणिका

१ सम्यक् क्रांती : आमचा संकल्प । ९
२ आंबेडकरी चळवळ : पँथर । ३२
३ भारतीय दलित पँथर आणि तरुण । ४१
४ भारतीय दलित पँथर आणि राजकारण । ४६
५ दलित पँथर आणि रिपब्लिकन पक्ष । ५१
६ सर्वप्रथम आपल्यातील जाती मिटवा । ६२
७ रिपब्लिकन ऐक्य आणि पँथर । ६७
८ पँथर ही काळाची गरज आहे । ७१
९ भारतीय दलित पँथर ही राष्ट्रवादी । ७६
१० भारतीय दलित पँथर : एक मुक्तिलढा । ८०
११ भारतीय दलित पँथर आणि शिवसेना । ८४
१२ नथुराम की राम ? । ८९
१३ दलित पँथर व दलित साहित्य । ९६
१४ कार्यकर्त्यांच्या संदर्भातलं आत्मगत । १०८

विशेष आभार : हृषीकेश अयाचित, अरुण म. कांबळे



१

सम्यक् क्रांती : आमचा संकल्प

१

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या मरणोत्तर काळात आंबेडकरी चळवळीचे समर्थपणे नेतृत्व करणारी जहाल युवक चळवळ म्हणून ' दलित पँथर ' सर्वपरिचित झालेली संघटना आहे. स्वातंत्र्योत्तर काळातील दलितांच्या प्रश्नांवर सतत संघर्ष करणारी संघटना म्हणून ' दलित पँथर 'चा उल्लेख करावा लागेल. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या निधनानंतर दलित चळवळ काही काळ थांबल्यासारखी झाली होती. दलित समाज भांबावलेला होता; पण ' दलित पँथर 'च्या उदयामुळे दलित चळवळ पुन्हा गतिमान झाल्याचे दिसते.

१९५६ साली दलितांचे विराट धर्मांतर झाले. दलित चळवळीला एक नवा सांस्कृतिक आयाम लाभला. एका नव्या आदर्शाचे परिमाण मिळाले; पण त्याच वर्षी, धर्मांतरानंतर अवघ्या अडीच महिन्यांत, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे महापरिनिर्वाण झाले. बाबासाहेबांच्या चळवळीच्या नेतृत्वाचे उत्तरदायित्व रिपब्लिकन पक्षाने स्वीकारले. १९५७ मध्ये शेड्यूल्ड कास्ट फेडरेशन बरखास्त करून ' रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया ' नावाचा पक्ष स्थापन करण्यात आला.

दलित पँथरची स्थापना ९ जुलै, १९७२ रोजीची आहे. म्हणजे स्वातंत्र्य

मिळून पाव शतक लोटले असताना व डॉ. बाबासाहेबांच्या निधनाला सोळा वर्षे उलटली असताना दलित पँथरची स्थापना झालेली आहे. या सबंध काळात, एकीकडे दलितांवर अन्याय–अत्याचार होत होते तर दुसरीकडे या जुलमाला वाचा फोडणारी प्रभावी अशी संघटना दलितांकडे नव्हती. शिक्षण, विज्ञान, कायदा, आंबेडकरी विचारधन व चळवळ यांमुळे दलित सुशिक्षित तरुणांमध्ये आत्म-सन्मानाची भावना प्रबळपणे वर्धमान होत होती. दलितांना भेडसाविणारे प्रश्न पंचवीस वर्षांत स्वातंत्र्याने सोडविले नव्हते. अशा वेळी डॉ. बाबासाहेबांच्या विचारांचा वारसा सांगणारा रिपब्लिकन पक्ष मात्र सत्ता, स्वार्थ, तडजोडी, लाचारी आणि गटबाजीने बरबटलेला होता. ' अन्‌टचॅबिलिटीच्या प्रश्नावर स्वतंत्र ऑर्गनायझेशन ' नव्हती. जातिअंताच्या प्रश्नांवर प्रखरपणे लढणारी संघटना असणे ही या वेळची गरज होती.

१९५६ नंतर प्रस्थापित साहित्याविरुद्ध लिटल मॅगेझिनच्या चळवळीने जोर धरलेला होता. ' सत्यकथे 'तल्या साहित्याविरुद्ध ही मंडळी बंडखोरपणे बोलत होती आणि याच लघु–अनियतकालिकाच्या चळवळीतून राजा ढाले व नामदेव ढसाळ उमेदवारी करीत होते.

१९५६ नंतर दलित साहित्याच्या चर्चेला तोंड फुटत होते. डॉ. म. ना. वानखेडे हे अमेरिकेत जाऊन आले असल्याने, त्यानी अमेरिकेतल्या काळ्या लोकांची चळवळ व त्यांचे विद्रोही साहित्य याबद्दल चर्चेला सुरुवात केली होती. ब्लॅक लिटरेचर, ब्लॅक पॉवर, ब्लॅक पँथर अशा विषयांवर व दलित साहित्याच्या आणि चळवळीच्या संदर्भातही विचार मांडले जाऊ लागले. याच काळात महाड येथे पहिले दलित साहित्य संमेलन भरले. महाविद्यालयांतून शिक्षण घेणारे तरुण शहराशहरांत संघटित झाले होते. प्रत्येक महाविद्यालयात रिपब्लिकन विद्यार्थी संघटना स्थापन झालेल्या होत्या. या संघटनांतून दलित विद्यार्थी सामाजिक प्रश्नांवर संघर्ष करीत होते; पण या चळवळी खूपच सुटचा व तोकड्या होत्या. त्यांचे बळ महाविद्यालयाच्या हॉस्टेलपुरतेच सीमित होते. दलित पँथरच्या स्थापनेपूर्वी नामदेव ढसाळ (प्रजासमाजवादी), राजा ढाले (दलित युवक आघाडी), भाई संगारे (काँग्रेस), गंगाधर गाडे, टी. एम. कांबळे (रिपब्लिकन विद्यार्थी संघटना) हे निरनिराळचा संघटनांत होते. मुंबईच्या सिद्धार्थ विहार हॉस्टेलमधील विद्यार्थ्यांचा पँथरमध्ये मोलाचा वाटा आहे. महाराष्ट्रातील अनेक दलित तरुण विद्यार्थी या हॉस्टेलवर केंद्रित झालेले होते. या सर्व पार्श्वभूमीवर ' दलित पँथर 'चा उदय ही अपरिहार्य घटना होती.

नामदेव ढसाळ, ज. वि. पवार, राजा ढाले, रामदास सोरटे, लतीफ खाटिक,

अविनाश महातेकर, प्रल्हाद चेंदवणकर, अर्जुन डांगळे, भाई संगारे, अनिल कांबळे, अरुण कांबळे, रामदास आठवले, गंगाधर गाडे, प्रीतमकुमार रेणावकर, टी. एस. कांबळे या आघाडीच्या कार्यकर्त्यांनी दलित पँथरची चळवळ वाढविली. डॉ. बाबासाहेबांवरील असीम श्रद्धा, दलित समाजाविषयीचा अपार जिव्हाळा, सामाजिक विषमतेविरुद्ध पेटून उठलेले तरुण यांमुळे दलित पँथर ही संघटना थोड्याच काळात नावारूपाला आली. पँथर्सची बेदरकार भाषणे, गर्दी खेचणाऱ्या वादळी सभा, हाणामारी, मोर्चे, पोलीस केसेस यांमुळे लोकांचे लक्ष दलित पँथरने खेचून घेतले. ठिकठिकाणी दलित पँथरच्या छावण्या स्थापन झाल्या. पँथरच्या सभा गाजू लागल्या. पँथर्स हिंदू देवदेवतांना सभेत शिव्या देत असत. रिपब्लिकन पक्षाच्या नाकर्तेपणावर कडाडून हल्ला करीत असत. 'विद्रोह' हे पँथरचे मुखपत्र, ढसाळ व ज. वि. पवार चालवीत असत. त्यात पँथरची जहाल भूमिका मांडलेली असायची. नामदेव ढसाळ, ज. वि. पवार, प्रल्हाद चेंदवणकर वगैरे कार्यकर्त्यांच्या कविता मराठी साहित्यात वादळी चर्चेचा विषय ठरल्या. 'स्वातंत्र्य कुठल्या गाढवीचं नाव? आमी रामराजाच्या कुठल्या घरात राहतूय ?' असा प्रश्न ढसाळने कवितेतून व्यक्त केला, तर १५ ऑगस्ट, १९७२ च्या 'साधने'मधील राजा ढाले यांचा लेख खूपच गाजला.

दलित पँथरचे कार्यकर्ते राजकीय दृष्ट्या अपरिपक्व असले तरी त्यांचा आवेश दांडगा होता. सर्व संतप्त, बेदरकार तरुण होते. वरळीची दंगल, गीतेचे दहन, शंकराचार्यांवर जोडा फेकणे, शिवसेनेबरोबर झालेल्या मारामाऱ्या यांमुळे दलित पँथरकडे लोकांचे लक्ष वेधले जाऊ लागले. पँथरचा दबदबा निर्माण झाला. आपल्या समाजावर अन्याय होतोय, आपला कोणी वाली नाही, शंभर दिवस शेळी होऊन जगण्यापेक्षा एक दिवस वाघ होऊन मेलेलं बरं अशा प्रखर बाण्याची ही मंडळी होती. त्यांचा रिपब्लिकन पक्षावरील विश्वास उडाला होता. तसंच विरोधी पक्ष, काँग्रेस आणि ट्रेड युनियनवरही ते घणाघाती टीका करीत होते. मुंबईतून पँथर महाराष्ट्रभर पसरत होती.

दलित पँथरचा उदय आणि काही मते

अ) जातिव्यवस्था व दलितांवरील अत्याचाराविरुद्धची चीड या अंतर्विरोधातून पँथरचा जन्म झाला – नागेश चौधरी.

ब) दलितांवरील वाढत्या अत्याचारांमुळे दलित तरुणांमध्ये पसरलेला

अ) सत्यशोधक, पुणे – डिसेंबर, १९७४.

ब) जातिवाद आणि वर्गवाद – साधना प्रकाशन, पुणे

असंतोष आणि रिपब्लिकन पक्षातील जुन्या नेतृत्वावद्दल त्यांचा झालेला भ्रमनिरास यांमधून दलित पँथरची स्थापना झाली – नलिनी पंडित.

क) सर्व रिपब्लिकन पक्ष विद्रोही आंबेडकरवादाशी बेइमान झाले म्हणून दलित युवकांच्या पँथरसारख्या विद्रोही संघटना जन्माला आल्या – शरद पाटील.

ड) नेते जनतेपासून दूर जात होते आणि जनतेला नवे नेतृत्व हवे होते. दलित पँथरच्या उदयाने ही जनतेची आशा फलद्रूप झाली – रावसाहेब कसबे.

दलित पँथर म्हणजे दलितांवर होणाऱ्या अन्यायाविरुद्धची जळजळीत प्रतिक्रियाच. आंबेडकरांच्या निधनानंतर मरगळ आलेल्या दलित समाजाला पँथर एक नवी ठिणगी वाटू लागली. आपल्या मुक्तीची आशा वाटू लागली. दलित पँथरच्या उदयामुळे दलित तरुणांच्या मनात विषम व्यवस्थेविषयी असलेल्या संतप्तपणाला एक नवे व्यासपीठ जसे मिळाले तसेच दलित समाजात चळवळीचे चैतन्य निर्माण झाले होते, हेही नाकारता येत नाही.

२

दलित पँथर ही संघटना बहुसंख्येने महार व बौद्ध तरुणांची आहे. इतर बहिष्कृत जाती–जमातींनाही या संघटनेत सामावून घेणे महत्त्वाचे आहे. संघटनेचे मनुष्यबळ वाढविल्याशिवाय संसदीय राजकारणात महत्त्व मिळत नाही. केवळ नवबौद्धांची चळवळ उभारल्याने समस्त बहिष्कृत वर्गाचे प्रश्न सुटणार नाहीत. आपली नाळ कोणाशी ? अखिल बहिष्कृत समाजाशी की केवळ नवबौद्धांशी ? आपण दलितांचे प्रतिनिधित्व करणार आहोत, तर आर्थिकदृष्ट्या दुर्बल असणाऱ्या सर्व जातीतील दलित असणाऱ्या माणसांच्या मुक्तीविषयी आपली भूमिका काय ? चळवळ म्हणून पँथरला काहीएक भूमिका घेणे जरूर होते; यामुळेच दलित पँथरमध्ये मार्क्सवाद व आंबेडकरवाद असे दोन प्रवाह निर्माण झाले.

दलित पँथरमधील ' मार्क्सवादी ' प्रवाहाला उत्तेजन देण्याचे काम कम्युनिस्ट मंडळी करीत होती. ' पँथरच्या वाढत चाललेल्या शक्तीचा राजकीय स्वार्थासाठी उपयोग करण्याच्या दृष्टीने कम्युनिस्टांनी पँथरला कावीज करण्याचे प्रयत्न चालवले होते, तर कम्युनिस्टांची बौद्धिक आघाडी डॉ. आंबेडकरांचे दोषदिग्दर्शन करून पँथरला मार्क्सवादाची दीक्षा देण्याचे प्रयत्न करीत होती; परंतु आंबेडकरवाद स्पष्ट

क) सत्यशोधक मार्क्सवादी – धुळे, डिसेंबर, १९८२.

ड) दलित चळवळीची वाटचाल – केशवराव गोरे ट्रस्ट, मुंबई.

नाकारला तर पँथर्स बिचकतील म्हणूल वर्णलढा व वर्गलढा एकत्र लढविला गेला पाहिजे, असं आग्रहानं प्रतिपादलं जात होतं. *

नामदेव ढसाळ ' मार्क्सवादा 'ची री ओढत होते, तर राजा ढाले ' आंबेडकरवादा 'ची. दलित पँथरने दलित, शोषित, कष्टकऱ्यांचा लढा उभारला पाहिजे, ही ढसाळांची भूमिका. दलित पँथर बौद्ध तत्त्वप्रणालीनुसार चालवली पाहिजे; पँथरने साम्यवादापासून दूर राहिले पाहिजे; पँथर ही बौद्धांची संघटना आहे, बाबा आढावाना पँथरचे नेतृत्व करायचे असेल तर त्यानी बौद्ध व्हावे; असा हा दुसरा विचार होता. बुद्ध–आंबेडकरांच्या मार्गाने आपण लढे दिले पाहिजेत, ही राजा ढाले यांची भूमिका.

नामदेव ढसाळने सुनील दिघे या ' नक्षलवादी ' कार्यकर्त्याच्या सहकार्याने दलित पँथरचा जाहीरनामा तयार केला. या जाहीरनाम्यास ढालेंचा विरोध होता; कारण हा जाहीरनामा कम्युनिस्ट विचारानुवर्ती आहे. ' पँथरमधील मार्क्सवादी प्रवाहास कम्युनिस्ट विचारवंतांचे पाठबळ नि त्यांचे व्यासपीठही मिळाले, तसे आंबेडकरी प्रवाहास मिळाले नाही. मार्क्सवादी प्रवाहाने मांडलेल्या अर्थविचारास पर्यायी असा आंबेडकरवादी अर्थविचार त्यांना देता आला नाही. दलितांच्या प्रश्नांना विविध पैलू चिकटले. त्यांचे आंबेडकरी विचारांतून शास्त्रशुद्ध विश्लेषण करून चळवळीला शास्त्रशुद्ध आंबेडकरी तत्त्वांचे अधिष्ठान देण्यात त्यांना अपयश आले. खरे तर ते अपयश नसून ती त्यांची मर्यादा होती. †

दलित पँथरमध्ये ' मार्क्सवाद की आंबेडकरवाद ' हा वैचारिक संघर्ष सुरू झाला. त्याचप्रमाणे नेतृत्वाचा हव्यास, व्यक्तिवाद, हेवेदावे, आरोप–प्रत्यारोप यांमुळे पँथर फुटीच्या मार्गाने जाऊ लागली. नागपूर इथे भरलेल्या पँथरच्या पहिल्याच अधिवेशनात राजा ढाले यानी नामदेव ढसाळ याना पँथरमधून काढून टाकल्याचे जाहीर केले आणि दलित पँथर फुटली. त्यामुळे ढाले आणि ढसाळ असे दोन गट निर्माण झाले. पँथरमधील बहुसंख्य गट हा राजा ढाले यांच्या पाठीमागे गेला.

दलित पँथर चळवळ नावारूपाला आलेली. पँथरचा राजकीय दरारा होता. सामान्य पँथर्समध्ये या फुटीमुळे गोंधळ वाढणे साहजिकच होते; शिवाय दलित पँथरच्या कार्याचा, नावाचा राजकीय सौदेबाजीसाठी उपयोग होऊ लागला; म्हणून राजा ढालेंनी आपल्या गटाचे नाव बदलण्याचे जसे ठरविले तशी त्यानी पँथरही बरखास्त करून टाकली.

---

* सुधाकर गायकवाड, अस्मितादर्श, दि. अं. १९८०.

† सुधाकर गायकवाड : अस्मितादर्श, दि. अं. १९८०.

' ज्यांनी (नामदेव ढसाळ) संघटनेची अधिकृत भूमिका वाहेर येण्याआधीच वेगवेगळ्या पक्षांना पाठिंवा जाहीर केला अशा लोकांशी इथून पुढे आमचा कोणताही संबंध नाही. दलित पँथरचे नाव घेऊन दलित पँथरची स्वयंभू प्रतिमा डागाळण्याचा हा डाव इथून पुढे आम्ही चालू देणार नाही. दलित पँथरचे अस्तित्व हे स्वयंभू होते आणि त्या अस्तित्वाचा उद्देश दलितांची दुःखे जगाच्या वेशीवर टांगणे हाच होता. इथे पाठिंव्याचा कोठेच प्रश्न येत नाही.

' परंतु ज्यांनी ही पाठिंव्याची भाषा सुरू केली आहे, त्यांच्याशी आमचा इतःपर कोणताही संबंध नाही आणि आमचे अस्तित्व स्वतंत्र आहे, हे सिद्ध करण्यासाठीच आम्ही दलित पँथर ही संघटना बरखास्त करीत आहोत आणि नव्या ' मास मूव्हमेंट 'ची घोषणा करीत आहोत. दलित पँथरच्या नावाने जे लोक वावरत आहेत, ते प्रतिगाम्यांचे साथीदार आहेत, आंबेडकरवादाचे वैरी आहेत आणि त्यांच्यावरोबर कोणीही आंबेडकरवादी नाही, तरीसुद्धा दलित पँथरच्या नावाचा दुरुपयोग हेच लोक करीत आहेत, तो त्यांना पुढे करता न यावा यासाठीच ही उपाययोजना. ' *

दलित पँथर वरखास्त झाल्यामुळे अनेक कार्यकर्ते हवालदिल झाले. काही ओक्साबोक्सी रडले. संघटनेवर कार्यकर्त्यांचे जिवापाड प्रेम होते. पँथर बरखास्त झाल्यामुळे चळवळ गतिरुद्ध झाल्यासारखी वाटली. परत एकदा सर्वच सैरभैर झाले. ज्यांनी काही आशा निर्माण केली होती, त्यांनीच ती नष्ट केली.

३

दलित पँथरच्या वरखास्तीनंतर पुन्हा एकदा पँथर संघटित करण्याचे काम अरुण कांबळे, रामदास आठवले, दयानंद म्हस्के, वापूसाहेव उकिरडे, रमेशचंद्र परमार, गंगाधर गाडे, प्रीतमकुमार रेणावकर, भाई संगरे यांसारख्या पँथर नेत्यांनी केले. महाराष्ट्रावाहेर दलित पँथर अनेक राज्यांत आपले पाय रोवून उभी आहे. महाराष्ट्रात निर्माण झालेली दलित पँथर ही आता भारतीय पातळीवरची संघटना आहे; म्हणून ' दलित पँथर 'चे ' भारतीय दलित पँथर ' असे नामकरण करण्यात आले. पहिले अध्यक्ष हे अरुण कांवळे, दुसरे गंगाधर गाडे आणि तिसरे रामदास आठवले यांनी भारतीय दलित पँथरला भक्कम पायावर संघटित केल्याचे दिसेल. मंडल आयोग आणि नामांतराचा लढा अतिशय निकराने भारतीय दलित पँथरने

---

* राजा ढाले – दलित पँथर बरखास्त, मुद्रक–प्रकाशक – राजा ढाले.

लढविला आहे. गावपातळीपासून ते राज्य आणि देशाच्या राजधानीपर्यंत मोर्चे नेऊन पँथरने आपल्या मागण्या लोक आणि शासनापुढे जाहीररीत्या मांडलेल्या आहेत. पँथर मुंबईत जन्मली, मुंबईत बरखास्त झाली; पण मुंबईबाहेरच्या असंख्य छावण्या आणि कार्यकर्त्यांनी पँथरला कधीच बरखास्त होऊ दिले नाही; कारण त्यांच्या लेखी दलित पँथर ही संघटना नव्हती; ती एक जिवंत विद्रोही भावना होती.

भारतीय दलित पँथरने सर्वसमावेशक भूमिका स्वीकारलेली आहे. दलित म्हणजे केवळ नवबौद्ध नव्हे तर जो सामाजिक व आर्थिकदृष्ट्या शोषित आहे, तो आमचा आहे ही विचारप्रणाली पँथरवाल्यांकडून सभासभांमधून मांडली जाऊ लागली आहे. तरीपण पँथर्स पूर्णपणे मार्क्सवाद मान्य करायला तयार नाहीत, ते आंबेडकरवाद हाच आपला प्राण मानून चळवळ पुढे रेटत आहेत. पँथरला मार्क्सवाद अपुरा वाटतो. भारतीय दलित पँथर जशी मार्क्सवादाचा हिरीरीने पुरस्कार करीत नाही, तशी ती बौद्ध धम्माचाही खंबीरपणे पाठपुरावा करतेय असे दिसत नाही. मार्क्सचा रक्तरंजित क्रांतीचा मार्ग पँथरला मान्य नाही. 'सम्यक् क्रांती' हा भारतीय दलित पँथरचा संकल्प आहे. पण 'सम्यक् क्रांती'चा तपशील अजून मांडला गेला नाही. दलित पँथरने रक्तरंजित मार्ग आणि हिंसा अमान्य केली असली तरी त्यांच्या शब्दाशब्दांत ती ओतप्रोत भरलेली असते. 'मार्क्सवाद आणि आंबेडकरवाद ह्या दोन्हीही विचारधारा विषमताविरोधी आहेत; पण रशिया आणि चीन इथला मार्क्सवाद भारतामध्ये जसाच्या तसा लागू करणे गैर आहे. भारतामध्ये मार्क्सवाद आंबेडकरवादशिवाय अपुरा आहे,' असे रामदास आठवले एका चर्चेत मला म्हणाले होते.

भारतीय दलित पँथर ही केवळ महारांची किंवा नवबौद्धांची संघटना आहे म्हणून तिला जातीय संघटना ठरविणे चुकीचे आहे. पँथरमध्ये प्रामुख्याने महार व नवबौद्ध तरुण आहेत; कारण महार समाज संख्येने मोठा आहे. या समाजाला आंबेडकरी विचार आणि चळवळीचा इतिहास आहे. शिक्षणात हा समाज आघाडीवर आहे. धर्मांतरामुळे महार समाजात जुन्या रीतिरूढी व गुलामीविरुद्ध विद्रोह पोसला आहे. महार समाजातील अनेक माणसे ही ब्रिटिश सैन्यात होती. या सर्वांचा परिणाम होऊन इतर बहिष्कृत जातींपेक्षा महार समाज सर्वच आघाड्यांवर नेतृत्वाच्या भूमिकेत राहिला आहे. दलित पँथर ही दलित समाजाची संघटना आहे. ती दलितांवर होणाऱ्या अन्यायाच्या विरोधात आणि स्वसंरक्षणाच्या भूमिकेतून उदयाला आली आहे. त्यामुळे ज्या समाजावर अन्याय होतो, त्या दलित समाजाची बाजू घेणे ही तिची ऐतिहासिक जबाबदारी आहे. याला कदापिही 'जातीवाद' असे संबोधता येणार नाही.

प्रभू रामचंद्रांपासून ते छत्रपती शिवाजी महाराजांपर्यंतच्या राजेशाहीचा

इतिहास ' गोब्राह्मणप्रतिपालक ' असाच आहे. म. गांधीजींच्या ' रामराज्या 'तही हाच शिरस्ता शिस्तबद्ध चालू आहे. याला विरोध करण्यासाठी, ' हिंदुस्थानी स्वातंत्र्याचा धिक्कार करण्यासाठी ' पँथर ताठपणे उभी राहिली आहे. हिंदू धर्माने दलितांवर सक्तीने अस्पृश्यता आणि दारिद्र्य लादलेले आहे. दलितांचे दलितपण जसे सामाजिक आहे, तसे वर्गीयही आहे. शूद्रांना धर्माधिकार नाकारला होता. विद्येविना वंचित ठेवले होते. सत्ता आणि प्रतिष्ठा शूद्रांना नव्हती. फक्त त्रैवर्णिकांची सेवा करणे इतकंच मान्य केलेलं होतं. शूद्रांचा शेती, व्यापार, अर्थार्जनाचा हक्क हिरावून घेतला होता. शूद्राने वेद वाचले तर जीभ छाटावी अशी आज्ञा हिंदू धर्मग्रंथांनी जशी दिलेली आहे, तशीच शूद्राने गावाबाहेर राहिले पाहिजे, मातीची भांडी वापरावी, कुत्रे आणि गाढव हे त्यांचे धन, शूद्राला अर्थार्जन करता येणार नाही, अशा पद्धतीने नियम करून शूद्रांना सामाजिक, धार्मिक, राजकीय, शैक्षणिक व आर्थिक हक्कांपासून वंचित ठेवलेले होते.

दलितांचा लढा इतका व्यापक आहे. केवळ सामाजिक किंवा केवळ आर्थिक असा हा लढा असू शकत नाही. ज्याचं अस्तित्वच नाकारलं होतं अशा माणसाचा लढा हा सर्वव्यापी असतो. ' मी माणूस आहे ' हा त्यांचा पहिला हुंकार असतो. मलाही शिक्षण मिळाले पाहिजे, मलाही अन्न–वस्त्र–निवारा आणि काम मिळाले पाहिजे, मलाही सत्ता–संपत्तीमध्ये समान वाटा मिळाला पाहिजे, मीही या देशाचा नागरिक आहे, मला राज्यकर्ता बनता आलं पाहिजे आणि या रास्त मागण्या नाकारीत असाल तर आम्हाला तुमच्याविरुद्ध लढावं लागेल आणि आमचे हक्क प्रस्थापित करावे लागतील असा हा स्वाभिमान जागा होतो. या स्वाभिमानात वेदना आणि विद्रोह असतो. त्याला नवीन समाजव्यवस्था हवी असते. ' माझा आदर्श समाज समता, स्वातंत्र्य आणि बंधुभावावर आधारलेला राहील ' * ही त्यांची मागणी असते. त्यांना कोणावर आपली ' हुकूमशाही ' लादायची नसते, म्हणूनच इथं मार्क्स आणि आंबेडकर या दोन विचारांमध्ये मूलभूत फरक होतो.

४

भारतीय दलित पँथरने मराठवाडा विद्यापीठाला डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे नाव मिळाले पाहिजे यासाठी अनेकवेळा आंदोलने केलेली आहेत. धरणे, निषेध, मोर्चा, घेराओ, मंत्र्यांच्या कारपुढे आडवे पडणे, विधानसभेत उडी मारणे

---

* डॉ. बी. आर. आंबेडकर – जातिनिर्मूलन, पृ. ३८.

अशा अनेक मार्गांनी पँथरने लढे दिलेले आहेत. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या मरणोत्तर काळातला विराट लढा म्हणून नामांतराच्या लढ्याचा उल्लेख करावा लागेल. नामांतराच्या आंदोलनामुळे दलित समाजामध्ये फार मोठे मानसिक ऐक्य निर्माण झाले होते. याचा फायदा घेऊन दलित चळवळीला एक प्रचंड फळी उभी करता आली असती; पण असे झाले नाही. या उलट नामांतराच्या प्रश्नावर दलित चळवळीत मतभेदच दिसून आले. नामांतराचा प्रश्न प्रा. जोगेंद्र कवाडे यानी स्वतंत्रपणे लढविला. भारतीय दलित पँथरने डाव्या व पुरोगामी चळवळींबरोबर युती करून नामांतराचा प्रश्न लोकांपुढे मांडला. अरुण कांबळे यानी 'भारतीय नागरिकत्वाचा सामुदायिक राजीनामा देण्याची' घोषणा केली, तर रामदास आठवले यानी 'आम्ही हजारोंच्यासह धर्मांतर करू' अशी धमकी दिली. याच वेळी इतर नेते 'बौद्ध विद्यापीठ स्थापन करावे,' 'कोकण विद्यापीठाला डॉ. आंबेडकरांचे नाव द्यावे' अशा मागण्या करीत होते.

'विद्यापीठाला डॉ. आंबेडकरांचे नाव द्यावे' ही मागणी स्वतंत्र राज्याची मागणी करणारी नव्हती की जमिनीचे राष्ट्रीयीकरण करा म्हणणारी नव्हती.

तरीपण नामांतराला क्रूरपणे विरोध करण्यात आला आणि ज्यांना 'विद्यापीठ' म्हणजे काय हेदेखील माहीत नाही, अशा दलितांच्यावर अन्याय-अत्याचार करण्यात आले. शासनाने दोन्ही सभागृहांत विद्यापीठ नामांतराचा प्रस्ताव मंजूर करताच अन्याय-अत्याचाराला सीमा राहिली नाही. शासनाचा निर्णय आपल्याला अमान्य आहे अशी भूमिका लोकशाहीवादी आहेही; परंतु हे निमित्त करून पद्धतशीरपणे दलित-बौद्धांच्या घरांना आगी लावणे, त्यांच्या पिकांची नासाडी करणे, विनयभंग करणे, हल्ले करणे, जीव घेऊन पळून जाणाऱ्या दलितांना पकडून मारणे हे माणुसकीचे प्रकार आहेत काय ? * मराठवाडा विद्यापीठाच्या नामांतराची मागणी झाल्यानंतर उच्चवर्णीयांनी केलेली प्रचंड खळबळ, आकांडतांडव करून नोंदवलेला विरोध, खेड्यापाड्यांत पेटवलेली घरंदारं, शासकीय व सार्वजनिक मालमत्तेची पेटवलेली होळी हे सगळं पाहून सवर्णांना माणसांच्या जीवनापेक्षा खोट्या, तकलादू व पारंपरिक अस्मिता किती प्राणप्रिय आहेत, याचा साक्षात्कार झाला. †

'अक्करमाशी' या आत्मचरित्रामध्ये नामांतराच्या काळातली जीवघेणी वास्तवता प्रकट झाली आहे. 'आभरान' या पार्थ पोळकेच्या आत्मचरित्रालाही नामांतराचा संदर्भ आहे. फ. मुं. शिंदे यानी नामांतरावर 'सार्वमत' नावाचा

---

* डॉ. गंगाधर पानतावणे : प्रबोधनाच्या दिशा.

† बा. ह. कल्याणकर – अस्मितादर्श, दि. अं. १९८०.

कवितासंग्रह प्रकाशित केला आहे. नामांतराच्या दंगलींवर, लढ्यांवर अनेक दलित कवींनी आणि लेखकांनी आपापल्या तीव्र आणि स्फोटक प्रतिक्रिया मांडल्या आहेत. नामांतराने दलितांचे समग्र जीवन आणि चळवळी ढवळून निघाल्या.

५

भूमिहीनांचा सत्याग्रह, नामांतर लढा, दलित साहित्य आणि दलित पँथरचा उदय ह्या आंबेडकर मरणोत्तरकाळातील महत्त्वाच्या घटना होत. दलित साहित्यातला ' विद्रोह ' पँथरने कृतीच्या पातळीवर आणला आहे. नामदेव ढसाळ, राजा ढाले, उमाकांत रणधीर, ज. वि. पवार, अरुण कांबळे, अर्जुन डांगळे यांसारख्या कवी–लेखकांनी पँथर संघटना वाढविली; पण आज दलित लेखक पँथर चळवळीपासून दूर गेला आहे. पँथरमधून भाई संगारे, वामन निंबाळकर यांसारखी मंडळी बाहेर पडली आहेत. मध्यमवर्गही पँथरविषयी उदासीन बनला आहे. दलित मुक्तिसेना, समता सैनिक दल, वामसेफ, डी. एस. फोर, दलित युवक आघाडी, रिपब्लिकन युवक, मास मूव्हमेन्ट, ढसाळ पँथर, शिवाय इतर संघटनांमुळे दलित तरुणांमध्ये बजबजपुरी माजली आहे. बेकार, गुंड, मवाली, गुन्हेगार, दारुडे अशी माणसं चळवळीत आल्याने चळवळीचं चारित्र्य नष्ट होत आहे आणि त्यामुळे लोकांचा विश्वास संपादन करणे चळवळीला अवघड होत आहे. कार्यकर्त्यांच्या स्वच्छ चारित्र्यावरच चळवळ टिकून राहते.

बाबासाहेबांचे चारित्र्य उत्तुंग होते म्हणून त्यांचे नेतृत्व लोकादराला पात्र झाले; पण आज प्रत्येक नेत्याविषयी आदर व्यक्त करण्यापेक्षा, लोक शंकाच अधिक घेत आहेत. ' मला उद्ध्वस्त व्हायचंय् 'मध्ये व्यक्त झालेला पँथर नामदेव ढसाळ हा चळवळीचा आदर्श होऊ शकतो का ? ज्यांना स्वतःचे चारित्र्य सांभाळता येत नाही, त्यांनी चळवळी सांभाळण्याचं काम करू नये. दलित पँथरमध्ये वरील सर्व दुर्गुण असतानादेखील ही चळवळ टिकून आहे, याचे कारण म्हणजे पँथर जनतेच्या समस्यांशी प्रामाणिक राहिली आहे. तुटपुंजी आर्थिक अवस्था, स्वतःच्या प्रचारयंत्रणेचा अभाव आणि प्रशिक्षित कार्यकर्ते नाहीत असे असूनही पँथरची चळवळ व्यापक बनली आहे. याचे कारण म्हणजे, पँथर कार्यकर्त्यांच्या मनातली डॉ. आंबेडकरांविषयीची अमाप श्रद्धा, दलित समाजाविषयीचा जिव्हाळा आणि विषम समाजव्यवस्थेविरुद्धचा प्रखर विद्रोह हे होय. मानव चंद्रावर गेला; पण आजही अस्पृश्य माणूस गावच्या विहिरीवर जाऊ शकत नाही, ही वस्तुस्थिती आहे. मराठी साहित्य संमेलनामध्ये दक्षिण आफ्रिकेत फाशी दिलेल्या काळचा कवीला श्रद्धांजली वाहिली

जाते; पण महाराष्ट्र शासनाने दोन्हीही सभागृहांत एकमताने मंजूर केलेला नामांतराचा ठराव साहित्य संमेलनामध्ये मांडला जावा, यासाठी दलित पँथरला मोर्चा काढून मागणी करावी लागते, ही वस्तुस्थिती डोळ्यांआड करता येणार नाही. मुंबई येथे काळ्या घोड्याजवळ मोर्चा अडविला असता रामदास आठवले आपल्या भाषणात म्हणाले होते, ' पुस्तकाच्या पहिल्या पानावर जी प्रतिज्ञा असते, त्या प्रतिज्ञेतील प्रत्येक पूर्णविरामाऐवजी एकेक प्रश्नचिन्ह उभे केल्यास आपणाला या देशाचे खरे चित्र कळून येईल. '

' गुलामाला गुलामीची जाणीव करून द्या, म्हणजे तो बंड करून उठेल, ' हा विचार दलित तरुणांच्या मनात रुजविण्याचे काम पँथरने केले आहे. हजारो वर्षांच्या प्रस्थापित विषम समाजरचनेत जगायचे म्हटले तर अन्याय सहन करीत नष्ट होण्याचा मार्ग पत्करावा लागतो किंवा सरळ फुटीर चळवळी करून दहशतीच्या जोरावर न्याय पदरात पाडून घ्यावा लागतो. दुसरे म्हणजे, देशातील दारिद्र्याशी सांधा जोडून सामाजिक क्रांतीच्या दिशेने एक संयुक्त आंदोलन उभारणे महत्त्वाचे असते. सोलापूर येथे पँथरच्या जाहीर सभेत बोलताना टी. एम. कांबळे म्हणाले होते, ' आम्हालाही अतिरेकी बनता येते. आम्हीही शहरे पेटवू शकतो. केवळ दहशतीनेच प्रश्न सुटत असतील तर आम्हालाही दहशतवादी बनावे लागेल; पण आम्हाला युद्धाचा मार्ग मान्य नाही. आम्ही बुद्धाच्या मार्गाने जाणारे आहोत. '

दलित पँथरचा मुख्य संघर्ष हा परंपरागत विचारांशी, संस्कृतीशी आहे. दलित पँथरने सामाजिक अन्याय–अत्याचारांविरुद्ध लढे दिले आहेत; पण ते आर्थिक आणि राजकीय लढ्यांकडे दुय्यम दर्जाचे लढे म्हणून पाहत आहेत. आर्थिक आणि राजकीय लढे हे महत्त्वाचे मानले पाहिजेत. धर्म आणि जातीच्या नावावर चळवळ करणे थांबले पाहिजे. संघटना बळकट करणे, संघटनेला खंबीर वैचारिक पाया देणे, तिचा लढाऊ, क्रांतिशील संघटनांशी सांधा जोडणे महत्त्वाचे आहे. वाढत्या, संघटित व लढाऊ ताकदीवर ' माणूस ' म्हणून जगण्यासाठी उभे राहण्याच्या जबर निर्धारावर, शोषण व दडपणुकीविरुद्ध वाढत चाललेल्या जाणिवांवर दलित पँथरची भिस्त असली पाहिजे. ' दलितांचा लढा म्हणजे केवळ बौद्धांचा लढा नव्हे किंवा डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणजे केवळ बौद्धांचे नेते नव्हेत. प्रस्थापितांविरुद्ध प्रभावीपणे लढा द्यावयाचा असेल तर बौद्धेतर दलित समाजालाही संघटित करून त्यांचा विश्वास संपादन केला पाहिजे. ' *

दलित पँथरने आजवर दबावाचेच राजकारण केलेले आहे. त्याला रचनात्मक कार्याची जोडही हवी. एकीकडे लढे दिले पाहिजेत तर दुसरीकडे संघटना बांधली

---

* नामदेव ढसाळ – दै. केसरी, पुणे. ९ ऑक्टोबर, १९८४.

पाहिजे. केवळ जातिव्यवस्थेविरुद्ध विद्रोहाची भाषा बोलून भागणार नाही, तर दलितांतील जातिव्यवस्था नष्ट करणे आवश्यक आहे. त्याशिवाय तळातल्या जाती एक होऊ शकत नाहीत. प्रतिक्रियावादी, पुनरुज्जीवनवादी, प्रतिक्रांतिवादी विचार आज जोराने फैलावत आहेत. फुले–आंबेडकरांच्या विचारांची बदनामी होते आहे. अशा वेळी कलापथके, व्याख्याने, मेळावे, शिबिरे, पदयात्रा यांसारख्या माध्यमांतून लोकशिक्षण करणे गरजेचे आहे.

६

' धर्मनियमांचा उच्छेद आणि सजातीय विवाहाला बंदी ' हा विचार जाति-अंताच्या संदर्भात डॉ. आंबेडकरानी मांडलेला आहे. हिंदू धर्माची चिकित्सा आणि जातिव्यवस्थेविरोधी लढा या दोन पातळ्यांवर लढा देणे महत्त्वाचे आहे. सैद्धांतिक आणि व्यावहारिक पातळीवर हा लढा लढविला गेला पाहिजे.

रोटीबेटी व्यवहार हळूहळू जातीजातींमध्ये होत आहेत. अस्पृश्यता नष्ट होत असल्याचा भास होत असला तरी ' जातीयता ' ही भावना उग्र बनत आहे. एखाद्याला ' अस्पृश्य ' लेखणे म्हणजे तो नीच व हीन दर्जाचा आहे, शूद्र, गुलाम आहे अशी ही प्रवृत्ती होती; परंतु ' जातीय ' भावना ही द्वेष, स्पर्धा आणि शत्रुत्वावर आधारलेली आहे. ' जात ' वर्णाश्रमधर्माची निर्मिती असली तरी, ती आता एक राजकीय शक्ती बनली आहे. जातीच्या एकगठ्ठा मतांमुळे त्या जातीला भक्कम असे राजकीय चिरंजीवित्व लाभलेले आहे आणि त्यामुळेच जातीच्या नावावर संघटना बांधणे, आपले नेतृत्व तयार करणे, जातीच्या नावावर निवडणुका लढवणे आज सोपे झाले आहे. जातिधर्माधिष्ठित राजकारणामुळे ' जातीय भावना ' फोफावत आहेत. प्रत्येक जात दुसरीची राजकीय स्पर्धकच बनली आहे. या स्पर्धेमुळेच जातीय तणाव, दंगली उद्‌भवत आहेत. ' माणूस म्हणजे माणूस. जात, पंथ आम्ही मानत नाही. भारतीय गरीब जनतेचे प्रश्न आर्थिक प्रश्नांवर आधारित आहेत. आर्थिक प्रश्नांविरुद्ध लढाई उभारली तरच प्रश्न सुटतील. धर्माविरुद्ध लढाई असली तर प्रश्न सुटणार नाहीत, ' * ही भूमिका मला महत्त्वाची वाटते.

दलित पँथरने आर्थिक प्रश्नांवर लढे दिले पाहिजेत, हे खरे. आर्थिक प्रश्नांवर लढे देणाऱ्या अनेक संघटना आहेत; पण त्यांचे सामाजिक प्रश्नांकडे दुर्लक्ष झालेले आहे. दलित पँथरचे वेशिष्ट्य आणि मूळ संघर्ष हा सामाजिक विषमतेविरुद्धचा आहे

---

* भाई संगारे – दै. नवशक्ती, मुंबई. ६ डिसेंबर, १९८४.

आणि यातच पँथरचे वेगळेपण आहे. बहिष्कृत आणि अस्पृश्य म्हणून माणसावर होणाऱ्या अन्यायाविरुद्ध पँथर आवाज उठवते. भारतीय समाजव्यवस्थेमध्ये जात आणि वर्ग असे सुटे करताच येत नाहीत; त्यामुळे जातिअंताचा आणि वर्गअंताचा लढा अधिक जटील झालेला आहे.

भारतीय दलित पँथरने लढविलेला नामांतराचा लढा किंवा मंडल आयोगाचा लढा हा मला सांस्कृतिक लढाच वाटतो. मंडल आयोग आणि नामांतराच्या निमित्ताने दलित समाजात 'हक्कासाठी संघर्ष करण्याची' भावना रुजवणे, त्याचबरोबर इतरांना आपले प्रश्न समजावून सांगून जनमत निर्माण करणे हे महत्त्वाचे कार्य पँथरने केलेले आहे. राखीव जागांचा लढा हा निव्वळ राखीव जागांचा लढा नसतो, तर त्यामागे अनेक सांस्कृतिक संदर्भ दडलेले असतात. नामांतराचेही तसेच आहे. साहित्य संमेलनावर नामांतरासाठी पँथर्स जेव्हा मोर्चा काढतात, तेव्हा त्यांना माहीत असते की, साहित्य संमेलनातील ठरावाने हा प्रश्न सुटणार नाही; पण वारंवार आपली मागणी या ना त्या मार्गाने जनतेपुढे सतत मांडणे, आपल्या प्रश्नांची चर्चा घडवून आणणे, आम्ही आमच्या मागणीवर अजून ठाम आहोत, हा निर्धार निदर्शनास आणून देणे आणि त्या निमित्ताने समता, स्वातंत्र्य, न्याय आणि बंधुता हा विचार समाजात रुजवणे, हे कार्य या प्रतीकात्मक लढ्यातून पँथरने प्रभावीपणे केलेले आहे.

दलित पँथरने आपल्या आक्रमक आणि लढाऊ भूमिकेमुळे दहशत निर्माण केलेली आहे. यजमान संस्कृतीला असे धक्के देणे फार महत्त्वाचे असते. 'नामांतराच्या लढ्यामुळे प्रबोधनाचा इतिहास शंभर वर्षे मागे गेला आहे किंवा सवर्ण-दलितांमध्ये दरी निर्माण झाली आहे' असे ऐकायला मिळते, हे साफ झूठ आहे. खरेच प्रबोधन झाले असते तर अशा माणूसद्रोही, समाजद्रोही जातीय दंगली पेटल्याच नसत्या. प्रबोधन हे कदापिही मागे जाणारे नसते. प्रबोधन कोणी केले, कधी केले याचे एकदा मोजमाप द्या. दलित-सवर्णांमध्ये दऱ्या अनेक वर्षांच्या आहेत. त्या नव्याने निर्माण झालेल्या नाहीत. दलितांनी आहे ती व्यवस्था निमूटपणे स्वीकारली तर कुठलेच प्रश्न निर्माण होत नाहीत.मग प्रबोधनाचा लढाही मागे जात नाही किंवा दऱ्याही निर्माण होत नाहीत, असे हे समीकरण आहे. दलितांनी जेव्हा जेव्हा हक्कांची भाषा केली आहे, तेव्हा तेव्हा त्यांच्यावर हल्ले झालेले आहेत. या हल्ल्यांचे स्वरूप 'आहे ती व्यवस्था कायम टिकवून ठेवणे' हे असते, सवर्ण आणि दलितांतल्या या केवळ दऱ्या नसतात.

'दलितांनी राष्ट्रीय प्रवाहात सामील व्हावे' ही भूमिकादेखील बौद्धिक दिवाळखोरीचीच असते. सवर्णांचा प्रवाह हा 'राष्ट्रीय प्रवाह' आहे आणि दलितांचा प्रवाह अराष्ट्रीय आहे का ? समता-स्वातंत्र्य-बंधुता आणि न्यायाच्या

मागणीसाठी होणारे दलितांचे हे लढे लोकशाही स्वरूपाचे सहजीवन मागणारे आहेत. हे खरे आहे की, इथल्या प्रस्थापित विषम व्यवस्थेविरुद्ध ते उद्धट, घाणेरडे आणि विद्रोही बोलतात. त्यांच्या उद्धटपणामागे एक समाजशास्त्र आहे. ज्यांना कोणाला पँथरला राष्ट्रद्रोही ठरवायचे असेल, त्यांनी तसे खुशाल ठरवावे.

' दलित पँथरच्या भूमिकेत जहालपणा अधिक दिसून येतो. ज्या देशात स्त्रीची अब्रू सुरक्षित नाही, त्या देशाचे आम्ही शत्रू आहोत, असे म्हणण्याची हिम्मत असणे, म्हणजे निश्चितच गंमत नव्हे. त्यासाठी धैर्य लागते. होणाऱ्या परिणामांची जाणीव ठेवून ते भोगण्याचीही तयारी असावी लागते. कोणाला असे वाटेल, या जहाल अतिरेकी मार्गाचा अवलंब करून दलितांच्या समस्या सुटू तर शकणार नाहीतच; उलट त्या अधिक जटील व्हायला लागतील. हा कोणासाठी कदाचित वेगळचा चर्चेचा विषय होईल; परंतु या जहाल मार्गाचा अवलंब केल्याने दलितांतील आत्मविश्वास वाढीला लागण्यासाठी मदत होईल. ' † पँथर्सच्या जहाल भूमिकेमुळे दलित तरुण या संघटनेकडे जसे आकर्षिले जात आहेत, तसेच पँथर्सच्या दराऱ्यामुळे अन्याय करणाऱ्यांवर जरव वसली आहे, हे नाकारता येत नाही.

' या देशात सवर्ण हिंदू वहुसंख्यांक आहेत; यामुळे मतदान गुणवत्तेवर न होता जातीच्या आधारावर केले जाते. यामुळे अर्थातच शासन, न्याय व विधिमंडळे ही सवर्ण हिंदूंची मालकी आहे. सर्वच्या सर्व बागायत शेतजमीन सवर्ण हिंदूंच्या ताब्यात आहे. जिराईत जमीनसुद्धा सवर्ण हिंदूंकडेच आहे. या देशातील वृत्तपत्र व्यवसाय सवर्ण हिंदूंच्या मालकीचा आहे. इतकेच काय, हवा, पाणी, आकाश इत्यादी निसर्गशक्तींवरदेखील केवळ सवर्ण हिंदूंचाच ताबा आहे. अमेरिकेत निग्रोंवर अन्याय-अत्याचार होतात; परंतु विहिरीचे पाणी वाटवले म्हणून वहिष्कार टाकून निष्पाप लेकराबाळांना उपाशी मारले जात नाही. मार्क्सने ज्या वेळी वर्गलढ्याचे तत्त्वज्ञान सांगितले होते, त्या वेळेस त्याच्यासमोर असंख्य जातिजमातींनी बरबटलेला हिंदू समाज नव्हता. यासाठी या देशातील दलितांच्या सर्वांगीण मुक्तीसाठी मार्क्स जसाच्या तसा सांगणे हा शहाणपणाचा मार्ग नाही; म्हणून दलित पँथरने दलितांच्या सुटकेच्या मार्गाचा नीट अभ्यास केला पाहिजे. या देशात निसर्गाचा दुष्काळ केव्हा तरी येतो; परंतु वैचारिक दुष्काळ गेल्या तीन हजार वर्षांचा आहे. या देशात फक्त लोकशाहीचा सांगाडा वावरतो आहे. तमाम दलितांना वरोबर घेऊन दलित पँथरला त्यामध्ये प्राण निर्माण करता येईल. ' *

---

† सचिन तासगावकर : ' आम्ही, ' १९७३.

* अशोक गोडघाटे : ' आम्ही, ' दि. अं. १९७३.

प्रा. जोगेंद्र कवाडे यानी नामांतराचा लढा उग्रपणे लढविला. नागपूर ते औरंगाबाद हा लाँग मार्च त्यानी नामांतरासाठी काढला होता. नामांतराची मागणी करण्यासाठी महाराष्ट्रभर ' लाँग मार्च ' निघाले होते. प्रा. जोगेंद्र कवाडे यांची ' दलित मुक्तिसेना ' ही पँथरप्रमाणे दलित युवकांची जहाल संघटना आहे. ' तोड के दिया पाकिस्तान, छीन के लेंगे दलितस्थान ' अशा घोषणा या संघटनेने दिलेल्या आहेत; पण भारतीय दलित पँथर ' दलितस्थान 'च्या भूमिकेशी सहमत नाही. तिची निष्ठा भारतावरच आहे. प्रा. कवाडे यानी २५ जानेवारी, १९८४ रोजी ' दलित मुस्लिम अल्पसंख्यांक सुरक्षा महासंघा 'ची स्थापना केली. या संघटनेचे नेते हाजी मस्तान आहेत, या युतीलाही पँथरने विरोध केला होता.

डॉ. आंबेडकरांनंतर दलितांना खंबीर नेतृत्व लाभलेले नाही. दादासाहेब गायकवाडाना ' कम्युनिस्ट ' म्हणून चळवळीतून दूर लोटण्याचा प्रयत्न झाला, तर बाबासाहेबांच्या मृत्यूला माईसाहेब आंबेडकर कारणीभूत आहेत, असा प्रचार करून त्यांच्या राजकीय जीवनाचा खून करण्यात आला. † आता माईसाहेब आंबेडकरही भारतीय दलित पँथरबरोबर आहेत. प्रकाश आंबेडकरानी राजकारणात प्रवेश केला आहे. त्यांच्या पाठीशी त्यांच्या आजोबांची म्हणजे डॉ. आंबेडकरांची पुण्याई आहे. अकोला आणि नांदेड येथील निवडणुकांमुळे ते दलितांचे नेते म्हणून प्रसिद्धीस आले आहेत. पँथरनंतर दलित चळवळीला प्रकाश आंबेडकरांच्या रूपात एक नवे नेतृत्व मिळाले आहे. रिपब्लिकन पक्षाच्या इतर गटांपेक्षा प्रकाश आंबेडकराना जादा मते मिळाल्यामुळे ते स्वतःच्या गटालाच ' खरा रिपब्लिकन पक्ष ' संबोधू लागले आहेत. ' दलित पँथर अन्यायाच्या जाणिवेतून तरुणांनी उभी केलेली चळवळ होती. त्यांनी लढे दिले; परंतु या चळवळीला आकार देता आला नाही. ही चळवळ तोडण्यात सामाजिक, राजकीय व शासकीय व्यवस्थेने यश मिळवले, ही या चळवळीची शोकांतिका आहे. ' * हे पँथरविषयीचे प्रकाश आंबेडकर यांचे मत. त्यांना पँथर चळवळ इतिहासजमा झाल्याचे वाटते. भारतीय दलित पँथर आणि दलित मुक्तिसेना यांनी एकत्र येऊन प्रकाश आंबेडकरांचे नेतृत्व स्वीकारण्याचे ६ डिसेंबर, १९८५ रोजी जाहीरपणे मान्य केले होते. ‡ पण असे ऐक्य पुढे कधीच अस्तित्वात आल्याचे दिसत नाही.

---

† माईसाहेब आंबेडकर, सा. तरुण भारत, ६ डिसेंबर, १९८६.

* प्रकाश आंबेडकर, सा. तरुण भारत, ६ डिसेंबर, १९८६.

‡ सा. आम्रपाली, मुंबई, १ जानेवारी, १९८६.

चळवळीत तात्त्विक कारणांवरून किंवा व्यावहारिक कारणांवरून गट पडतात, वैचारिक मतभेद होऊन संघटना मोडू शकते, त्याचप्रमाणे नेतृत्वाच्या हव्यासासाठी संघटनेत फूट पडते. रिपब्लिकन पक्ष, दलित पँथर आणि दलित साहित्यिकांतील दुफळीचे दृश्य 'मार्क्सवाद की आंबेडकरवाद ?' किंवा 'आंबेडकर-मार्क्स समन्वय' असे दिसून येईल. अशा परिस्थितीत 'दुसरा तत्त्वज्ञानात्मक विद्रोह' महत्त्वाचा आहे.

रिपब्लिकन पक्ष यशवंतराव चव्हाणानी संपवला आणि बाबा आढावानी दलित पँथर फोडली असे आरोप ऐकायला मिळतात. पँथरपुरते बोलायचे झाल्यास बाबा आढावानी सा. मनोहर (पुणे) मध्ये 'दोन 'ढ' आणि मार्क्सवाद' (दोन 'ढ' म्हणजे ढाले-ढसाळ) हा लेख लिहून आपली भूमिका स्पष्ट केलेली दिसते. बाबा आढावानी पँथर फोडावी आणि पँथर फुटावी इतके पँथर नेते दुधखुळे होते की काय ?

दलित चळवळीचे गट केवळ नेतृत्वाच्या प्रश्नावरून पडलेले दिसतील. सर्वजणच आंबेडकरवादी आहेत, पण कोणी कोणाचे नेतृत्व स्वीकारायला तयार नाही. जो तो स्वतःला नेता समजतो. स्वतःला आंबेडकरवादी म्हणवणाऱ्या सर्व आंबेडकरवादी गटांचे एकमेकांत जमत नाही. इतके की, काही वेळा सुरामाऱ्याने भांडणेही झालेली उदाहरणे आहेत. दलितांच्या अनेक गटांचे वादविवाद आणि त्यांच्या परीने संघटनात्मक कार्य चालू असताना, आजच्या दलित तरुणाला कोण्या तरी एकाच गटाचा कार्यकर्ता बनावे लागते. या संघटनाही स्पर्धात्मक पातळीवर जगत असतात. प्रत्येकाचे संघटनात्मक निर्णय दुसऱ्यापेक्षा वेगळे व विचित्र असतात, हे नामांतर आंदोलन आणि सार्वत्रिक निवडणुकांच्या वेळी निदर्शनाला आलेले आहेच. एका गटात बदनाम झालेला कार्यकर्ता ती संघटना सोडतो आणि तावडतोब दुसऱ्या गटात प्रवेश करून पदाधिकारी होतो. तेव्हा अशा परिस्थितीत लोकांनीच पुढाकार घ्यावा व आपली ताकद वापरून ही गटवाजी मोडून काढावी. तत्त्व, धोरण, त्याग आणि अस्तित्वाच्या प्रश्नांमुळे सहजासहजी कोणीच नेतृत्व सोडू शकत नाही. तेव्हा प्रत्येक गटाच्या लोकांनी नेत्याला ऐक्यासाठी तयार करावे. सर्व गट एकत्र आल्यानंतर लोकशाहीच्या पद्धतीने नवा नेता निवडावा हाच एक मार्ग शिल्लक आहे. खुल्या मनाने इतरांचे नेतृत्व स्वीकारण्याची तयारी दाखविल्याशिवाय दलित चळवळीतील गटवाजी संपणार नाही.

८

दलितांचा लढा हा राजकीय लढा आहे. म्हणूनच आज 'दलित पँथर' एक

राजकीय पक्ष म्हणून निवडणुका लढवीत आहे. राजसत्तेवरील पकडीचा वापर करून परिवर्तन आणि समता प्रस्थापित करता येईल, संसदीय मार्गाने आपले प्रश्न लोकशक्तीच्या जोरावर सोडविता येतील. 'दलितांची, श्रमिकांची सत्ता जेव्हा आपल्या देशात येईल तेव्हाच त्यांचे प्रश्न सुटतील. त्यांचे हित साधले जाईल. अल्पसंख्यांकांच्या आघाडीचा दृष्टिकोन 'धर्म' असून चालणार नाही. राजकीय शक्ती वाढवण्याचा दृष्टिकोन हवा.' † ही भूमिका त्यामागे आहे. देशातील पंच्याहत्तर टक्के लोक दलित आहेत आणि त्यांच्या बळावर आपण सत्ता मिळवू हा आशावाद पँथर बाळगून आहे. त्याचबरोबर हेही खरे की, दलित पँथरने समाजसेवा करायची, पोलिसांच्या लाठ्या झेलायच्या आणि रिपब्लिकनवाल्यांनी मात्र राजसत्ता उपभोगायची हे पँथर्सना पटणारे नव्हते; म्हणून १९७७ मध्ये दलित पँथरने संसदीय राजकारणात प्रवेश केला. दलित पँथरने राजकारणात प्रवेश केल्यामुळे रिपब्लिकनवाल्यांच्या राजकीय स्थानांवर गदा येईल व ते आपोआप ऐक्यास तयार होतील, असाही एक हेतू यामागे होता.

निवडणुकीच्या राजकारणातून नेतृत्व निर्माण होऊ लागल्यामुळे अशा नेतृत्वाला त्याग, सेवा, चळवळ आणि विचारांची बांधिलकी राहिली नाही. पैसा, गुंड आणि जातीच्या नावावर निवडणुका लढविल्या जात आहेत. ज्या माणसाला समाजाची आणि चळवळीची गंधवार्ताही नाही, असा माणूस निवडणुकीला उभा राहतो व एका रात्रीतून कोणत्यातरी पक्षाचा पुरस्कृत उमेदवार होतो. असेच रेडीमेड नेतृत्व दलितांच्या बोकांडी बसले आहे. राजकीय सोयीसाठी सत्ताधारी व विरोधी पक्षांच्या संगनमताने वृत्तपत्रांच्या प्रसिद्धीतून दलित नेते असल्याचा काहीजण आभास निर्माण करीत आहेत, तर काहीजण घराण्याचं नाव घेऊन नेतृत्वाची मक्तेदारी मागत असतील तर ते चुकीचे आहे. 'दलित, भूमिहीन व शेतमजूर यांच्या प्रश्नांवर स्वतःला दलित नेते म्हणवून घेणाऱ्यांनी आतापर्यंत किती आंदोलनांत भाग घेतला आहे ?' ‡ हा पँथर कमलेश यादव यांचा प्रश्न नेमक्या वस्तुस्थितीवर बोट ठेवणारा आहे.

९

आज रिपब्लिकन पक्ष एका जातीच्या अनेक गटांचा झालेला आहे. देशात

---

† रामदास आठवले : दै. नवशक्ती, मुंबई. ६ डिसेंबर, १९८४.

‡ कमलेश यादव – सा. तरुण भारत, ६ डिसेंबर, १९८६.

दलितांचे राजकारण खंबीरपणे पुढे नेणारा एकही पक्ष नाही. सर्व पक्ष आपापल्या वर्गात आणि वर्णात बंदिस्त झालेले दिसतील. तमाम दलितांना एकत्र आणणारा 'रिपब्लिकन पक्ष' असावा, ही डॉ. आंबेडकरांची आशा फोल ठरवली गेली आहे. दलित समाज 'राज्यकर्ती जमात' होऊ शकली नाही. त्यांचे राजकीय शिक्षण कोणी केले नाही; उलट त्यांना राजकारणापासून दूर ठेवून, त्यांच्या मतशक्तीचा सौदा करण्याचेच डाव राजकारणात खेळले जात आहेत.

डॉ. आंबेडकरांची रिपब्लिकन पक्षाविषयीची संकल्पना आणि दलित समाज शासनकर्ती जमात झाली पाहिजे, हे स्वप्न पूर्ण होऊ शकलेले नाही. 'भारत बौद्धमय करीन' ही त्यांची प्रतिज्ञाही अपूर्णच राहिलेली आहे. 'बौद्ध धर्माच्या स्वीकारामुळेच जाती नष्ट होतील' ‡ ही डॉ. आंबेडकरांची स्पष्ट आणि ठाम धारणा होती. जातिअंताचा लढा म्हणून या धर्मांतराकडे पाहणे महत्त्वाचे आहे.

'आपण अल्पसंख्यांक आहोत म्हणून आपल्यावर अत्याचार होतात, आपण धर्मांतर केले तर आपल्याला त्या धर्मातील लोकांचा पाठिंबा मिळेल,' ही भावनाही त्यामागे होती. असे असले तरी, धर्मांतराने दलितांचे प्रश्न सुटलेले नाहीत. बौद्धांवर अत्याचार हे होतच आहेत. त्यांचे आर्थिक दारिद्र्य तसेच आहे. म्हणून 'बौद्धांना सवलती मिळाल्या पाहिजेत' यासाठी पँथर लढाऊ भूमिका घेत आहे. शिवाय धर्मांतरामुळे दलितांच्या सांस्कृतिक जीवनात खूप फरक पडला आहे असे नाही. बौद्ध धर्माबरोबर हिंदू धर्माचरण 'नवबौद्ध' मंडळी करीत असतात, याचे कारण म्हणजे बाबासाहेबांच्या धर्मांतरानंतर धर्मप्रसार व्हावा तितक्या मोठ्या प्रमाणात झाला नाही. एकतर धर्मांतरानंतर लगेचच झालेला बाबासाहेबांचा मृत्यू आणि दुसरे म्हणजे सर्वसामान्य लोकांना ह्या नव्या धर्मप्रणाली, उपासना व आचारपद्धतीची माहिती करून देण्यासाठी प्रचारयंत्रणा नव्हती. जी 'बौद्ध विहारे' आहेत, त्यांमध्ये पंचशील त्रिसरण म्हणजे प्रार्थनेपलीकडे काहीच केले जात नाही. ही बौद्ध विहारे केवळ प्रार्थनामंदिरे न बनता, ती सांस्कृतिक केंद्रे बनली पाहिजेत. तेव्हाच हिंदू धर्माने 'धर्माधिकार' नाकारलेल्या समाजाला 'धर्माधिकार' देता येईल. केवळ 'धर्म' आणि 'जात' या दोन भावना 'माणसाला' एकत्र बांधून ठेवणाऱ्या मोठ्या शक्ती आहेत. म्हणून त्यांचे भल्याबुऱ्या मार्गाने संवर्धन करणे आणि त्याचा राजकीय उपयोग करून घेणे हे नैमित्तिक हिताचे असले तरी दूरदृष्टीने पाहिल्यास ते विघातकच आहे.

---

‡ डॉ. बी. आर. आंबेडकरांची भाषणे – खंड ६, पृ. ४६

भारतीय जनतेच्या कलावंतांकडून आणि लेखकांकडून मोठ्या अपेक्षा आहेत. लोकसत्ताक समाजवादी राष्ट्र म्हणून भारताची उभारणी करणे या गोष्टी अवलंबून आहेत. आपण सांस्कृतिक आघाडीवर कशी लढत देत आहोत यावर प्रतिक्रियावादी विचारांना लेखकांनी लेखणीने उत्तरे दिली पाहिजेत. पारतंत्र्याच्या काळात भारतीय लेखकांनी मोठे योगदान दिलेले आहे. जे सर्वसान्य माणसाविषयी लिहितात, जे सर्वसामान्य माणसांच्या बोलीभाषेत बोलतात व सर्वसामान्य जे शिकू इच्छितात, त्याविषयी लिहितात, जे सर्वसामान्यांपासून धडे घेतात तेच खरे लेखक होत. दलितांचा संघर्ष हा सांस्कृतिक संघर्ष आहे. दलित चळवळ सर्व शक्ती एकवटून प्रस्थापितांच्या विरोधात लढत असताना, दलित लेखकांनी चळवळीत लढणाऱ्या कार्यकर्त्यांचे मनोबल वाढेल, त्यांना प्रेरणा मिळेल असे लेखन केले पाहिजे. मराठी साहित्यात, किंबहुना भारतीय वर्णवादी साहित्यात, गंभीर वैचारिक चुका झालेल्या आहेत, त्याबाबत दलित लेखकांनी लिहिले पाहिजे.

दलित पँथरच्या चळवळीमुळे दलित साहित्यावर मोठा परिणाम झालेला आहे. पँथरमध्ये अनेत लेखक-कवी काम करीत आहेत. पँथर्सची उग्र भावना दलित साहित्यात व्यक्त झालेली आहे. 'पँथर्सच्या चळवळीमुळे फार मोठ्या संख्येने कविता लिहिली गेली. ह्यातील कविता भडक आणि प्रचारी अथवा शिवराळ झाली याचे कारण सांगता येईल की, पँथरचे काही तरुण पुढारी ज्या आक्रमक पोजमध्ये स्टेजवर आपले भाषण करीत असत, त्याची सहीसही नक्कल त्यांनी उचलली.' † हे दया पवार यांचे मत, या काळातील दलित कवितेवर दलित पँथरचा प्रभाव पडला होता हे स्पष्ट करणारे आहे, तर 'पँथर' कवितेची दुसरी बाजू अशी :

'या कवितेचा नायक व्यक्ती नसून समाज आहे. समाजमनातील हलकल्लोळ या कवितेतील हेलकावा आणि लय बनतो. समाजातील घडामोड कवितेची घडामोड घडविते; कारण या कवितेची पाळेमुळे जीवनाच्या तळाशी साचलेल्या विषमतेत आणि सांस्कृतिक दुभंगलेपणात खोल रुजली आहेत. ही कविता एकाच भाषिक विश्वात व्यक्त होत असली तरी, तिचे अनुभवक्षेत्र प्रांतिक मर्यादेत न सामावणारेच असते. म्हणूनच देशातल्या कानाकोपऱ्यातला अत्याचार तिच्यातून बोलू लागतो.' ‡

दलित साहित्य आंबेडकरी चळवळीचं अपत्य आहे. दलित साहित्य एक

---

† छावणी हलते आहे – प्रस्तावना.

‡ पँथर कविता – राजा ढाले.

चळवळ आहे. चळवळ आणि साहित्य या दलित चळवळीच्या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. दलित साहित्य आणि दलित चळवळीची फारकत करता येणार नाही.

११

' चळवळ जर खरोखर लोकाधिष्ठित असेल तर पुढारी आपोआप मिळतात. ज्या चळवळी अल्पायुषी ठरल्या किंवा परिणामकारक नव्हत्या, त्यांना जनमानसात स्थान मिळालेले नसते. विचाराचा चळवळीशी काय व कसा संबंध असावा आणि चळवळीची दिशा कशी असावी हे प्रत्यक्ष काम करीत असतानाच स्पष्ट होते. लीडर अनुयायी हे संबंध. संघटनेच्या अंतर्गत असलेली वैचारिक बंधने, तळच्या कार्यकर्त्याला नसलेला आवाज, त्यांच्यापर्यंत कधीच न पोहोचणारा संवाद या सर्वांमुळेच चळवळ कोणत्या दिशेला चालली आहे, हे कळत नाही. चळवळीत भाग घेणाऱ्या लोकांकडे क्रांतीचे साधन म्हणून न पाहता त्यांच्या स्वतंत्र अस्तित्वाचा एक नैतिक हक्क म्हणून चळवळीकडे पाहिले पाहिजे.

चळवळीत येणारा कार्यकर्ता ' आपण समाजाचे देणे लागतो ' या भावनेनेच काम करीत असतो. कार्यकर्त्याला संघटनेत काम करीत असताना व्यक्तिगत सुख, खासगी जीवन आणि वैयक्तिक महत्त्वाकांक्षा यांना तिलांजली द्यावी लागते. सतत थ्रिलिंग, रोमँटिक कृती करायला मिळेल अशी अनेक कार्यकर्त्यांची अपेक्षा असते. प्रत्यक्षात चळवळीत असे काही थोडेच क्षण असतात. उरलेला वेळ चिकाटीने, जिद्दीने काम करीत घालवण्याचा असतो. कितीतरी तपशिलात शिरूनच कामाला हात घालावा लागतो ! †

आज पँथर्स पै–पैशाची मदत नसताही समाजासाठी राबत आहेत. त्यांच्या भविष्याची भीषण समस्या चळवळीपुढे आहे. आर्थिक अडचणी आणि वैचारिक अपरिपक्वता यांमुळे कार्यकर्ता निराशेच्या गर्तेत कोसळण्याचा धोका असतो. ही अवस्थाच तडजोड, माघार आणि भ्रष्टाचार या वृत्तीला उजाळा देणारी असते. म्हणून कार्यकर्त्यांच्या कामाबरोबर त्यांचा अभ्यासही महत्त्वाचा ठरतो आणि त्याचबरोबर कार्यकर्त्याच्या प्राथमिक गरजा आणि चळवळीच्या मूलभूत गरजा सुटल्या नाहीत तर ती चळवळ कोठेतरी वाट चुकल्याशिवाय राहत नाही. परिस्थिती आणि समस्यांचे योग्य आकलन, आपण घेतलेल्या निर्णयाच्या दूरगामी

---

† संकल्प : संजीव खांडेकर, ग्रंथाली, मुंबई.

परिणामांची जाणीव, यशापयशाचा दुहेरी विचार, तडजोड आणि संघर्ष यांची संभाव्यता यांचा पूर्ण विचार प्रमुख कार्यकर्त्याला सामुदायिकपणे करूनच निर्णय घेता आला पाहिजे. इतरांवर निर्णय लादण्याशी कार्यकर्त्यांची प्रवृत्ती मूलतः चुकीची आहे.

दलित पँथर (ढसाळ गट)चे कार्यकर्ते एस. आर. गायकवाड यांचे मत चळवळीचे नेतृत्व व कार्यकर्ते या संदर्भात विचार करायला लावणारे आहे. ते म्हणतात, ' मुंबईच्या आदेशावर बाकीच्या छावण्या हलतात. ' राजा बोले, दल हाले ' अशी ही अवस्था. मुंबईचे नेतृत्व वाहणारे आम्ही हमाल ठरलो आहोत. गाव-पातळीवर व जिल्हा पातळीवर कार्यकर्ता मरमर राबतो आणि प्रसिद्धी, पैसा, प्रतिष्ठा मात्र मुंबईच्या लोकांनाच मिळते. ' याबरोबर हेही खरे आहे की, पँथरच्या कार्यकर्त्यांमध्ये नेतृत्वासाठी चुरस निर्माण होते आहे. जो तो स्वतःला ' रामदास आठवले ' समजतो ! नवे कार्यकर्ते निर्माण करण्यापेक्षा, त्यांचे खच्चीकरण करून पँथरचे नेतृत्व आपल्याच हाती कसे राहील, याकडेच आजच्या कार्यकर्त्यांचे अधिक लक्ष आहे. लोकांचे प्रश्न सुटणे हे कुठल्याही चळवळीने साध्य झाले पाहिजे आणि चळवळ म्हणजे हे प्रश्न सोडविणारे साधन मानली पाहिजे. लोकांच्या प्रश्नांऐवजी चळवळ महत्त्वाची बनली की नेतृत्व साध्य ठरते आणि नेतृत्वासाठी भांडण, स्पर्धा, गटबाजी, आरोप-प्रत्यारोप अशा प्रकारांना ऊत येतो. त्या सर्वांचा परिणाम म्हणजे चळवळीचे तुकडे पडणे किंवा चळवळ थबकणे असाच होतो.

अनुभवी कार्यकर्त्यांची मते, कल्पना व सूचना लक्षात घेऊनच कुठलाही निर्णय घेतला जावा. अपयशाचा धोका पत्करण्याचे सामर्थ्य, अपयशाच्या तडाख्यातही काम करण्याची हिंमत, समाजकार्याची आवड, वाचन व चर्चा या गुणांची कार्यकर्त्यांमध्ये जाणीवपूर्वक वाढ झाली पाहिजे. जेव्हा संघटनेचे पुढारी सामान्य कार्यकर्त्यांची प्रतिष्ठा राखण्याची खबरदारी घेतील आणि त्यांच्या मतांची कदर करतील, अशाच वेळी संघटना खऱ्या अर्थाने लोकशाही स्वरूपाची बनेल.

कार्यकर्त्याच्या अंगच्या राजकारणाव्यतिरिक्त वाङ्मय, क्रीडा, नाट्य, संगीत वगैरे गुणांकडे लक्ष दिले गेले पाहिजे. कार्यकर्त्याच्या व्यक्तिगत जीवनातील तीव्रतेने जाणवणाऱ्या समस्या व अडचणी जाणून घेतल्या पाहिजेत. प्रत्येकाचे विचार, कल्पना व योजना एकमेकांना समजण्यासाठी वेळोवेळी बैठका घेतल्या पाहिजेत. चळवळीच्या निधीचा चोख हिशेब दिला पाहिजे.

नागपूर येथील दलित पँथरचे कार्यकर्ते मधुकरराव दुधे यांचे मत येथे मुद्दाम नमूद करण्यासारखे आहे. ' पँथरच्या बॅनरचा व्यक्तिगत स्वार्थासाठी उपयोग करून घेण्याच्या प्रवृत्तीमुळे पँथरचा कार्यकर्ता अधिक भ्रष्ट होत आहे. ' दुधे यांची खंत

कठोर आत्मपरीक्षण करायला लावणारी आहे. पँथरच्या नावाने ब्लकमेलिंग करणाऱ्या कार्यकर्त्यांनी हे गंभीरपणे लक्षात घेतले पाहिजे आणि चळवळीचे व आपले चारित्र्य स्वच्छपणे जोपासले पाहिजे.

दलित पँथर ही तरुण रक्ताची संघटना आहे. दलित पँथर्सनी वादळासारखे अहोरात्र काम केले आहे. घरावर राख उडत असताना, भविष्याची कुठलीच हमी नसताना पँथर्स चळवळीत काम करीत आहेत. कुटुंबांना भोगाव्या लागणाऱ्या अडचणी, जुलूम व शोषण यांचा वाटा कार्यकर्त्यांनाही उचलावा लागतो. तेव्हा याही बाबीकडे समाजाने सहानुभूतिपूर्वक पाहिले पाहिजे. दलित पँथर्सचे कार्यकर्ते शिवराळ भाषण करतात, ते गुंड आहेत, पैसे खातात असा प्रचार करून ' दलित पँथर 'ला दलित समाजापासून तोडण्याचा प्रकार काही विघ्नसंतोषी व हितसंबंधी मंडळी करीत असतात. पँथरने अशा प्रवृत्तींचे दमन केले पाहिजे. डझनभर ' पँथर ' गट काम करताहेत. तसे कोणीच खऱ्या अर्थाने फार काही करतो असे नाही. आपापल्या गटाचे म्होरके म्हणवीत सचिवालय, पोलीस चौक्या, जिल्हा–तालुका कचेऱ्या, काही नोकरी देणारी कार्यालये, सभासंमेलने तेथे तो मोर्चा रचतो, घोषणा देतो. स्वतःच्या व काहींच्या जगण्याची आणि चांगलं टेचात, रंगतदार जगण्याची अर्थपूर्ण सोय करण्याचे तंत्र सगळ्यांनी आत्मसात केले आहे. कुणाचे ट्रक्स, बार, हॉटेल, मिनी बसेस, चाळी–झोपड्या, सोशल क्लब असल्याचे उघडे गुपित त्यामुळेच ठाऊक होते. बाबासाहेबांचे कार्य व कर्तृत्व हा आता घोषणेचा व पोट भरण्याचा धंदा झाला आहे, ' † या केशव मेश्राम यांच्या मताकडे दुर्लक्ष करता येणार नाही.

१२

आजच्या दलित चळवळीचं चित्र निराशजनक आहे, असे मी म्हणणार नाही. उलट चळवळ मोठ्या ताकदीनं टिकून उभी आहे. सर्वच गट व संघटना दलितांचे प्रश्न घेऊन मैदानात येत आहेत. संपूर्ण समाज चळवळमय होतो आहे. लहान मुले, स्त्रिया, वृद्ध आणि तरुण मोठ्या संख्येने आणि प्रचंड आशेने लोकशाहीच्या मार्गाने आपले प्रश्न जनतेपुढे, शासनापुढे मांडत आहेत. त्यांचे प्रश्न सुटले नाहीत तर त्यांचा लोकशाहीवरील विश्वास संपुष्टात येईल. ' मीच पहिल्या प्रथम ही राज्यघटना जाळून टाकीन. ' ‡ हा विद्रोह त्यांच्यात राजकीय असंतोष निर्माण करील.

---

† केशव मेश्राम, सा. तरुण भारत, ६ डिसेंबर, १९८६.

‡ डॉ. बी. आर. आंबेडकर : भाषण खंड ६, पृ. ८७.

दलितांपेक्षा भटक्या–विमुक्त जमातींच्या समस्या वेगळ्या आणि जीवघेण्या आहेत. त्यांच्या प्रश्नांकडे पँथरने अजून लक्ष दिले नाही. दलित महिलांच्या संघटनांकडे असेच दुर्लक्ष झालेले आहे. बिकट आणि जटील प्रश्न एकेकटचा संघटनांकडून सुटतील असे नाही. तेव्हा परिवर्तनवादी चळवळींनी एकत्र येऊन दलितांचे प्रश्न संयुक्त ताकदीच्या जोरावर मांडणे महत्त्वाचे आहे. आज परिवर्तनवादी चळवळी अलगपणे काम करीत आहेत. त्यांच्यातही गट निर्माण झाले आहेत. चळवळीतील अलगता, गटबाजी, नैराश्य संपविणे अत्यंत महत्त्वाचे आहे. तमाम परिवर्तनवादी चळवळींनी एकत्र येऊन कृतीच्या पातळीवर ठोस भूमिका घेण्याचा हा निर्णायक काळ आहे, असे मला वाटते.

२

आंबेडकरी चळवळ : पँथर

' भारतीय दलित पँथर 'ची चळवळ ही आंबेडकरी चळवळीच्या गतिमान विकासातील एक अत्यंत महत्त्वाची घटना आहे, असे मी मानतो. आंबेडकरी चळवळ ही वर्णव्यवस्थाविरोधी तत्त्वज्ञानावर उभी आहे. हिंदू धर्मव्यवस्थेने बहिष्कृतांचे हजारो वर्षे शोषण केले आहे; आजही ते अव्याहतपणे चालू आहे. या अमानुष अन्यायाविरुद्ध एक सजीव बंड म्हणून प्रत्येक पँथर कार्य करीत असतो. त्याला हा विषम विचार नेस्तनाबूत करावयाचा आहे. ' हिंदू ' या शब्दाचे आम्ही मारेकरी आहोत. आम्ही सर्वप्रथम भारतीय आहोत आणि अखेरपर्यंत, अर्थात मरणानंतरही, आमच्या प्रेताच्या अवशेषाचा शेवटचा कण नष्ट होईपर्यंत, आम्ही ' भारतीय ' म्हणूनच ओळखले जाऊ, हा आमचा विचार आहे.

आमची ' भारतीय ' या शब्दाची व्याख्या

' भारतीय दलित पँथर ' या आमच्या चळवळीच्या नावात ' भारतीय ' हा शब्द आहे. ' भारतीय ' हा शब्द अत्यंत कडवा जातीयवादी पक्ष भारतीय जनता पक्षही वापरतो; पण त्यांच्या भारतीयत्वाचे राष्ट्रीयत्व केवळ हिंदुत्व आहे. त्यांच्या भारतात हिंदूंना, अर्थात वरिष्ठवर्णीय लोकांनाच स्थान आहे. हिंदू धर्माने हिंदू धर्मातल्याच लोकांना हीन मानून त्यांना अस्पृश्य ठरवलेले आहे. या भारतात एक बहिष्कृत भारत निर्माण करण्याचे पातक या तत्त्वज्ञानात आहे. पण या विषारी,

विषम मनोवृत्तीमुळेच देशाची फाळणी झाली. आता हीच वृत्ती ' राममंदिरा 'च्या नावाने उफाळत आहे.

' राम ' हा केवळ हिंदूंचा आदर्श असू शकतो. तो मुस्लिम, शीख, ख्रिश्चन आणि बौद्धांचा आदर्श कसा होऊ शकेल ? राम हा राष्ट्रपुरुष कसा होऊ शकेल ? डॉ. बाबासाहेब आंबेडकरानी ' रामाचे गौडबंगाल ' उघडे केलेले आहे.

रामाची सावत्र आई कैकेयी, राम वनवासात जावा म्हणून हट्ट धरते, तर गौतमाची सावत्र आई गौतमी सिद्धार्थाचे पालन करते; म्हणून तर सिद्धार्थाला गौतम म्हटलं. या दोन ' आई 'तील फरक लक्षात घ्यावा. रामाचे वडील दशरथ स्त्री–हट्ट पुरवण्यासाठी, वचनमुक्त होण्यासाठी, राम वनवासात जावा असाच आग्रह धरतात, तर गौतमाचे वडील, गौतमाने वनात जाऊ नये असा आग्रह धरतात. रामाला चवदा वर्षानंतर राज्य मिळणार असते; पण सिद्धार्थ गौतमाला असे राज्य मिळणार नसते. तो जगाच्या कल्याणासाठी बाहेर पडलेला असतो.

जगाच्या कल्याणासाठी वनवास स्वीकारणारा तथागत बुद्ध कुठे आणि एका सावत्र आईच्या हट्टासाठी वनवास स्वीकारणारा राम कुठे ? आम्रपालीसारख्या वेश्येला दीक्षा देणारा तथागत कुठे आणि शूर्पणखेला विद्रूप करणारा लक्ष्मण कुठे ? अंगुलीमालासारख्या राक्षसाला शरण आणणारा बुद्ध कुठे आणि कपटाने वालीचा वध करणारा राम कुठे ? आपल्या पत्नीलाही धम्माची दीक्षा देणारा बुद्ध कुठे आणि पत्नीच्या शीलाची परीक्षा करण्यासाठी अग्निपरीक्षा घेणारा राम कुठे ? भंगी, न्हावी यांना बौद्ध धम्माची दीक्षा देणारा बुद्ध कुठे आणि तपश्चर्या करणाऱ्या शंबुकाचा वध करणारा राम कुठे ? राजहंसाचो शिकार करणाऱ्या भावाविरुद्ध बोलणारा सिद्धार्थ कुठे आणि क्रौंच पक्ष्याची हत्या झाली म्हणून काव्य सुचणारा वाल्मीकी कुठे ? सीतेला गरोदरपणात वनवासात सोडणारा राम हा क्रूरच होय. मी रामायण लिहिले असते तर सीतेला वनवासात सोडण्याऐवजी कोर्टात उभे करून रामाविरुद्ध पोटगीचा दावा दाखल केला असता. हा संताप आहे; कारण आजही ' राम–सीतेचा ' आदर्श मानला जातो. रामायण मुळातच पुरुषप्रधान संस्कृतीचे रक्षण करणारे पुस्तक आहे. ' सीता ' ही ' स्वयंवरापासून ' ते भूमिगत होण्यापर्यंत पुरुषप्रधान संस्कारांची बळी ठरलेली आहे.

आज बॉबकट करणाऱ्या, स्लीव्हलेस वस्त्रे परिधान करणाऱ्या मॉड स्त्रियाही ' वटसावित्री 'चे व्रत करताना दिसतात. त्यांच्या मनावर सतत ' सीता-सावित्री ' बिंबविली जाते. आज सत्यवान–सावित्रीची आमच्या भारताला गरज नाही. आमच्या भारताला म. फुले आणि सावित्री फुलेंची गरज आहे. स्त्री-शूद्रांना शिक्षण देणारे फुले हे खरे क्रांतिदूत आहेत. ' फुले ' हे आमचं पहिलं कृतिशील महाकाव्य आहे.

आमच्या 'भारतीयत्वा 'त भारताचे सर्व नागरिक येतात आणि त्यांची मुलं येतात. भारताचा नागरिक, मग तो कोणत्याही जातिधर्माचा असो, तो आमचा आहे, त्याची मुलं आमची आहेत. ते केवळ वरिष्ठवर्णीय हिंदू नाहीत, म्हणून त्यांना छळणारे मूठभर हिंदुत्ववादी आमचे शत्रू आहेत. आम्ही भारतावर प्रेम करतो, हिंदुस्थानवर नाही. 'हिंदुस्थान' या शब्दामुळे पाकिस्तान, खलिस्तान, दलितस्थान-सारख्या वेगवेगळ्या प्रवृत्तींचा उदय होतो. हिंदुस्थान हे हिंदुधर्माला राष्ट्रीय धर्म मानू पाहते. आमचा त्याला सक्त विरोध असणार आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी जाहीरपणे केलेली मनुस्मृतीची होळी हे आमच्या असंतोषाचे आजही प्रतीक आहे. आम्ही मनुस्मृतीची होळी अनेक वेळा करू. आम्हाला शूद्र ठरवणाऱ्या तमाम धर्मग्रंथांवर आम्ही मुतू. या धर्मशास्त्रांनीच भारत आणि बहिष्कृत भारत अशा सीमारेषा आखून ठेवलेल्या आहेत; त्या आम्ही मिटवू इच्छितो; म्हणूनच विषम तत्त्वज्ञानाचे ग्रंथ आम्ही नष्ट करू इच्छितो.

युद्धापेक्षा ग्रंथ क्रूर असतात

हिरोशिमा आणि नागासाकीवर महायुद्धात बाँब टाकण्यात आले. ही शहरं जळून खाक झाली. पुन्हा नव्यानं आज ती उभी आहेत. महाभयंकर युद्धापेक्षाही भयानक विषारी परिणाम ग्रंथाकरवी होतो. एका महायुद्धापेक्षा एखादा मनुस्मृती-सारखा ग्रंथ विनाशकारी असतो. महायुद्धाचा परिणाम पाच-दहा वर्षांवर होतो; पण अशा विषारी ग्रंथांचा परिणाम हजारो वर्षांवर होत असतो. असे ग्रंथ जाळण्याच्याच लायकीचे असतात. ज्या ग्रंथात शूद्रांविषयी अत्यंत घृणास्पद विचार मांडलेले आहेत, अशा ग्रंथांचा उपमर्द करणे आमचे नैतिक कर्तव्य ठरते.

आम्ही कुणाचा द्वेष करीत नाही. आम्हाला द्वेष पसरवायचा नाही. आम्हाला सर्व भारतीय प्रिय आहेत; पण भारतीय माणसाच्या मनात 'मनु' आहे, तो माणूस आम्हाला अप्रिय आहे. आमची लढाई ब्राह्मणांविरुद्ध नाही. आमची लढाई ही ब्राह्मण्यग्रस्त माणसाविरुद्ध आहे. ब्राह्मण्यग्रस्त विचाराचा माणूस ब्राह्मणेतरही असू शकतो. जो ब्राह्मण्यग्रस्त आहे, तो कुठल्याही जातिधर्माचा असो, तो आमचा शत्रू आहे. अशा शत्रूंविरुद्ध आम्ही लढू. आमची लढाई माणसाविरुद्ध नसून, माणसाच्या कर्मठ मनाविरुद्ध आहे. मनाविरुद्धची लढाई शस्त्राने लढता येत नाही. ती विचारानेच लढता येते. शस्त्रापेक्षा आमचा विश्वास विचारावर आहे. 'माणसा'ला महान मानणारा विचार आमच्या शास्त्रातला आहे. आम्ही 'माणसा'ला केंद्र मानतो. शोषणग्रस्त माणूस आम्हाला आमचा वाटतो. या माणसासाठी आम्ही लढतो. त्याच्यावर झालेला अन्याय आम्हाला आमचा वाटतो. ज्याच्यावर अन्याय झाला आहे, त्याची आम्ही जात पाहत नाही. अन्याय कर-

णाऱ्याला जात नसते. अन्यायाची बातमी ऐकल्या ऐकल्या आमच्या तळपायाची आग मस्तकाला जाते. ज्याच्यावर अन्याय झाला आहे, असा माणूस जर दलित असेल तर आम्ही संतापाने एकवटतो.

सामाजिक भीषण वास्तवानं आम्हाला कधीच सुखानं जगू दिलं नाही. प्रियेच्या ओठाजवळ असतानाही आम्हाला आरोळ्या ऐकू येतात; आक्रोश ऐकू येतो. आमचं आयुष्य म्हणजे अगणित नागांनी फुत्कारलेल्या फण्यांची रांग होय. आमचं मन सदैव धगधगत असतं. अत्याचार करणाऱ्यांचे गळे दाबावेत, स्त्रियांवर जुलूम करणाऱ्यांचा खून करावा, माणसाचं माणूसपण नाकारणाऱ्यांचे डोळे फोडावेत, शासनाला वेठीस धरावं, न्यायाचं राज्य आणावं या विचारानं आम्ही सदैव पेटलेले असतो. या देशावर लष्कराची जितकी निष्ठा आहे, या राष्ट्रावर संसदेची जितकी नजर आहे, या मातीवर देशभक्तांचं जितकं प्रेम आहे, त्याहीपेक्षा उदंड प्रेम आम्ही या राष्ट्रावर करतो. सवर्णांच्या उन्मत्त सत्तेनं आम्ही अस्वस्थ होतो.

आम्ही या देशाचे नागरिक आहोत. आमच्या जगण्याचा सन्मान झाला पाहिजे. आमच्या हक्क व अधिकारांचं रक्षण झालं पाहिजे. आम्हाला न्याय न देता नागरिकत्व देणं ही आमची फसवणूक होय. आम्ही या देशाची जनता आहोत; पण या देशातील लोकांकडूनच आमच्यावर अन्याय होत असतील तर आम्हाला ते अमान्य आहेत. इतरांसारखं आम्हाला ' माणूस ' म्हणून जगता आलं पाहिजे, अशी समाजरचना असणाऱ्या देशाचं स्वप्न आम्ही पाहतो. आमच्या भारतीयत्वात एका सुंदर माणसाचं स्वप्न आहे. आमचं भारतीयत्व हे सर्वप्रथम माणसाला महान मानणारं आहे. आमचं भारतीयत्व विषम तत्त्वज्ञान नाकारणारं आहे. आमचं भारतीयत्व समता–स्वातंत्र्य–न्याय व बंधुतेवर आधारित आहे. या विचाराविरोधी असणाऱ्या तमाम घटकांविरुद्ध आमची लढाई आहे. इतक्या व्यापक विचारानेच आम्ही ' भारतीय ' हा शब्द वापरतो. आमच्या ' भारतीय ' या शब्दाचा पाया ही या देशाची घटना आहे. ' भारतीय ' शब्द आम्ही सामाजिक, सांस्कृतिक आणि तितक्याच राजकीय अर्थानेही व्यक्त करीत असतो. आमचं सामाजिक, सांस्कृतिक आणि राजकीय जगणं हे ' भारतीय ' या शब्दानं व्यक्त होतं; म्हणून आम्ही ' दलित पँथर ' या संघटनेच्या नावात ' भारतीय ' हा शब्द वापरला आहे.

दलित कोण ?

भारतीय दलित पँथरने ' दलित ' या शब्दाला स्वीकारले आहे. ' दलित ' या शब्दाची व्याख्या दलित पँथरच्या नामदेव ढसाळप्रणीत जाहीरनाम्यात केलेली आहे : ' अनुसूचित जाती-जमाती, बौद्ध, कष्टकरी जनता, कामगार, भूमिहीन, शेतमजूर, गरीब शेतकरी, भटक्या जमाती, आदिवासी. ' जो जो दडपला गेला आहे, पिळला

गेला आहे., ज्याचे शोषण झाले आहे, तो माणूस आमचा मित्र आहे. त्याचा कैवार आम्ही घेतो. सर्वहारा सर्वसामान्य माणूस आम्हाला आमचा वाटतो. आम्ही ' दलित ' या शब्दाची व्याख्या मंडल आयोगात येणाऱ्या सर्व जातींना लावतो. मंडल आयोगातील तमाम समाज हा आमच्या चळवळीचा पाया आहे. त्यांनी फुले-आंबेडकरांची चळवळ समजून घेतली पाहिजे. या देशातील ऐंशी टक्के जनता ही मंडल रेषेत येते. हीच जनता आमचे कार्यक्षेत्र आहे. या राजकीय ध्रुवीकरणातूनच ' क्रांतीचे चक्र पूर्ण फिरणार आहे, ' असे आम्हाला वाटते.

क्रांतिपूर्व परिस्थितीत बहिष्कृत समाज आणि त्याचे प्रश्न आम्ही अधिक जिव्हाळ्याने सोडवतो. ' अस्पृश्यांच्या प्रश्नांसाठी आमचं संघटन आहे. ' आम्ही हे कधीच विसरू इच्छित नाही. अस्पृश्यता हा आमच्यावरील कलंक आहे. तो मिटवण्यासाठी संघर्षप्रवण असणं हे आमचं जीवन आहे. अस्पृश्यतेच्या कारणावरून झालेले सर्व अन्याय आम्ही सर्वप्रथम धसास लावतो. आमच्या कार्याचा, भूमिकेचा आणि विचारांचा पहिला उगम हा ' अस्पृश्यते 'च्या प्रश्नातूनच झाला आहे. ' अस्पृश्यता, जातिव्यवस्था आणि बहिष्कृत माणूस ' हे आमचे तातडीचे, युद्धपातळीवरचे क्षेत्र आहे. ' दलित ' या शब्दातील अस्पृश्य हा घटक आमच्या बांधिलकीतील अत्यंत महत्त्वाचा घटक आहे.

' अस्पृश्य ' माणसावर अन्याय करणारा माणूस जरी शेतमजूर, कामगार, गरीब वर्गातला असला तरी आम्ही त्याला वेठीस धरू. त्याला जाब विचारू. अस्पृश्य माणसावर अन्याय करणारा माणूस, मग तो गरीब, श्रीमंत असो, तो आमचा शत्रूच आहे. इतकेच काय, श्रीमंत अस्पृश्य माणसावर एखाद्या गरीब सवर्णानेही अन्याय करण्याचा प्रयत्न केला तर आम्ही श्रीमंत अस्पृश्याचीच बाजू घेऊ. सवर्ण गरीब आम्हाला दुय्यम वाटेल. त्याचं सवर्ण असणं आम्हाला मान्य नाही. अस्पृश्यतेच्या कारणाने होणारे अत्याचार हे आम्हाला आव्हान आहेत आणि अस्पृश्य माणसाचं रक्षण करणं ही आमची जबाबदारी आहे. या सामाजिक जबाबदारीतूनच आमचं कार्यक्षेत्र ' दलित ' माणसापर्यंत गेलं आहे. आमच्या संघटनेच्या नावात शेवटचा शब्द ' पँथर ' आहे.

' पँथर ' हे कशाचे प्रतीक ?

' ब्लॅक पँथर ' ही काळ्या लोकांची लढाऊ संघटना आहे. गोऱ्या माणसांच्या अमानुष छळाविरुद्ध लढण्यासाठी काळ्या लोकांनी ही संघटना निर्माण केलेली आहे. अन्यायाविरुद्ध उभा राहणारा काळा माणूस आम्हाला जवळचा वाटतो. त्याचा संघर्ष आम्हाला आकर्षित करतो. गोऱ्या लोकांनी काळ्यांवर केलेला अन्याय पाहून मन पेटून उठतं. काळ्यांचा लढा म्हणूनच आम्हाला 'आमचा' वाटतो.

'ब्लॅक पँथर'ची वर्णविरोधी लढाई आम्हाला संघर्ष शिकवते. अन्यायाविरुद्ध लढणारा तमाम माणूस आम्हाला आमचा वाटतो. अन्यायाविरुद्ध लढणं हेच माणसाचं खरं लक्षण.

'पँथर' हा इंग्रजी शब्द आहे. 'चित्ता' हा त्याचा अर्थ. 'चित्ता' या शब्दाचा शब्दकोषातला अर्थ आम्हाला मान्य नाही. या शब्दाला आम्ही एक सामाजिकपण दिलं आहे. शब्दकोषानं एका हिंस्र वन्य प्राण्यासाठी हा शब्दप्रयोग योजला आहे. चित्ता चित्त्याची शिकार करीत नाही. आम्ही अन्यायखोराची शिकार करू. दलित माणूस हा आमचा आहे. दलितविरोधी माणूस हा आमची शिकार असेल. अन्यायखोराविरुद्ध उभं राहताना आम्ही चित्त्याच्या आक्रमकतेनं उभं राहू. चित्त्यासारखे आम्ही चवताळलेले असू. अन्यायाविरुद्ध आमच्या नसान्‌नसा ताठ झालेल्या असतील. हिंसेला प्रतिबंध करण्यासाठी हिंसेचा वापर हे आमचं तत्त्व आहे.

हिंसेला अहिंसेनं उत्तर देता येईलही; पण आमचा तो स्वभाव नाही. आमचं भक्ष्य आम्ही सदैव शोधत असतो. शोषण, छळ, दुःख, दारिद्र्य ह्या कारणाने त्रस्त झालेल्या माणसाचं असाहाय्यपण हे आमचं भक्ष्य आहे. पँथरची आक्रमकता, पँथरचं भक्ष्य शोधणं, पँथरची सावधगिरी, पँथरचो तडफ आणि झडप आम्हाला मोहविते; म्हणूनच आम्हाला पँथरविषयी आकर्षण वाटते. आम्ही स्वीकारलेला 'पँथर' हा शब्द वन्य प्राण्याचं द्योतक नाही. तो आहे आमच्या तडफदार आणि अन्यायाविरुद्ध झडप घेणाऱ्या प्रवृत्तीचं प्रतीक.

आमचा विचार हा आंबेडकरी विचार आहे

डॉ. बाबासाहेब आंबेडकरानी सरकारी महाविद्यालयात प्राध्यापक असतानाही साऊथबरो कमिशनपुढे अस्पृश्यांच्यावतीने कैफियत मांडली होती. ही अस्पृश्यांची कैफियतच आम्हाला आमचा आरंभबिंदू वाटते. १९२० साली बाबासाहेबानी 'मूकनायक' नावाचे साप्ताहिक सुरू केले. इथे आमच्या विचारशक्तीचा उदय होतो. १९२४ साली बाबासाहेबानी अखिल भारतीय बहिष्कृत हितकारिणी सभेची स्थापना केली आहे. ही सभाच आमची जन्मभूमी आहे. बाबासाहेबानी अस्पृश्यांच्या हिताला केंद्र मानून अनेक चळवळी केलेल्या आहेत. या चळवळीच आमचं प्राणसूत्र आहे. बाबासाहेबांची साहित्यसंपदा हा आमचा खरा विचार आहे.

डॉ. बाबासाहेबानी समाजाचं प्रबोधन केलं. आपल्या अनुयायांना शिकवलं. समाजाला चळवळमय बनवलं, समाजाला संघटित केलं, संघटना बांधल्या आणि अस्पृश्यांच्या हक्कांचे रक्षण करण्यासाठी संघर्ष केला. बाबासाहेबानी आपल्या चळवळीचं सूत्र मांडलं आहे, 'शिका, संघटित व्हा, संघर्ष करा.' शिका याचा अर्थ एकट्यानं शिकणं नव्हे. सर्व समाजानं शिकणं होय. बाबासाहेबांच्या 'शिका' या

शब्दाचा अर्थ म्हणजे केवळ ' साक्षर ' होणं नव्हे; ' प्रौढ साक्षरता ' नव्हे. 'शिका' याचा अर्थ पदव्या कावीज करणं नव्हे. शिक्षणानं अस्पृश्य समाजात आमूलाग्र बदल झाला पाहिजे, शिक्षणामुळे त्याला हक्क–अधिकारांची भाषा कळली पाहिजे. शिक्षणामुळे त्याला न्याय–समता–स्वातंत्र्य व बंधुतेचा अर्थ कळला पाहिजे, शिक्षणामुळे त्याचं माणूसपण जागं झालं पाहिजे. त्याला स्वाभिमानाचा, अस्मितेचा अर्थबोध झाला पाहिजे. शिक्षणामुळे जागा झालेला माणूस चळवळीचा पाईक झाला पाहिजे. तो समतेचा कार्यकर्ता बनला पाहिजे. शिक्षणामुळे माऱ्याच्या आणि मोक्याच्या जागा त्याने पटकावल्या पाहिजेत. शिक्षणामुळे त्याचे अज्ञान दूर झाले पाहिजे आणि त्याने आपली पिढी घडवली पाहिजे. शिक्षणामुळे केवळ नोकरी न करता, नोकरी करीत तो चळवळीचा आधार बनला पाहिजे. शिक्षणाने त्याच्यातला कार्यकर्ता जागा झाला पाहिजे. संपूर्ण समाज या जाणिवेतून शिक्षित झाला पाहिजे. शिक्षणाने त्याला समाजाचे प्रश्न कळले पाहिजेत. सर्वच समाज आपल्या प्रश्नासाठी जागा झाला तर चळवळ बांधणे सोपे होते. बाबासाहेबांच्या ' शिका ' या शब्दाची व्याप्ती खूप मोठी आहे. केवळ नेत्यांचे आदेश मानण्याचे शिकले म्हणजे कार्यकर्ता नव्हे. कार्यकर्त्याला खऱ्या अर्थाने जागरूक राहावे लागणार आहे. शिक्षणामुळे सामाजिक जाणीव वाढली पाहिजे.

बाबासाहेबांनी ' संघटित व्हा ' असं सांगितलं. संघटना ही महत्त्वाची. एक माणूस आपले प्रश्न सोडवू शकत नाही. दहा माणसं प्रश्न सोडवू शकतात. एक काठी मोडू शकते. दहा काठ्या एकत्र केल्या तर मोडू शकत नाहीत. संघटनेमुळे समाजात चैतन्य निर्माण होतं. संघटनेमुळे तरुण वर्ग कामाला लागतो. संघटनेमुळे सामाजिक प्रश्न सुटतात. संघटनेमुळे वाईट शक्तीवर मात करता येते. संघटनेमुळे समाज चळवळमय होतो. संघटनेमुळे समाजाला दिशा मिळते; म्हणून कोणत्याही समाजाला संघटनेची आवश्यकता असते. संघटनेपेक्षा नेतृत्वच महत्त्वाचं मानलं जात आहे; त्यामुळं संघटित होण्यापेक्षा नेतृत्व हाती घेणं महत्त्वाचं ठरत आहे. समाजासाठी संघटना होण्यापेक्षा नेतृत्वासाठी संघटना जन्मास येत आहे. समाज महत्त्वाचा, समाजाचे प्रश्न महत्त्वाचे. सामाजिक प्रश्नांपेक्षा पुढारीपण, पद याला महत्त्व देणारेच वाढले आहेत.

अशा परिस्थितीत झोकून देणारे निःस्वार्थी कार्यकर्ते पुढे येणे गरजेचे असते. नेते सत्तालोलुप बनल्यामुळे ' संघटित व्हा ' हा बाबासाहेबांचा संदेश बाजूला राहण्याची भीती निर्माण होते आहे. रिपब्लिकन पक्षाचा नाकर्तेपणा आम्हाला अस्वस्थ करतो. आमचे विकले जाणारे नेते पाहून आम्ही बेचैन होतो. या विकाऊ नेत्यांची भोई वाहण्यापेक्षा समाजकार्य आम्ही महत्त्वाचं मानतो. समाजकार्याच्या भावनेने आम्ही जगतो. बाबासाहेबांच्या ' संघटित व्हा ' या आदेशाची आम्ही

अंमलबजावणी करतो आणि आम्ही संघटित होतो. आमची संघटना बांधतो. तरुण, बेदरकार युवाशक्ती उभी राहते. ही शक्ती म्हणजेच आमची 'भारतीय दलित पँथर' होय.

'संघर्ष करा' हा बाबासाहेबांचा विचार आम्हाला सतत लढायला प्रवृत्त करतो. संघर्षावर आम्ही प्रेम करतो. आम्ही सदैव संघर्षाला उत्सुक असतो. 'अन्याया'ची वार्ता ऐकल्या ऐकल्या आमचा मेंदू कामाला लागतो. आम्ही संघर्ष-प्रवण बनतो. आमच्या प्रश्नांसाठी प्राण पणाला लावतो. दिवस म्हणत नाही, रात्र म्हणत नाही. आम्ही संघर्षाच्या पवित्र्यात जगतो. माणसावरचा अन्याय दूर करणे, त्याला न्याय मिळवून देणे हीच आमची खरी शांती असते. अन्यायाचा आम्ही शेवट-पर्यंत पाठपुरावा करतो व अत्याचार करणाऱ्याला धडा शिकवतो. अन्यायाची सोडवणूक करीत असताना आमचं प्रकरण एक सामाजिक उदाहरण ठरत असते. 'पँथर'चा दबदबा निर्माण झाला पाहिजे, अन्याय करणाऱ्याविरुद्धच नव्हे, तर अन्याय करू पाहणाऱ्याचीही झोप उडाली पाहिजे व ज्याच्यावर अन्याय झाला आहे, त्याच्यात स्वाभिमान निर्माण झाला पाहिजे, यासाठी आमचा सतत प्रयत्न असतो.

अन्यायग्रस्त माणसाचे प्रश्न समजून घेणे, त्याला विश्वासात घेणे, त्याच्यात निर्भयता निर्माण करणे, त्याला संरक्षण देणे आणि त्याच्याविरोधी गटावर कारवाई करणे हे आमचे प्रथम कार्य असते. आम्ही सैन्यासारखेच रावत असतो. घरादाराचा विचार नाही, खासगी आयुष्य नाही, आवडीनिवडीचा प्रश्न नाही, मिळेल ते खाऊन पडेल ते काम करणं आणि पुढच्याला न्याय मिळवून देणं इतकंच आम्हाला ठाऊक असतं.

बहिष्कृत हितकारिणी सभा, मजूर पक्ष, शेडचुल्ड कास्ट फेडरेशन, रिपब्लिकन पक्ष आणि पुढचा टप्पा म्हणून आम्ही 'पँथर' चळवळीकडे पाहतो. रिपब्लिकन पक्ष हा दलितांचे प्रश्न सोडविण्यासाठी अपुरा आहे, अशी आमची धारणा आहे. शिवाय दलित समाजाची एक लढाऊ ताकद म्हणून 'पँथर'सारख्या संघटनेने कार्य करणे, हे गरजेचे आहे, हे आम्ही ओळखून आहोत. सदनाबाहेर, सडकेवर, रानावनात होरपळणाऱ्यांचे समाधान करणे, त्यांच्यासाठी धावून जाणे, तळागाळात राबणारे कार्यकर्ते निर्माण करणे हे आमचं व्रत आहे. राजकारणापेक्षाही मोठं सामाजिक काम आमच्यापुढे आहे. सर्वसामान्य माणसाला निर्भय बनवणं, त्याचा स्वाभिमान जागा करणं, त्याच्या हक्क–अधिकारांसाठी त्याला संघटित करणं हे आमचं पवित्र कार्य आहे आणि त्यासाठीच आम्ही संघटित होत आहोत, संघर्ष करीत आहोत.

कामगारांसाठी लढणाऱ्या खूप संघटना आहेत. शेतमजुरांसाठी लढणाऱ्या खूप संघटना आहेत. राजकारण करणारेही खूप पक्ष आहेत. अस्पृश्यांच्या हिताचे

भांडवल करणारेही खूप आहेत. अस्पृश्यांच्या प्रश्नांसाठी लढणारे खूप कमी आहेत. अस्पृश्यांच्या प्रश्नांवर लढण्यासाठी शिस्तबद्ध अशा लढाऊ शक्तीची गरज आहे; कारण हिंदुत्ववादी आक्रमण मोठ्या ताकदीनं फोफावते आहे. 'हिंदुत्ववादी' चळवळी रोखण्यासाठी राजकीय वर्चस्व नसलेला गटागटांतील रिपब्लिकन पक्ष काहीच करू शकणार नाही, ही आमची खात्री आहे. हिंदूंचे आक्रमण थोपवण्यासाठी दलित तरुणांनी शिक्षित होणं, संघटित होणं आणि संघर्ष करणं गरजेचं आहे. दलितांची एखादी बलाढ्य ताकद कार्यरत असल्याशिवाय सवर्णांवर वचक राहणार नाही आणि दलित समाजाच्या मनात सुरक्षिततेची भावनाही वाढीस लागणार नाही. दलित माणूस निर्भयपणे जगावा, असं वातावरण निर्माण करण्यासाठी दलित तरुणांनी एकत्र येणं आम्हाला महत्त्वाचं वाटतं.

'भारतीय दलित पँथर' ही तरुण रक्ताची संघटना आहे. ती तरुणांना हाक घालते आहे. दलित माणसाच्या प्रश्नांसाठी आपण एक होऊ या. आपल्यावर हजारो वर्षांपासून झालेले अन्याय लक्षात घेऊ या. आपलं नागवलेलं माणूसपण समजून घेऊ या. आपल्या गावाबाहेरच्या वस्त्या, आपली अस्पृश्य जनता, तिचं होणारं शोषण आपण विसरू शकत नाही; कारण आपण या समाजाची मुलं आहोत. आपणच हे अस्पृश्यपण मिटवू शकतो. आपल्यातील ताकद आपणाला समर्थ करू शकते. आपला अपमानित इतिहास बदलवायचा असेल तर आंबेडकरी चळवळ आपणास पुन्हा एकदा गतिमान केली पाहिजे. रस्त्यारस्त्यांतून, चौकाचौकांतून आता संघटनेची चर्चा झाली पाहिजे. हरेक तरुण चळवळीत आघाडीवर आला पाहिजे आणि हा चळवळीचा रथ पुढे नेला पाहिजे.

३

भारतीय दलित पँथर आणि तरुण

' भारतीय दलित पँथर ' ही तरुणांची संघटना आहे. या संघटनेत दलित तरुणांचा अधिक भरणा आहे; कारण दलित म्हणून छळ होणाऱ्या समाजातील ते तरुण आहेत. विराट दलित समाजातील कुठल्याही घटकावर झालेला अन्याय त्यांना ' त्यांचा ' वाटतो. अन्यायाविरुद्ध त्यांचं असं जिवंत नातं आहे. दलित तरुण उसन्या किंवा उपऱ्या सहानुभूतीनं कार्य करीत नाहीत. काही संघटना हौस म्हणून, प्रसिद्धी मिळते म्हणून, समाजकार्य करतात. रक्तदान, नेत्रदान, वृक्षारोपण असे कार्यक्रम करतात. कधीकधी दलित मुलांना खाऊ, पुस्तकं, वह्यांचं वाटप करतात आणि वर्तमानपत्रात आपली बातमी छापून आणतात. चार पैशांचा खाऊ वाटून स्वतःकडे माणुसकीची प्रसिद्धी खेचून घेत असतात. अशा हौशी संघटना वाढताहेत. समाज-कार्याचे देखावे निर्माण करताहेत. त्यांच्या कार्यात आणि कार्यकर्त्यांत आणि आमच्या कार्यकर्त्यांत खूप फरक आहे. ते ' सेवा ' करीत असतात. आम्ही ' कार्य ' करीत असतो. हे काम आमचं आहे, ते आम्हालाच केलं पाहिजे, ही आमची भूमिका आहे. अन्याय करणाऱ्या समाजातील सवर्ण समाजसेवकांची सहानुभूती आम्हाला कुचकामी वाटते.

आमचे काही दलित तरुण अशा सवर्णांच्या संटनेतून काम करीत असतात. पण त्यांना कधीच पूर्णपणे सामावून घेतले जात नाही. सवर्ण सामाजिक संघटना दलित कार्यकर्त्यांना वापरतात. दलित कार्यकर्त्यांना बाजूलाच ठेवतात. त्यांना

प्रसिद्धी आणि प्रतिष्ठेचं काम देत नाहीत. त्यांना दुय्यम दर्जाची कामं दिली जातात. तो कधीच अशा संघटनांमध्ये महत्त्वाच्या पदी राहू शकत नाही; कारण त्याची जात सवर्णांना विसरता येत नाही. ते नेहमीच अशा कार्यकर्त्यांच्या जातीचा विचार करून त्याला टाळत असतात. अपार सहानुभूतीनं त्याला वागवत असतात; पण अंतरंगात मात्र अविश्वासाची भावना असते. 'हा दलित आहे. हा आक्रमकच असेल. आज ना उद्या हा दलित संघटनांना जाऊन मिळेल. आपल्या संघटनेला बदनाम करील.' तेव्हा त्याला महत्त्वाची माहिती न देता संघटनेत वागवलं जातं. सवर्ण संघटनेत रावणारा दलित तरुण अशा कोंडीत सापडतो. शिवाय आमच्या संघटनेत 'दलित' आहेत, असं प्रदर्शन करण्यासाठी अशा दलित कार्यकर्त्यांचं उदाहरण म्हणून पुढं केलं जात असतं. या सवर्ण स्वयंसेवी संघटना आपल्या पुरोगामित्वाचा टेंभा मिळविण्यासाठी 'दलित' तरुणांना जवळ करतात. या माया-जालात दलित तरुणांनी फसू नये. अशा संघटनांचा त्यांनी पंचनामा केला पाहिजे, असे आम्हाला वाटते.

दलित तरुणांची संघटना म्हणून 'पँथर' काम करते. जिवावर उदार होऊन लढणारे कार्यकर्ते या संघटनेकडे आहेत. आपणही या संघटनेत असलं पाहिजे; कारण ही संघटना अन्यायाविरुद्ध निकराने लढणारी संघटना आहे. दलित तरुणांनी इतर कुठल्याही संघटनेत न जाता या संघटनेत आलं पाहिजे. सवर्ण तरुणांनाही या संघटनेत येता येईल. आमचे दरवाजे खुले आहेत; पण या कार्यकर्त्यांना आमचा सवर्णरोष सहन करावा लागेल. आमच्या वेदपुराणविरोधी भावना जाणून घ्याव्या लागतील. आमच्या जातिव्यवस्थेविरोधी असलेल्या तीव्र भावना आमच्या चर्चेतून नेहमीच व्यक्त होतात. आम्ही देवाधर्माविरुद्ध उद्धटपणे बोलतो तेव्हा हळवा सवर्ण कार्यकर्ता आमच्यात रमू शकत नाही; कारण तो एक सवर्ण मन घेऊन आमच्यात वावरत असतो. त्याला पूर्णपणे दलित व्हावं लागेल. त्याला आमची भाषा व भावना घेऊन जगावं लागेल; तरच तो आम्हाला आमचा वाटेल. जोवर त्याच्या चेहऱ्यावर अस्वस्थता दिसते, डोळ्यांत जखमीपण जाणवते, तोवर हा सवर्ण कार्यकर्ता आपलं सवर्णपण विसरू शकत नाही. आमच्याबरोबर येणाऱ्या कार्यकर्त्याला जातिव्यवस्थेविरुद्ध लढावे लागणार आहे. जो मनातल्या जातीविरुद्ध लढू शकत नाही, तो समाजातल्या जातीविरुद्ध काय लढणार ? सर्वप्रथम त्याने मनातून जात काढून टाकली पाहिजे.

आमची मदार ही दलित तरुणावर आहे. तोच जातीयतेच्या प्रश्नांवर आक्रमकपणे लढू शकेल, असा आमचा विश्वास आहे; कारण त्याची वेदना आणि बहिष्कृत समाजाची वेदना एक आहे. म्हणून विद्रोहाचं नातंही एक आहे. दलित तरुणांनी लक्षात घेतलं पाहिजे की, हजारो वर्षांच्या विषमतेविरुद्ध लढण्यासाठी

आपणाला एक व्हायचं आहे. तेव्हा आपण गटागटांत विभागलो तर आपलाच पराभव होणार आहे. आपलं वैमनस्य विषमतेशी आहे. तेव्हा सर्व दलित तरुणांनी एकाच संघटनेत सामील होणं गरजेचं आहे. काही स्वार्थी नेते दलित तरुणांना विभागून ठेवीत आहेत. स्वतःच्या नेतृत्वासाठी नव्या संघटना काढीत आहेत. त्याचं पद्धतशीर खच्चीकरण करीत आहेत. त्याची दिशाभूल करीत आहेत. तेव्हा दलित तरुणांनी दलित तरुणांच्या बलाढ्य संघटनेतच राहावं. छोट्या छोट्या अस्तित्वहीन संघटनेत तुम्हाला कसली आव्हानं मिळणार आहेत ? गल्लीबोळातल्या संघटना तुमच्या तरुण रक्ताला काय काम देणार आहेत ? चारचौघांच्या संघटनांमध्ये कसलं सामर्थ्य असणार आहे ? तुम्ही एका समर्थ संघटनेचे सभासद व्हावेत; ज्यामुळे तुम्हीही समर्थ व्हाल आणि संघटनेचं सामर्थ्यही वाढेल.

पुढाऱ्यांच्या, पक्षाच्या कळपात राहणं म्हणजे आपण आपल्या तारुण्याचा, स्वतंत्र बुद्धीचा अपमान करणंच होय. सर्व दलित तरुणांनी एक झालं पाहिजे.आपले पुढारी एक होत नाहीत; कारण त्यांचा राजकीय स्वार्थ आडवा येतो. त्यांना समाज महत्त्वाचा वाटत नाही; सत्ता महत्त्वाची वाटते. ज्यांना समाज महत्त्वाचा वाटतो, त्यांनी पुढाऱ्यांची पाठ सोडली पाहिजे. दलित तरुणांना हे वेळीच कळले पाहिजे. बाबासाहेबांच्या विचाराने भारावलेला तरुण हा गटागटांत का लोळतो आहे ? आंबेडकरवादी तरुण हा छोट्याछोट्या संघटनांत का रावतो आहे ? त्याला विशाल नेतृत्व नको आहे का ? त्याला आपली बलाढ्य ताकद नको आहे का ?

दलित तरुणांनी छोट्या संघटनांचा राजीनामा दिला पाहिजे. इतकेच नव्हे तर या संघटना मोडीत काढल्या पाहिजेत. दलित तरुणांची दिशाभूल करणाऱ्या संघटना संपल्या पाहिजेत. दलित तरुणांनी छोट्या छोट्या संघटनांमध्ये विभागणाऱ्या अपरिपक्व, आपमतलबी नेत्यांविरुद्ध भांडलं पाहिजे. तरुण शक्ती विघटित ठेवणाऱ्या नालायक नेतृत्वावर ' पँथर ' हल्ला करते.

भारतीय दलित पँथरला दलित तरुणांची एक लढाऊ संघटना बांधावयाची आहे. दलित तरुणांनी हे आव्हान ओळखलं पाहिजे. दलित तरुण पँथरवादी झाला पाहिजे, हा आमचा प्रयत्न आहे. सर्वच तरुण एका संघटनेत येतील तेव्हा एक दरारा निर्माण होईल. दलित तरुणांनी दलित समाजाची ताकद वाढविण्यासाठी पँथरमध्ये येणं गरजेचं आहे. त्यांनी स्वार्थ आणि सत्ता सोडून पँथरमध्ये यावं. पँथरच्या कार्याला वाहून घ्यावं.

काही ठिकाणी देवाला मुलं वाहण्याची प्रथा आहे. मुलांना पोतराज, देवदासी, वाघ्या, मुरळी करण्यापेक्षा आम्हाला द्या. मुलांना भिकारी, गुन्हेगार करण्यापेक्षा आम्हाला द्या. मुलांना रस्त्यावर फेकण्यापेक्षा आम्हाला द्या. आम्हाला मानवी शक्ती

व बुद्धी हवी आहे. ही शक्ती भारताला खऱ्या अर्थानं ' सुजलाम् सुफलाम् ' करण्यासाठी आम्हाला खर्च करावयाची आहे. गावागावांत दलित वस्त्या ठेवून हा देश समृद्ध होऊ शकत नाही. दलित वस्त्यांतील दारिद्र्य संपल्याशिवाय हा देश सुखी होऊ शकत नाही. हा देश दलितांच्या तळहातावर तरला आहे. आमच्या श्रमांवर हा देश जगतो आहे. देशाबरोबरच आम्हाला आमच्याही समाजाची सेवा करायची आहे. हे काम खूप मोठे आहे. यासाठी आपण आपली मुलं आम्हाला द्या. आम्ही तुम्हाला समता देऊ, न्याय देऊ, स्वातंत्र्य देऊ, बंधुता देऊ. प्रत्येक घरातला एकेक तरुण आम्हाला हवा आहे; कारण प्रत्येक घर या व्यवस्थेची शिकार बनलेलं आहे.

या व्यवस्थेविरुद्ध प्रत्येकालाच लढायचं आहे. पँथर एकाकी लढेल; पण पँथरला सदासर्वकाळ एकाकी लढायचं नाही. पँथरची चळवळ ही प्रत्येकाची चळवळ झाली पाहिजे. पँथरची चळवळ ही घराघरांतून फोफावली पाहिजे. पँथर म्हणजे काही भडक डोक्याच्या तरुणांची संघटना नाही. ही संघटना संपूर्ण दलित समाजाची संघटना आहे. ती संपूर्ण दलित समाजासाठी काम करते आहे. तिला दलित समाजाचे संपूर्ण स्वातंत्र्य अस्तित्वात आणावयाचे आहे.

भारतीय दलित पँथरला एकाकी लढण्यात स्वारस्य नाही. तिला समाजच लढाऊ बनवायचा आहे. आम्ही लढवय्ये आहोत. आम्ही लढणारे, हा आमचा बाणा नाही. आम्ही लढ्याचं नेतृत्व करतो. लढाऊ संघटना बांधतो. सर्व समाज या आंदोलनाच्या अग्रभागी आणू इच्छितो. समाजानेही सत्याग्रहातला सहभाग वाढविणे गरजेचे आहे. त्याची उदासीन वृत्ती ही घातक ठरणारी आहे. समाजाच्या पाठिंब्यावरच आम्ही उभे आहोत. समाजाशिवाय आम्ही आमचे अस्तित्व मानत नाही. समाजाबरोबरच आम्हाला आमचे कार्य करावयाचे आहे.

समाजातली मूठभर माणसं चळवळीत झोकून हा प्रश्न सुटणारा नाही. त्यासाठी समाजानेच आपले प्रश्न धसास लावणे गरजेचे आहे. फसव्या नेतृत्वावर बहिष्कार टाकण्याचे कार्य समाजाने केले पाहिजे. समाजाचा चळवळीवर दबाव असला पाहिजे. चळवळीविरुद्ध उभं राहण्याचं सामर्थ्य समाजात आलं पाहिजे, या मतांचे आम्ही आहोत. चळवळीवर लोकांचा अंकुश हवा. त्यासाठी आम्ही समाजाला क्रांतिकारक बनवू इच्छितो.

पँथरवादी तरुणाने ' पँथर 'ची शकले होऊ देऊ नयेत. पँथरचे तुकडे करू इच्छिणाऱ्यांना खडचासारखे बाजूला ठेवा. पँथरचे सर्व गट एक झाले पाहिजेत. नेते त्यांच्या काही महत्त्वाकांक्षेसाठी एकत्र येत नसतील तर त्यांना बाजूला काढा. नेत्यापेक्षा, नेत्याच्या वैयक्तिक महत्त्वाकांक्षांपेक्षा चळवळ नेहमीच मोठी असते, हे लक्षात ठेवा. चळवळीपेक्षा स्वतःला मोठा मानणारा नेता हा चळवळीचा शत्रू

असतो. अशा नेत्यापासून कार्यकर्त्यांनी सावध राहिले पाहिजे. अशा नेत्याला एकाकी पाडले पाहिजे. कार्यकर्त्यांनी नेत्याची नोकरी करू नये. त्याच्याविरुद्ध वेळोवेळी बोलण्याचं धैर्य दाखवावं. कार्यकर्ताच नेतृत्वावर अंकुश ठेवू शकतो. पँथरच्या कार्यकर्त्यांनी नेत्यापाठी न जाता चळवळीसोबत राहावं, हेच त्यांचं कर्तव्य आहे.

४

भारतीय दलित पँथर आणि राजकारण

भारतीय दलित पँथर राजकारणापेक्षा समाजकारण महत्त्वाचे मानते, याचा अर्थ असा नव्हे की, भारतीय दलित पँथर राजकारण करीत नाही. भारतीय दलित पँथर दलितांच्या राजकारणाविषयी आणि देशाच्या राजकारणाविषयी सदैव जागरूक असते; कारण आमचे सर्व प्रश्न राजकारणाशी निगडित आहेत. आमचा संघर्ष इथल्या राजकीय व्यवस्थेविरुद्धही आहे. 'आम्ही शासनकर्ते बनले पाहिजे' ही आमची महत्त्वाकांक्षा आहे; म्हणून प्रत्येक निवडणुका आम्हाला राजकीय पक्षाप्रमाणेच महत्त्वाच्या वाटतात.

आम्ही निवडणुकीचं राजकारण करू इच्छित नाही; पण निवडणुकांचं भवितव्य ठरवू इच्छितो. आम्हाला हवं असलेलं राजकारण अस्तित्वात येण्यासाठी आम्ही जीवाचं रान करू इच्छितो. प्रतिगामी सत्तेत येऊ नयेत, म्हणून आम्ही त्यांच्याविरुद्ध कार्य करू इच्छितो. बाबासाहेबांनी लोकशाहीला खूप महत्त्व दिले आहे. आम्ही या लोकशाहीची जपणूक करू इच्छितो. लोकशाहीवर आमची श्रद्धा आहे; पण लोकशाहीच्या नावाखाली आमची फसवणूक केली जाऊ नये, यासाठी आम्ही सदैव जागरूक राहतो.

आपण केवळ राजकीय लोकशाहीवर संतुष्ट राहता कामा नये. आपल्या राजकीय लोकशाहीचे सामाजिक लोकशाहीत रूपांतर केले पाहिजे. राजकीय लोकशाहीचा पाया सामाजिक लोकशाहीवर भक्कमपणे आधारल्याशिवाय राजकीय

लोकशाही टिकत नाही; पण सामाजिक लोकशाही म्हणजे तरी काय ? समता, स्वातंत्र्य व बंधुत्व या तत्त्वांवर आधारलेला जीवनमार्ग म्हणजे सामाजिक लोकशाही. ही तीन तत्त्वे वेगवेगळी मानता कामा नयेत. त्यांपैकी एक तत्त्व दुसऱ्या तत्त्वापासून वगळणे म्हणजे लोकशाहीच्या मूळ हेतूस सुरुंग लावण्यासारखे आहे. समतेपासून स्वातंत्र्याची फारकत करता येणार नाही की स्वातंत्र्यापासून समतेची फारकत करता येणार नाही किंवा स्वातंत्र्य व समता ही दोन्ही बंधुत्वापासून अलग करता येणार नाहीत. समता नसेल तर केवळ स्वातंत्र्यामुळे मूठभर लोकांचा सत्ताधारी बनेल. स्वातंत्र्याशिवाय समता असेल तर व्यक्तीचा स्वतःहून प्रथम काम करण्याचा हुरूप मारून टाकला जाईल. बंधुत्वाशिवाय स्वातंत्र्य व समता योग्य मार्गानं जाणार नाही, हे बाबासाहेबांचे विचार आमच्या लोकशाहीचे स्वरूप प्रकट करतात. सामाजिक लोकशाहीसाठी आम्ही लढत आहोत.

' आपल्याला राजकीय सत्ता मिळाल्याशिवाय आपला सामाजिक व धार्मिक उद्धार होणे अशक्य आहे. आपणास समता आणि स्वातंत्र्य मिळवायचे असेल, आपणास इज्जतीने जगायचे असेल, आपली प्रगती करून घ्यायची असेल तर देशाला मिळणाऱ्या सत्तेमध्ये आपण भागीदार झालेच पाहिजे. राजकीय सत्ता हे एक प्रभावी शस्त्र आहे. या शस्त्रास आपण देवाप्रमाणे मानले पाहिजे. आपण या शस्त्राची पूजा करावयास पाहिजे. म्हणजे या शस्त्राचा उपयोग आपणास आपल्या शत्रूवर करता येईल. राजकीय सत्तेशिवाय आपणास काही करता येणार नाही; म्हणून आपण राजकीय सत्तेसाठी झगडले पाहिजे. Politics should be the life-blood of the scheduled castes. आपला जो नाश झाला आहे, आपण आज हजारो वर्षे खितपत पडलो आहोत, त्याचे कारण आपणास राजकीय सत्ता नव्हती. ही सत्ता आपण मिळवली पाहिजे. ' हा बाबासाहेबांचा विचार आमच्या राजकारणामागे आहे; म्हणून भारतीय दलित पँथर राजकारण महत्त्वाचे मानते.

' अस्पृश्य वर्ग हा एक समाजाचा स्वतंत्र घटक आहे. भारताच्या स्वातंत्र्यावरील त्याची भक्ती इतरांपेक्षा कमी नाही; परंतु भारताच्या स्वातंत्र्याबरोबर या वर्गाला आपले स्वतःचेही स्वातंत्र्य हवे आहे. ' अस्पृश्य वर्गाचे स्वातंत्र्य मजबूत व्हावे, यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत. कायदे करण्याची शक्ती हस्तगत करायची असेल तर राजकारणापासून दूर राहून चालणार नाही.

सामाजिक आंदोलने तीव्र करीत असताना आम्ही वेळोवेळी लोकांचं राजकीय शिक्षण करू. त्यांना त्यांच्या हक्क-अधिकारांची भाषा शिकवू. त्यांना त्यांचं राजकीय हित कशात आहे, हे पटवून देऊ. आम्ही केवळ मोर्चे काढणार, आंदोलनं करणार, लाठ्या-काठ्या झेलणार आणि सत्तेपासून दूर राहणार किंवा सत्तेशी आमचे काहीच देणे नाही, अशी नकारात्मक भूमिका घेणार, हे कदापिही घडणार

नाही. आमचा राज्यकर्त्यांवर दबाव पाडू. चुकीचे राजकारण करू इच्छिणाऱ्या नेत्यांना जाब विचारू. राजकर्त्यांना हैराण करू. आमच्या प्रश्नांवर त्यांना घेराव घालू. आमची दिशाभूल होत असेल तर उग्र आंदोलन छेडू. दलित समाजाच्या तोंडाला पाने पुसण्याचा कुठलाही कुटील राजकीय डाव आम्ही हाणून पाडू. आम्ही राजकारणसंन्यास कधीच घेतला नाही. आमच्या देशात घडणाऱ्या तमाम राजकीय घडामोडी आम्हाला जीवनमरणाइतक्या महत्त्वाच्या वाटतात; म्हणून आम्ही राजकारणाकडे पाठ फिरवू इच्छित नाही.

दलितांचं राजकारण करणाऱ्या पक्षाबरोबर आमची मैत्री असेल. विशेष करून रिपब्लिकन पक्ष आम्हाला जवळचा वाटतो. हा पक्ष आमचा आहे अशीच आमची श्रद्धा आहे. रिपब्लिकन पक्षाने आंबेडकरवादी राजकारण करावे, असे आम्हाला मनापासून वाटते. रिपब्लिकन पक्षाचा पराभव, पुढाऱ्यांची आपसांतील भांडणं, त्यांची सत्तास्पर्धा पाहून आम्हाला वाईट वाटते. दलितांच्या नावावर जगणाऱ्या नेत्यांनाही आम्ही पाठीशी घालणार नाही. रिपब्लिकन नेते जर दलित समाजाची दिशाभूल करीत असतील तर तेही आमचे शत्रू होतील. आम्ही क्रूरपणे त्यांचा मुकाबला करू. त्यांच्याविरुद्ध उग्र आंदोलन उभे करू. समाजाला जागे करू. रिपब्लिकन नेत्यांवर आमची सदैव नजर आहे. ते जर आमचा विश्वासघात करीत असतील तर त्यांना आम्ही उघडे पाडू. ते आम्हाला खूप काळ फसवू शकणार नाहीत. आमचं भवितव्य ज्या राजकारणाशी निगडित, त्या राजकारणाचा स्वतःच्या स्वार्थासाठी कोणी लिलाव करीत असेल, तर आम्ही ते कधीही सहन करणार नाही.

आमच्या दलित समाजाचे हजारो वर्षांपासून हजारोप्रकारे शोषण झाले आहे. या शोषणाविरुद्ध लढण्याचा आमचा निर्धार आहे. दलित समाजाचे शोषण जर दलित पुढारी करीत असतील तर त्यांविरुद्धही आम्हाला लढणे भाग पडते. आमचा शत्रुपक्ष आहे, इथला जातीयवादी पक्ष. जातीयवादी राजकारण आम्ही हाणून पाडू. या जातीयवादानेच आम्हाला शूद्र ठरविले आहे. आमचे माणूसपण नाकारले आहे. पुन्हा जातीयवाद राजकारणाच्या रूपाने सत्तेत येण्याचा प्रयत्न करीत असेल तर आम्हाला आवाज उठविणे भाग आहे. प्रतिगामी ताकद खिळखिळी करणे, जातीयवाद्यांचा पराभव करणे, पुनर्जीवनवादी विचार जागच्या जागी ठेचणे हे आमचे कार्य आहे. जिथे जिथे जातीयवाद दिसेल, तिथे तिथे आम्ही धावून जाऊ. जातीयवाद्यांची कोंडी करू. जातीयवाद्यांचा पराभव करताना आम्हाला आनंद होतो. जातिव्यवस्थेचे उच्चाटन करणे हे तर आमचे जन्मसिद्ध कर्तव्य आहे.

जातीयवादी माणूस आम्हाला विषारी नागासारखा वाटतो. जातिव्यवस्थेचे समर्थन करणारी मंडळी पाहिली की आम्ही पिसाळतो. जातीयवाद्यांना ठेचून मारावे

वाटते. जातीयवादी हे हिंस्र पशूच्या लायकीचे असतात. त्यांच्या मनातली जातीची भावना ही माणुसकीची घोर विटंबना करणारी असते, म्हणून आम्ही त्यांचा निःपात करू इच्छितो. आम्हाला जातीयवादी तडफडून मरताना दया येत नाही. हेच त्यांचं मरण असतं. जातिव्यवस्था प्रबोधन, परिवर्तनाच्या मार्गाने आम्ही मिरव इच्छितो. जातिव्यवस्था हे हजारो वर्षांचे विष आहे. प्रसंग पडला तर आम्ही आमचे रक्त सांडूनही हा प्रश्न सोडवू इच्छितो. प्राणापेक्षाही आम्हाला आमचा स्वाभिमान महत्त्वाचा वाटतो. ज्या जातिव्यवस्थेत आमचा स्वाभिमान नाकारला जातो, ती व्यवस्था आम्ही बुटाने उडवू इच्छितो.

जातीयवाद्यांशी लढताना दलित तरुणांनी आम्हाला साथ दिली पाहिजे, दलित पुढाऱ्यांनी आमच्या मागे आलं पाहिजे, दलित समाजाचा आम्हाला सक्रिय पाठिंबा मिळाला पाहिजे, तरच ही लढाई आम्ही जिंकू. या लढाईत आम्ही एकाकी पडलो तर त्याचा दोष या समाजावरच आहे. आम्हीही माणसं आहोत, यंत्र नाही. आम्ही न्यायाच्या मार्गाने आगेकूच करणार आहोत. इतरांनीही आमची सोबत केली पाहिजे; पण कोणीच आले नाही म्हणून आम्ही थांबणार नाही. आम्हाला आमच्या बाधवांसाठी लढावे लागणार आहे. जे येणार नाहीत त्यांच्यासाठीही लढावे लागणार आहे. आम्ही कुणाची वाट पाहणार नाही. आम्हाला ती सवय नाही. संघर्ष करणं हा आमचा स्वभाव आहे. संघर्ष नसेल तर आम्हाला करमत नाही. जातिव्यवस्थे-विरुद्ध आग ओकणं हे आमचं दैनंदिन कार्य आहे. जातिव्यवस्थाविरोधी राजकारण आम्हाला हवं आहे. भारतीय लोकशाहीची आम्हाला काळजी वाटते. झुंडशाहीच्या मार्गाने जातीवादी सत्तेत येत असतील तर ही सत्ता आम्ही कधीही मान्य करणार नाही. हे बहुमत आम्हाला मान्य होणार नाही.

आमचा राजकीय पाठिंबा हा दलितांच्या सक्रिय राजकारणाला असेल. राजकीय पाठिंब्याची भाषाच बोलायची म्हटली तर आम्ही रिपब्लिकनवादी आहोत; पण जिथे रिपब्लिकन पक्षाचा उमेदवार नाही, तिथे आम्ही रिपब्लिकन पक्षाने घेतलेल्या राजकीय भूमिकेचा पाठपुरावा करू. रिपब्लिकन पक्षाची राजकीय प्रतिष्ठा वाढली पाहिजे, असे आम्हाला मनापासून वाटते. जिथे रिपब्लिकन पक्ष नसेल, तिथे आम्ही आमच्या संघटनेच्या निर्णयाची घोषणा करू. आम्हाला पुरोगामी पक्ष जवळचा वाटतो. समविचारी पक्ष आम्हाला मित्र वाटतो. आम्ही कधीच जातीयवाद्यांच्या कळपात शिरणार नाही. आम्हाला कोणीच जवळचा वाटत नसेल तर आम्ही आमचा माणूस पुरस्कृत करू.

राजकीय शक्तींना वेठीस धरण्यासाठी, राजकीय पक्षाचे लक्ष वेधण्यासाठी आम्ही निवडणुकांत राजकीय डावपेच आखू. निवडणुकांवर बहिष्कार टाकू. चुकीच्या निवडणुकांविरोधी जनमत संघटित करू. आम्ही राजकारण करू इच्छितो. भारतीय

दलित पँथर ' राजकारण ' नाकारू शकत नाही; पण निवडणुकीच्या राजकारणात उतरून ' पँथर ' राजकारण करणं पसंत करीत नाही. ' पँथर ' ही राजकीय शक्ती आहे. दबावगट म्हणून आम्ही आमचे प्रश्न धसास लावू. आम्हाला हवा तो उमेदवार निवडून आणू. आमचे प्रश्न मांडण्यासाठी सडकेपासून संसदेपर्यंत आम्ही भांडू. सदनात, सदनाबाहेर आम्ही आमच्या प्रश्नावर ठाम राहू.

आमच्या राजकारणाचा आधार ही लोकशाही मूल्यांची विचारसरणी आहे. लोकशाही जिवंत ठेवण्यासाठी आम्ही राजकारण करू इच्छितो. लोकांच्या प्रश्नांसाठी आम्ही राजकारण करू इच्छितो. राजकारण हे लोकांपर्यंत पोहोचण्याचं प्रभावी माध्यम आहे, ते आम्ही टाळू इच्छित नाही. प्रतिगामी राजकीय शक्तीचा मुकाबला करण्यासाठी आम्हाला राजकारणाबाहेर राहून चालणार नाही. राजकारणातली ' राम ' आणि ' नथुरामवादी ' प्रवृत्ती आम्हाला नष्ट करावयाची आहे.



५

दलित पँथर आणि रिपब्लिकन पक्ष

९ जुलै, १९७२ रोजी ' दलित पँथर 'ची स्थापना झाली. पँथरच्या स्थापनेमागे महत्त्वाच्या कारणांपैकी एक कारण होते, रिपब्लिकन पक्षाचा नाकर्तेपणा. रिपब्लिकन पक्ष गटवाजीत विखुरला होता. गटाधिपती सत्ता-स्वार्थात लोळत होते आणि दलित समाज अन्यायाची शिकार होत होता. रिपब्लिकन पक्षाच्या नाकर्तेपणाविरुद्धची तिखट प्रतिक्रिया म्हणून ' दलित पँथर 'चा उदय झाला.

' दलित पँथर ' ही तरुणांची संघटना होती. तिला सर्व थरांतून वाढता पाठिंबा मिळत गेला. तिचा राजकीय दबदबा वाढला. पँथरनी १९७४ च्या लोकसभा पोटनिवडणुकीत घेतलेली राजकीय भूमिका ही रिपब्लिकन पक्षाला हादरा देणारी होती. या निवडणुकीत काँग्रेस–रिपब्लिकन युतीचे उमेदवार रामराव आदिक उभे होते, तर त्यांच्याविरुद्ध रोझा देशपांडे या उमेदवार होत्या. दलित पँथरने या निवडणुकीवर बहिष्कार टाकला; त्यामुळे दलितांचं मतदान झालं नाही. परिणामी काँग्रेस–रिपब्लिकन युतीचा पराभव झाला. हा पराभव रिपब्लिकन पक्षाला खूप झोंबला. याची उलटसुलट चर्चा झाली. दलित पँथरचा वाढता प्रभाव संपविण्यासाठी रिपब्लिकन नेत्यांनी एकत्र येण्याचा प्रयत्न केला.

१९७४ साली ' दलित पँथर 'ची शक्ती वाढते आहे, म्हणून रिपब्लिकनचे ऐक्य झाले, तर १९८९ मध्ये हिंदुत्वाची शक्ती वाढते आहे म्हणून ऐक्य झाले आणि या ऐक्यात ' पँथर 'ची आहुती देण्यात आली. ' पँथर ' ही चळवळ जरी स्वतंत्र

आणि वेगळी असली तरी तिचा सुरुवातीपासूनच ' रिपब्लिकन पक्षा 'ची युवक संघटना म्हणून कार्य करण्याचा विचार होता. रिपब्लिकन पक्षाचे ऐक्य व्हावे, नेत्यांनी दलिताचं राजकारण करावं, पँथर सामाजिक संघटना म्हणून कार्य करीत राहील, असा हा आशावाद होता; पण रिपब्लिकन पक्षाचे कधीच ऐक्य झाले नाही.

रिपब्लिकन पक्षनेते सत्तास्पर्धेत मशगूल होते. पँथर ही संघटना सामाजिक प्रश्नांवर लढणारी संघटना होती; त्यामुळे रिपब्लिकन पक्षाला पँथरची राजकीय प्रतिस्पर्धी म्हणून भीती वाटत नव्हती. ' पँथर ' लढत होती आणि ' रिपब्लिकन ' मंडळी सुखासीन बनत होती. रिपब्लिकन पक्षाच्या राजकीय अस्तित्वाला धक्का देणे, राजकीय सत्ता हस्तगत करणे या उद्देशाने १९७७ मध्ये दलित पँथरने राजकारणात प्रवेश केला आहे. दलित पँथरच्या राजकीय ताकदीमुळे रिपब्लिकन पक्षाची वाताहत सुरू झाली. ही वाताहत थांबावी आणि दलितांचा एकच एक समर्थ राजकीय पक्ष अस्तित्वात यावा म्हणून दलितांच्या सर्व संघटना एकमताने बरखास्त करण्यात आल्या. रिपब्लिकनचे सर्व गट नष्ट करण्यात आले आणि रिपब्लिकन पक्षाचे ऐक्य घडवून आणले. निवडणूक डोळ्यांपुढे ठेवून राजकीय स्वार्थासाठी हे ऐक्य घडवून आणले होते. राजकीय स्वार्थ धोक्यात येताच महिनाभरात हे ऐक्य फिसकटले.

१

पक्ष म्हणजे केवळ राजकीय संघटन असते असे नव्हे, तर ते राजकीय असण्यापेक्षा अधिक सामाजिक असले पाहिजे. ज्या पक्षाच्या राजकारणाची मुळे ही समाजात खोलवर रुजलेली आहेत, तो पक्षच टिकतो. लोकाधार हा पक्षाचा मूलाधार असतो. केवळ नेते आणि कार्यकर्ते म्हणजे ' पक्ष ' असं समीकरण चुकीचं ठरतं. कार्यकर्ते नेत्यासाठी राबू नयेत, नेता सत्तेसाठी राबू नये. नेते आणि कार्यकर्त्यांनी लोकांची सेवा केली तर त्यांना लोकांकडून आपोआप सत्ता मिळू शकते; पण सत्ता मिळविण्याचे ' शॉर्टकटस् ' शोधण्यात आलेले आहेत. लोकांची सत्ता लोकांची सेवा करून मिळविण्यापेक्षा लोकांना विकत घेऊन मिळविणे हे सहज शक्य झाल्याने इथल्या भांडवलदारी पक्षांनी ' मत ' विकत घेण्याचे राजकारण केले.

या पैशाच्या सत्तास्पर्धेत निर्धन पक्षाचे हाल होणे अटळच होते; कारण निर्धन पक्षही लोकांकडे पाठ फिरवून पैशाधारी पक्षांसोबत युती करतात किंवा तुल्यबळ ऐपत नसताना आर्थिक दृष्ट्या स्पर्धेत उतरतात. पैशाचा पराभव करायचा असेल तर ' सेवा ' करणे गरजेचे होते; पण इतका वेळ आणि इतके परिश्रम

करण्याची गरज राजकारणात कुणालाच वाटत नाही. काँग्रेसने गाढवही उभे केले तर निवडून येऊ शकते, अशी अवस्था असताना आपण का रावावे, अशी निराशा राजकीय कार्यकर्त्यांच्या मनात पसरू शकते. ही राजकारणातली निराशा लोकशाहीला घातक ठरणारी आहे. एकवेळ लोकशाहीची गोष्ट बाजूला ठेवू या; पण ती दलितांचा आत्मघात करणारी आहे. यासाठी लोकांना राजकीय शिक्षण देणं गरजेचं आहे. लोकांना लैंगिक शिक्षण दिलं पाहिजे, याची खूप मोठी ओरड होते, पण लोकांना राजकीय शिक्षण दिलं पाहिजे, याची ओरड होत नाही. ' एडस् 'चा खूप प्रचार होतो; पण ' समता–स्वातंत्र्य–न्याय ' यांचा इतका प्रचार होत नाही; कारण एडस्पेक्षाही प्रस्थापित व्यवस्थेसाठी ' समता–स्वातंत्र्य–न्याय ' ही मरणबीजे आहेत. प्रस्थापित व्यवस्थेचं हितरक्षण करणाऱ्या पक्षांनी लोकांचं राजकीयीकरण करणं टाळणं काही गैर नाही; पण दलितांचं राजकारण करू इच्छिणाऱ्या कार्यकर्त्यांनी, नेत्यांनी व पक्षांनी हे जरूर केलं पाहिजे; जे रिपब्लिकन्सनी केलं नाही.

निवडणुकीच्या काळात लोकांत असणं, निवडणुका संपल्या की खुर्ची आणि खुर्चीभोवती असणं ही पक्षीय राजकारणाची हानी आहे. सतत लोकांत राहून लोकांच्या प्रश्नांवर लढणं, लोकजागर करणं, हे सततसाठी शक्यही नसतं. असं बारमाही राबण्याचं कार्य व्रतस्थ कार्यकर्तेच करू जाणे. इतका जनसंपर्क शक्य नसणे समजण्यासारखे असू शकते. पण निवडणूक ते निवडणूक असाच जर लोकसंपर्क पक्षपुढाऱ्यांचा येत राहिला तर असे पक्ष निवडणुकीच्या राजकारणात निकामी होतात. याला अपवाद म्हणजे ज्या पक्षाकडे पैसा आणि प्रबळ यंत्रणा असते, ते होत. प्रभावी प्रचारयंत्रणा केवळ पैशावरच राबवता येते. पैसा केवळ निधी-वर्गणीतून जमा करून निवडणुका लढवणे आज अवघड झाले आहे; कारण धनाढ्य उद्योगपतींच्या सौजन्याने मतपेटयाच भाग्यबंद होत असतात. असा धनाश्रय कधीच रिपब्लिकन पक्षाला लाभू शकला नाही, लाभणेही अशक्य. या दृष्टीने रिपब्लिकन पक्षाने काही दूरगामी योजना आखायला हवी होती, ते या पक्षाकडून झालेले दिसत नाही.

' रिपब्लिकन पक्ष ' हा दलितांचा पक्ष असला तरी तो दलित जातीतील केवळ एका महार या जातीचा पक्ष आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या पुण्याईवर हा पक्ष जगतोय. महार किंवा नवबौद्ध म्हणू या, या जातिआश्रय असलेल्या पक्षाची अवस्था दयनीय झालेली आहे. नवबौद्ध समाज एकगठ्ठा ' रिपब्लिकन पक्षा 'च्या हाती होता. आज हा मतदारही ' रिपब्लिकन पक्षा 'शी एकनिष्ठ राहिला नाही, कारण या पक्षपुढाऱ्यांची दलित जनतेच्या मनातील पत नाहीशी झालेली आहे. एका जातीचा जरी पक्ष असला तरी, हा पक्ष एकसंघ नसून अनेक गटातटांत

विभागला गेला आहे.

रिपब्लिकन पक्षात गटवाजी आहे म्हणून या पक्षाचा पराभव होतोय, हे म्हणणे तितकेसे बरोबर नाही. एका जातीची सर्वच्या सर्व मते पडली तरी हा रिपब्लिकन पक्षच काय, भारतात कुठलाही पक्ष एका जातीचं राजकारण करू शकणार नाही; कारण भारतीय समाजव्यवस्था इतकी जटील आहे. शिक्षण व लोकशाही यांमुळं सर्व जातिजमाती जाग्या होत आहेत आणि त्यांचं धूर्त नेतृत्व या जातींचा दबावगट म्हणून राजकारणात वापर करीत आहे. शिवाय भारतीय राजकारण पैशावरोबर जातीला प्रतिष्ठा देणारे ठरले आहे. बहुसंख्यांक जातीचा उमेदवार निवडून येण्याची शक्यता; म्हणून त्या उमेदवाराला पुरस्कृत करण्याचा प्रयत्न राजकीय पक्षाने केल्याने उमेदवारांनीही जातवाल्यांकडे जातीचा आधार घेऊन मते मागण्याचा प्रघात पडला. जातीच्या राजकारणात महार जात अल्पसंख्यांक ठरते; त्यामुळे रिपब्लिकन पक्षच काय, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचाही यामुळेच निवडणुकीत पराभव होऊ शकला. जिथे बाबासाहेबांचा आणि बाबासाहेबांच्या शे. का. फे.चा दारुण पराभव होतो, तिथं गटबाजीनं खिळखिळे बनलेल्या रिपब्लिकन पक्षाचे दिवाळे निघाले म्हणून वाईट वाटणे बालिशच ठरते.

महार जात लढवय्यी आहे. इतर बहिष्कृतांपेक्षा तिखट आहे. शिवाय सवर्णांचे सरळसरळ शत्रुत्व या जातीबरोबरच असल्याने ' महार ' किंवा ' नवबौद्ध ' उमेदवाराला सवर्ण मत देणं पसंत करीत नाहीत. त्यापेक्षा त्यांना बहिष्कृत जातीतील मातंग, ढोर व चर्मकार उमेदवार बरा वाटतो. रिपब्लिकन पक्षातील महार उमेदवाराला पराभूत करण्यासाठी विरोधी पक्षांनी किंवा काँग्रेसने महारेतरांना उमेदवारी दिली आहे. महारांविषयी बहुजन समाजात जी तेढ आहे, ती तेढ कमी होत नाही; उलट महार समाजाच्या तिखट चळवळी आणि हिंदुत्ववादी सवर्णांच्या चळवळी यामुळे महारविरोधी वातावरण निर्माण होऊ पाहत आहे. अशा वातावरणात ' रिपब्लिकन पक्षा 'चं ऐक्य घडलं तरीही एकजातीय पक्ष म्हणून भारतीय राजकारणात ' रिपब्लिकन पक्ष ' यशस्वी होऊ शकणार नाही.

मंडल आयोगात येणारा समाज जागा करून नवं राजकीय ध्रुवीकरण करण्याचा जो प्रयत्न जनता दलाने प्रभावीपणे केला, तसा प्रयत्न रिपब्लिकन पक्षाने केलेला नाही. मंडल आयोग असो, रामजन्मभूमी असो, याविषयी प्रभावी लोकमत आपल्या वाजूने ओढण्याचं काम रिपब्लिकन पक्षाला करता आलं नाही. मुळातच ' लोकचळवळ ' उभी करण्याचं सामर्थ्य हा पक्ष हरवत चालला आहे.

निवडणुकांच्या राजकारणात पैसा, जात या घटकांबरोबर गुंडगिरीला प्रतिष्ठा मिळत आहे. मतदारांना पैसे वाटण्यापेक्षा गल्लीतल्या दादाला पैसे पुरवले की तो दमदाटी देऊन एकगठ्ठा मते मिळवून देतो. मोहल्ल्यातील म्होरक्यांना त्यामुळे महत्त्व

प्राप्त होत आहे. गावपाटील, सरपंच, गुंड यांच्या धाकदपाटीला बळी पडून दलित मतदार निर्भयपणे मतदानाचा हक्क बजावतीलच असे नाही, हे लक्षात घेणे महत्त्वाचे आहे.

काँग्रेसने सुरू केलेल्या शासकीय जनकल्याणाच्या योजना दलितांच्या घरादारांपर्यंत येऊन पोहोचत आहेत. सत्तेत असल्यामुळे सत्ताधारी पक्षाला जनतेच्या कल्याणाच्या योजना राबविणे, त्यांच्या सोयीसुविधांकडे लक्ष देणे हे कर्तव्यच ठरते; पण निरक्षर मतदारांना हे सर्व त्या पक्षाच्या उपकाराचे ओझे वाटते. शिवाय प्रसारमाध्यमातून सत्ताधारी पक्षाचा सतत प्रचार होत असतो. सत्तेत असल्यामुळे त्यांना निवडणूक–यंत्रणा हाताळणे सोपे असते. असा अनुभव रिपब्लिकन पक्षाकडे नाही. ना प्रभावी प्रचारयंत्रणा, ना पुरेसे भांडवल, यामुळे पक्ष मतदारांपर्यंत पोहोचू शकत नाही.

रिपब्लिकन पक्षाच्या वतीने निवडणुकीस उभे राहणारे उमेदवार, अत्यंत दुय्यम दर्जाची माणसं असतात. माझ्यासारख्या आंबेडकरवादी लेखकाने असे लिहावे हे बरोबर नाही; पण ही वस्तुस्थिती आहे. प्रदेश पातळीवरचे नेते निश्चित अन्य पक्षाच्या उमेदवारापेक्षा तोलाचे–मोलाचे असतात; पण जिल्हा व तालुका पातळीवर जे दलित प्रतिनिधी निवडणुकीत फॉर्म भरतात, त्यांची निवडणूक लढवण्याची कुवत नसते. निवडणुकीला फॉर्म भरण्याची अगदी चढाओढच सुरू होते. आपलं नाव छापून येतं, आपल्याला प्रसिद्धी मिळते, या व्यक्तिगत हौसेसाठी ही मंडळी पक्षाला बदनाम करीत असतात. कधी कधी तर पैसे घेऊन पाठिंबा देण्यासाठीच काही मंडळी फॉर्म भरत असतात. निवडणूक म्हणजे कमावण्याचा व्यवसाय वाटल्याने अशा हौशी कलाकारांना रान मोकळे पडते. प्रतिनिधीही विकले जातात आणि समाजही विकला जातो.

निवडणुकीच्या काळात निरनिराळ्या पक्षांचे उमेदवार गल्लीत येतात, चर्चा करतात; पोस्टर, फलक, झेंडे लावतात. देण्याघेण्याची चर्चा होते. 'आम्ही तुम्हाला धर्मशाळा बांधून देऊ, आम्ही तुम्हाला तालीम बांधून देऊ' असा हा सौदा ठरतो. तालीम किंवा धर्मशाळा बांधून देणाऱ्या उमेदवाराला सर्व दलित मतदार मते देतात व संसदेत पाठवितात. त्यांच्या लेखी संसदेत जाण्याची पात्रता म्हणजे तालीम किंवा धर्मशाळा बांधून देणे असते. गल्लीतील तालीम आणि दिल्लीतील संसद अशी ही तराजूची जोखणी ठरते. याच गल्लीतून उभा राहिलेल्या उमेदवाराला तोंड चोरून फिरावे लागते, ही वस्तुस्थिती आहे. या वस्तुस्थितीकडे दुर्लक्ष करून केवळ 'रिपब्लिकन ऐक्य' होत नाही, म्हणून ओरडणाऱ्यांना राजकारण काय कळणार ?

रिपब्लिकन पक्षाचे गट असणं हे नसण्यापेक्षा अधिक हिताचे होऊ पाहत आहे. एक गट एका पक्षाबरोबर, दुसरा गट दुसऱ्या पक्षाबरोबर युती करतो; त्यामुळे कुठलाही पक्ष सत्तेवर येवो, रिपब्लिन पक्षाच्या कुठल्या तरी गटाचा फायदा ठरलेला असतोच. शिवाय दोनही पक्ष दोघांबरोबर रिपब्लिकन युती झाल्याने निळे झेंडे लावू शकतात, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या नावाने मते मागू शकतात. एका प्रभावी पक्षयंत्रणेकडून रिपब्लिकन पक्षाचाही निवडणुकीत असा प्रचार होतो, जो असाही प्रचार रिपब्लिकन पक्ष स्वतःच्या ताकदीवर करू शकला नसता. इथल्या प्रस्थापित पक्षांना दलितांची मते मिळविण्यासाठी रिपब्लिकन पक्षाबरोबर युती हवी असते. रिपब्लिकन पक्षाचे ऐक्य झाले तर त्याची कुणा एका पक्षाबरोबर युती होऊन अन्य पक्षांची गैरसोय होते; म्हणून पक्षातील असंतुष्टांना संतुष्ट करून त्यांचा गट बनविण्यात, पोसण्यात इथले राजकीय पक्षच पुढाकार घेतात. एखाद्या खऱ्या रिपब्लिकन गटाने एखाद्या पक्षाबरोबर निष्ठेने राहण्याचे ठरविले तरीही दुसरा पक्ष असंतुष्टांना फोडून त्यांच्या गटाचा पाठिंबा मिळवितात. इथल्या राजकीय शक्तींना राजकीय खेळी करायची असते. 'रिपब्लिकन पक्षाचा एकखांबी पाठिंबा तुम्हाला नाही. आम्हालाही रिपब्लिकन पक्षाचा पाठिंबा मिळाला आहे,' असा प्रचार करून मतदारांची दिशाभूल करणे व रिपब्लिकन पक्षाने निष्ठेने देऊ केलेल्या पाठिंब्याची कुचेष्टा करणे हा कुटील डाव असतो आणि हे डाव खेळू देणारी रिपब्लिकन पक्षातीलच गटपाडू मंडळी पुढे असतात, हेही लक्षात घ्यायला हवे.

रिपब्लिकन पक्षाकडे आदर्श कार्यक्रम असेल, या पक्षापुढे बाबासाहेबांचे विचार असतील, तरीही हा पक्ष खंबीरपणे रुजू शकला नाही, याचं कारण या पक्षाचं स्वतःचं असं संघटन नाही. काही नेतेमंडळी म्हणजे संघटन नव्हे. त्यांची काही पत्रकं आणि काही दौरे म्हणजे पक्ष नव्हे. गावपातळीपासून ते प्रदेशपातळीपर्यंत सभासदांची जी संघटनात्मक बांधणी असावी लागते, तशी साखळीबद्ध यंत्रणा रिपब्लिकन पक्षाकडे नाही. शिवाय दलित समाजात रिपब्लिकन पक्षाच्या अनेक गटांबरोबर इतरही याच समाजाच्या संघटना अस्तित्वात आहेत. एकाच गल्लीत त्या प्रदेशातल्या सर्वच्या सर्व संघटनांचे बोर्ड ठिकठिकाणी टांगलेले असतात. ऐक्य म्हणजे एक जाणीव आहे. या जाणिवेचा एका निश्चित विचाराच्या अनुरोधानं संघटनात्मक उपयोग करून घेता आला तरच एकोपा रुजू शकतो. अनेक संघटना, पक्षशिस्तीचा अभाव हे या पक्षाच्या पराभवाचे एक निश्चित कारण आहे.

रिपब्लिकन ऐक्य व्हावे असे कार्यकर्त्यांना वाटते, नेत्यांना वाटते आणि दलित समाजालाही वाटते. याचे कारण म्हणजे Bargaining Power यामुळे वाढून दलितांना राजकीय फायदे अधिक मिळू शकतात. ऐक्याच्या दबावामुळे इतर पक्षही युती करताना निवडणुकीत अधिक जागा देऊ शकतात. मंत्रिपद, काही कमिटचां-

बरोबर, काही मागण्याही मान्य करून घेता येतात. ऐक्यच नसेल तर इतका दबाव निर्माण होऊ शकत नाही आणि एका गटाबरोबर केलेले ऐक्य हे प्रदर्शनापुरतेच सोयीचे असते. मुख्य पक्ष दुय्यम पक्षाच्या गटाबरोबर जेव्हा युती करतो, तेव्हा त्याच्या नजरेपुढे निवडणुकीतील प्रचार महत्त्वाचा असतो. युती झाली की दुय्यम पक्षाला मुख्य पक्षाच्या ध्येय-धोरणांबरोबर राहणे भाग पडते. १९८९ चे ऐक्य घडले तेव्हा रामदास आठवले या ऐक्यबळावर 'महाराष्ट्राचे मुख्यमंत्रीपद आम्हाला मिळावे' अशी मागणी करीत होते. ऐक्य फिसकटले. केवळ बारा जागा काँग्रेसने देऊ केल्या. या बाराही जागांवर सत्ताधारी काँग्रेसबरोबर युती असून रिपब्लिकन पक्षाला पराभव पत्करावा लागला. निवडणुकीसाठी काँग्रेसने प्रत्येक उमेदवाराला एक लाख रुपये देऊ केले होते. या संदर्भात उमेदवार यशपाल सरवदेंचं मत महत्त्वाचं वाटतं. 'एकतर निवडणुकांचा अनुभव नव्हता. ऐक्य फिसकटल्याचाही परिणाम झाला. शिवाय पक्षानं आमच्याकडे योग्य ते लक्ष केंद्रित केलं नाही.'

रिपब्लिकन-काँग्रेस युतीमुळे रामदास आठवले याना मंत्रीपद आणि टी. एम. कांबळे याना विधानपरिषदेचे आमदारपद मिळाले. रिपब्लिकन-जनता दल युतीमुळे प्रकाश आंबेडकराना राज्यसभेचे सभासदत्व देण्यात आले. ही राजकीय फायद्याची बेरीज सांगता येईल. वजाबाकी म्हणजे पक्षाची पुन्हा झालेली शकले.

१९७४ साली रिपब्लिकन पक्षाचं जे ऐक्य झाले, ते 'दलित पँथर'ला मिळणाऱ्या प्रचंड यशामुळे. 'दलित पँथर'चा वाढता प्रभाव रोखण्यासाठी रिपब्लिकन पक्षाच्या गटांना एकत्र यावं वाटलं. दलित पँथरचा रेटाच असा होता की, सर्व शक्ती हादरल्या होत्या; पण १९८९ पर्यंत भाजप आणि शिवसेनेची शक्ती इतकी वाढली की संपूर्ण राष्ट्रच हादरले. शिवसेना आणि भाजपना रोखण्यासाठी पुन्हा एकदा रिपब्लिकन पक्षाला एक व्हावं वाटलं आणि हिंदुत्ववाद्यांना प्रचंड आव्हान देणारी संघटनाही हिंदुत्ववाद्यांच्या आक्रमणाला भिऊन बरखास्त करावीशी वाटली. हा पँथर चळवळीचा अस्त खूपच निराशाजनक होता. राजा ढाले आणि नामदेव ढसाळ या विद्रोही लेखकांनी चळवळीला विचार दिला; पण नंतर ते बाजूला झाले. पुढे हीच भूमिका अरुण कांबळे यानी बजावली; पण त्यानाही संघटनेतून काढून टाकले. पँथरकडे वैचारिक नेतृत्व राहिले नाही. केवळ कार्यकर्त्यांच्या झुंडी संघटना चालवू शकत नाहीत. सतत वैचारिक दिग्दर्शन करणारं नेतृत्वच संघटना जिवंत ठेवू शकतं, हे पँथरच्या बरखास्तीवरूनच कळू शकतं.

'रिपब्लिकन पक्ष' स्थापनेपासूनचा इतिहास तपासला तर हा पक्ष कधीच एकसंघ नव्हता. ऐक्याचे अनेक प्रयत्न झाले, शपथा घेतल्या गेल्या, ऐक्य झाले; पण ते कधीच टिकले नाही आणि ऐक्य टिकणारही नाही; कारण रिपब्लिकन पक्ष

जोवर युतीचेच राजकारण करणार आहे, तोवर ऐक्य म्हणजे केवळ एक नाटक ठरणार आहे. ' रिपब्लिकन पक्ष ' राजकारणात दलितांसाठी असलेल्या राजकीय राखीव जागांचे राजकारण करण्यातच स्वत:ला धन्य मानत आला आहे; त्यामुळे या पक्षाला निवडणुकीतल्या राखीव जागेच्या डबक्यापलीकडे काही दिसत नाही. शिवाय या राखीव जागेवर केवळ ' दलित उमेदवार ' उभा राहण्याची सक्ती असली तरी कुठलाही पक्ष असा उमेदवार उभा करू शकतो. भाजपसारखा जातीयवादी पक्षही राखीव जागेची निवडणूक लढवू शकतो व आपला उमेदवार निवडून आणू शकतो.

अन्य पक्षांचे उमेदवार राखीव जागेवर निवडून येत असल्याने रिपब्लिकन पक्षाचे राखीव राजकारणातले स्थानही संपुष्टात आले आहे. आता रिपब्लिकन पक्षाच्या अखिल भारतीय नेतृत्वालाही कुठल्या तरी सदनावर नेमावं लागतं. नेमण्यापुरती पत घेऊन पुढाऱ्यांनी राजकारण सुरू ठेवलं तर हा पक्षच मोडीत काढावा लागेल आणि दलित जनतेला ज्या पक्षाकडं जावं वाटेल, त्या पक्षाकडे जाण्याचं स्वातंत्र्य द्यावं लागेल. ज्या पद्धतीने पुढारी हे स्वातंत्र्य उपभोगून ' युतीचं राजकारण ' करतात, त्याप्रमाणे जनतेनेही वागायचं ठरवलं तर ?

जोपर्यंत दलित मतदारांचं राजकीय प्रबोधन होत नाही, तोपर्यंत खऱ्या अर्थानं दलितांचं खरं राजकारण सुरू होणार नाही आणि पुढाऱ्यांच्या सत्ताशर्यतीला पायबंद बसणार नाही, हे सत्य आहे.

रिपब्लिकन पक्षाच्या आघाड्याही कार्यरत नाहीत. ज्या काही संघटना असतील, त्या संघटनांचं व पक्षाचं परस्परांत कुठलंच नातं नाही. विद्यार्थी, कर्मचारी, कामगार, मजूर, स्त्रिया अशा विविध जनसमूहांत संघटन करून निरनिराळ्या आघाड्या असणे गरजेचे आहे. शिवाय लोकांच्या प्रश्नावर लोकचळवळ उभी करणे गरजेचे आहे. ' रिडल्स 'च्या प्रकरणात रिपब्लिकन पक्षाने केलेली चळवळ किंवा नामांतराच्या प्रश्नावर पँथरने उभी केलेली चळवळ या महत्त्वाच्या होत्या. चळवळीमुळेच कुठल्याही संघटनेला लोकाश्रय मिळत असतो.

रिपब्लिकन पक्षाकडं पक्षाची भूमिका मांडणारं असं कुठलं नियतकालिक किंवा दैनिक नाही. जी तुटपुंजी दलितांची नियतकालिकं आहेत, ती नीट चालत नाहीत. रिपब्लिकन पक्षासंदर्भात पुस्तकं प्रकाशित केली जात नाहीत. पक्षसाहित्याचा प्रचंड अभाव असल्यामुळे या पक्षाची अवस्था कोंडल्यासारखी झाली आहे. प्रसिद्धी आणि प्रचारासाठी सर्वस्वी इतरांच्या वर्तमानपत्रांवर विसंबून राहावे लागते. हे एका राजकीय पक्षाचे अपंगत्वाचेच लक्षण आहे. दलित लेखकांनी विपुल कविता लिहिल्या. रिपब्लिकन पक्षनेतृत्वावर कथा–कवितांतून खूप टीका झाली; पण

रिपब्लिकन पक्षाच्या राजकारणासंदर्भात टीकात्मक ग्रंथ प्रकाशित झाले नाहीत. प्रा. क्षीरसागर यांचं 'भारतीय रिपब्लिकन पक्ष' हे पुस्तक मात्र मोलाचं आहे. असे प्रयत्न संशोधनाच्या निमित्ताने निरनिराळ्या विद्यापीठांत राज्यशास्त्राच्या प्राध्यापक मंडळींनी केलेले आहेत; पण ते प्रकाशित व्हायला हवेत. पक्ष म्हणजे जनता आणि शासन यांना जोडणारा दुवा असतो. हा दुवा दुर्बल ठरता कामा नये.

२

रिपब्लिकन पक्षाला राजकारण करावयाचे असेल तर त्याला त्याचे जातीय चारित्र्य बदलल्याशिवाय इतर मतदार मत देणार नाहीत आणि असं व्यापक नेतृत्व सध्या तरी रिपब्लिकन पक्षाकडे नाही. 'अस्पृश्यांच्या हक्कांचं रक्षण' करावयाचं असेल तर भाजपसारखी आक्रमक भूमिका घेऊन रिपब्लिकन पक्षाला दलितवादी बनावं लागेल; पण हे राजकीय फायद्याचं ठरणार नाही. समविचारांना स्वीकारून रिपब्लिकन पक्षानं राजकारण करावं.

भारतीय दलित पँथर अस्पृश्यांच्या प्रश्नांवर उग्रपणे आंदोलने छेडत राहील. तिला राजकीय यशापयशापेक्षा सनातन शक्तींना ठेचणं महत्त्वाचं वाटतं. वाढतं हिंदुत्ववादी आक्रमण रोखायचं असेल तर ते केवळ मतपेटीतून रोखता येणार नाही. 'हिंदुत्ववादी' विचार हा इथल्या प्रत्येक हिंदूच्या मनात आहे. पुरोगामी हिंदूच्या मनातही 'हिंदुत्व' सुप्तरूपाने असते. राजकारण करणाऱ्यांना इतकी उघड आणि उग्र भूमिका घेणं अवघड असतं; कारण त्यांना सर्व जातिजमातींची मतं हवी असतात. त्यांना सत्ता महत्त्वाची वाटते. सत्ता टिकविण्यासाठी ते निधर्मी, समाजवादी आणि लोकशाही व्यवस्था टिकविण्याची भाषा बोलत असतात. त्यांना अल्पसंख्यांक व मागासवर्गांची मते हवी असतात.

भाजप, शिवसेनासारख्या जातीयवादी शक्ती धार्मिक भावना भडकावून मतांचं राजकारण करीत आहेत. राष्ट्रापेक्षा रामाला पूजणारा हा समाज आहे. त्यांच्या श्रद्धेचा राजकीय लिलाव होत आहे. मतपेटयांतून हे भगवे आक्रमण थोपवणे शक्य नाही; कारण लोकांची माथी भडकावण्याचं काम माथेफिरू लोक करीत आहेत. सदनाबाहेर सडकेवर या हिंदुत्ववादी लाटा अडविणं महत्त्वाचं आहे. या जातीयवादाला उत्तर देण्यासाठी कडवी ताकद हवी आहे. ती रिपब्लिकन पक्ष कधीच उभी करू शकणार नाही.

भारतीय दलित पँथर जे रिपब्लिकन पक्ष करू इच्छित नाही किंवा करू

शकत नाही, ते करू इच्छिते. आम्ही देवाधर्मावर थुंकू इच्छितो. आम्हाला शूद्र आणि अस्पृश्य ठरवणाऱ्या तमाम धर्मग्रंथांची विटंबना करू इच्छितो. हा धर्म, हे ग्रंथ आणि त्यांचे परमेश्वर जर आम्हाला अस्पृश्य लेखत असतील तर त्यांना आम्ही चपलेसारखे पायांत वापरू इच्छितो. ज्या ऋचा आणि ओव्यांत आमच्याविरुद्ध विष पेरून ठेवलं आहे, ती पानं फाडून, आम्ही वापरलेल्या निरोधाच्या पुड्या बांधू इच्छितो.

आम्हाला आमचा स्वाभिमान जीव की प्राण आहे. आमच्या स्वाभिमानाची कुचेष्टा करणारे ग्रंथ आम्हाला मान्य नाहीत. ज्या धर्मात गाईचे मूत्र पवित्र मानले जाते आणि माणसाचा स्पर्श अपवित्र मानला जातो, तो धर्म लाथेने उडविण्याच्या लायकीचाच असतो. ज्या गाईचे मूत्र तुम्ही पवित्र मानता, त्या गाईला आम्ही कापतो, तिचे मांस खातो, पचवतो आणि मुततो. तुम्ही आमचे मूत्र का पवित्र मानत नाही ? गाईला आई म्हणता आणि गाय मेल्यावर मात्र महारांना ओढायला सांगता. तुमची आई मेल्यावर आम्हाला बोलवा. आम्ही तिला मृत जनावराप्रमाणे ओढू, फाडू; कारण तिने तुमच्यासारख्या पशूंना जन्म दिलेला आहे.

मुंग्यांना साखर घालणारे तुम्ही; आम्हाला साधी भीकही वाढत नाही. विषारी नागाला दूध पाजणारे तुम्ही; आम्हाला साधे तुमच्याबरोबरीने पाणी पिऊ देत नाही. तुळस, वड व पिंपळासारख्या झाडाझुडपांची पूजा करणारे तुम्ही; आमच्या माणसांची सावलीही अपवित्र मानता. आमच्या स्पर्शाने तुम्हाला विटाळ होतो, तुमचे अन्न बाटते, परमेश्वर बाटतो, हे कसले गौडबंगाल आहे ?

ब्राह्मणाचा जन्म परमेश्वराच्या मुखातून झाला. परमेश्वराचे मुख काय स्त्रीयोनी आहे ? काय थोतांड आहे हे ? शूद्रांचा जन्म परमेश्वराच्या पायातून झाला. ते पाय आम्हाला कापून काढायचे आहेत. कुठे आहे तो भडवा परमेश्वर ? गुरू द्रोणाने आपला सवर्ण शिष्य अर्जुन बलाढ्य व्हावा म्हणून एकलव्याचा अंगठाच तोडून मागितला. अशा जातीयवादी गुरूला आम्ही जोड्यानं मारू. शिष्याला आयुष्यातून उठवणाऱ्या गुरू द्रोणांची परंपरा आजही आम्हाला भेटते.

आम्हाला हवे आहेत डॉ. बाबासाहेबाना आपले आडनाव देणारे आंबेडकर गुरुजी. आम्हाला हवे आहेत बाबासाहेब मॅट्रिक पास झाल्यानंतर त्यांचा सत्कार करणारे केळुसकर गुरुजी. गुरू द्रोण हे जोड्याच्या लायकीचे आहेत. आम्हाला आमचा समाज जागा करावयाचा आहे. त्याची शरणता संपवायची आहे. त्याला बाणेदार करावयाचं आहे. त्याच्या हातातील मृत जनावरं फाडणारा सुरा त्याच्या स्वाभिमानाचा अपमान करणाऱ्या सवर्णांच्या दिशेने उगारला पाहिजे, यासाठी आमचा प्रयत्न आहे.

एखाद्या दलिताने एखाद्या सवर्णाचा खून केल्याची आम्ही जेव्हा वातमी वाचतो, तेव्हा आम्हाला आसुरी आनंद होतो. दलित माणसाने भयगंड सोडून दिले पाहिजेत. आज कुठलाही दलित माणूस एकटा नाही. त्याच्यापाठी हजारो पँथरचे तरुण आहेत, हे त्याने सदैव लक्षात ठेवले पाहिजे. कुठल्याही दलिताने दबून वागू नये. अन्याय सहन करू नये. मी एकटा आहे म्हणून भिऊ नये. कुठल्याही खेडचा-पाडचांत अन्याय होवो, त्याचे तीव्र पडसाद उमटतील. त्याच्यासोबत एक लढाऊ चळवळ आहे. तो एका चळवळीचा माणूस आहे, हे त्याने जाणले पाहिजे. तो जन्माने दलित आहे, हीच त्याची आणि आमची खूणगाठ आहे.

जो जो दलित म्हणून जन्मतो, तो तो जन्मतःच आमचा होतो. त्याला आम्ही पँथरचे सभासदत्व देतो. तमाम आंबेडकरवादी मानव आमचे क्रियाशील सभासद आहेत. ते त्यांच्या पातळीवर आमच्या चळवळीचे काम करीत असतात. एखाद्या दलिताने बागेत जाऊन भेळ खाणे, एखाद्या दलिताने सवर्णाबरोबर भांडणे, एखाद्या दलिताने नोकरी करणे, शिकणे, संघटित होणे, सन्मानाने जगणे ही आमच्या चळवळीचीच कार्ये आहेत. इथला प्रत्येक माणूस निर्भयपणे जगला पाहिजे आणि तो निर्भयपणे जगत असेल तर अप्रत्यक्षरीत्या तो आमचंच कार्य करीत आहे, असे आम्ही मानतो.

६

सर्वप्रथम आपल्यातील जाती मिटवा

भारतीय दलित पँथर ही नवबौद्ध तरुणांची संघटना आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचार, कार्य आणि चळवळीमुळे हा समाज सर्वच क्षेत्रांत अग्रेसर राहिला आहे. जातीयवाद्यांच्या प्रत्येक हल्ल्याचा मुकाबला या समाजाने केला आहे. या जातीचे तरुण सदैव संघर्षास तत्पर असतात. इतर मागास जातीपेक्षा या समाजाची संख्या अधिक आहे. शिक्षण, नोकरी आणि चळवळीचं प्रमाण याच समाजात अधिक आहे; म्हणून भारतीय दलित पँथरमध्येही नवबौद्ध तरुणांची संख्या अधिक आहे.

मातंग, ढोर, चर्मकार, भटके, विमुक्त व आदिवासी या समाजाला पँथर-विषयी आकर्षण वाटते; पण पँथरच्या चळवळीत हा समाज येत नाही. पँथर केवळ नवबौद्धांच्या प्रश्नांवर लढत नाही; ती अखिल बहिष्कृतांच्या प्रश्नांवर लढते; पण इतर मागासवर्ग, भटका–आदिवासी समाज या चळवळीपासून दूर आहे. ओ. बी. सी. समाज तर कधी कधी जातीयवादी शक्तीच्या आहारी जाऊन ' पँथर 'विरोधी उभा राहताना दिसतो. हा सर्व प्रकार म्हणजे आपणच आपले पाय तोडण्यातला आत्मघातकी प्रकार आहे.

हिंदू समाजात जातीची उतरंड आहे. अस्पृश्य जातीमध्येही अनेक जाती आहेत. या जातीही भेदाभेद पाळतात. यांच्यातही रोटीबेटी होत नाही. या जाति-

व्यवस्थेने भारतीय समाजाला खूप खिळखिळे करून ठेवले आहे. अनेक जातींमध्ये या राष्ट्राची वाटणी झाली आहे. प्रत्येक जात एक स्वतंत्र राष्ट्रच आहे. मागास समाजातील तरुण हे पँथरमध्ये येत नाहीत; कारण त्यांना महार–नवबौद्ध समाजाचे नेतृत्व नको आहे. त्यांच्या मनात असलेली हिंदुत्ववादी श्रेष्ठ-कनिष्ठपणाची भावना त्यांना महार तरुणांपासून दूर ठेवते आहे. त्यांच्या मनातला जातीयवाद हा नवबौद्ध समाजाचा द्वेष करणारा आहे. या द्वेषापोटीच ते नवबौद्ध समाजापासून दूर राहू इच्छितात.

इतर दलित समाज नवबौद्ध समाजाबरोबर येत नाही त्याचं आणखी एक कारण म्हणजे नवबौद्ध समाज हा लढाऊ समाज आहे; त्यामुळे तो वारंवार सवर्णांच्या रोषाला बळी पडतो. सवर्ण या समाजावर सामुदायिकरीत्या अन्याय–अत्याचार करतात. सवर्णांच्या जुलमाला एकटा नवबौद्ध समाज बळी पडावा, आपण यात नको, यापासून आपण चार हात दूर राहावे, आपण जर नवबौद्ध समाजाबरोबर राहिलो तर आपणही अन्यायाचे भक्ष्य ठरू, ही एक भीती या समाजाच्या मनात असावी.

इतर दलित समाज हा पँथर चळवळीत येत नाही त्याचं आणखी एक कारण असू शकतं, ते म्हणजे प्रत्येक समाजातल्या पुढाऱ्यांना त्यांच्या समाजाचे नेतृत्व करण्याची हौस असते. आपण आपल्या समाजाचं नेतृत्व करावं, आपला समाज संघटित करावा आणि समाजाच्या नावावर काही मागण्या पदरात पाडून घ्याव्यात, ही त्यांची भूमिका असते. याच भूमिकेतून प्रत्येक जातीच्या संघटना बांधल्या जातात. प्रत्येक जातीच्या संघटना मग दुसऱ्या जातीच्या संघटनांबरोबर स्पर्धा करू लागतात. यातून द्वेष, वैमनस्य वाढू लागते. आपण पँथरमध्ये गेलो तर 'नेता' होऊ शकत नाही; मग आपण आपल्या समाजाची संघटना काढून नेता बनावे, ह्या महत्त्वाकांक्षेने माणसे पछाडतात आणि एका क्रांतिकारी चळवळीचे मारेकरी म्हणून काम करू लागतात.

सर्व बहिष्कृत जाती एक होत नाहीत; कारण त्यांचा जातीय अभिमान आडवा येतो. त्यांचे संस्कार भिन्न आहेत. त्यांचा व्यवसाय भिन्न आहे. त्यांचे सामाजिक स्थान भिन्न आहे. यामुळे त्यांना त्यांचं वेगळेपण जोपासणं सोपं जातं. प्रत्येक जात वेगळी होत गेल्याने एक क्रांतिकारी लढा उभा राहू शकत नाही आणि एका नवबौद्ध समाजाचे तरुण ही लढाई अखेरपर्यंत लढताना थकून जातील. नवबौद्ध समाजाने क्रांतीचा वसा घेतला आहे. आपण सर्वजण क्रांतिकारक विचारांचे आहोत. आपण सर्वजण वर्णव्यवस्थेचे बळी आहोत. आपण एक होणं हीच आपल्या हिताची गोष्ट आहे. आपलं भवितव्य आपल्याला घडवायचं आहे. आपला काळा इतिहास संपवायचा आहे. आपलं वर्तमान बदलावयाचे आहे. ते तुम्ही एकटे बदलू

शकत नाही किंवा आम्ही एकटे बदलू शकत नाही. आपल्या सर्वांचा शत्रू एक आहे, आपल्या सर्वांचे ध्येय एक आहे. मग आपण सर्वजण एक झाले पाहिजे; म्हणजे आगीत तेल ओतल्यागत हा संघर्ष भडकेल.

एकमेकांना एकमेकांपासून तोडण्याचं राजकारण हिंदुधर्मशास्त्रांनी केलं आहे. आपल्या जातीचे पुढारीही तेच करीत आहेत; कारण त्यांचा मेंदू हिंदुधर्माने ग्रासलेला आहे. आता आपण जागं होणं गरजेचं आहे. 'केवळ नवबौद्धांनीच राखीव जागा गिळंकृत केल्या' म्हणून त्यांचा द्वेष करणं, 'आम्ही गोळीला, तुम्ही पोळीला' म्हणून बौद्धांनी इतर मागासवर्गांचा द्वेष करणं सोडून दिलं पाहिजे. आपणा सर्वांचं शोषण इथल्या व्यवस्थेनं केलं आहे, हे लक्षात घेतलं पाहिजे. शासन आपल्याला सवलतींचे तुकडे टाकत आहे. अशा तुकड्यांसाठी भांडण्यात संपू नका. 'आम्हाला तुकडे मिळाले नाहीत; दुसऱ्यांनाच मिळाले' असे रडू नका. ही रडण्याची वेळ नाही. तुकड्यांसाठी संघटित होऊ नका. तुकड्यांसाठी संघर्ष करू नका. त्याने आपले सर्व प्रश्न सुटणार नाहीत. आपणाला सर्व प्रश्न सोडवायचे आहेत. आपला शत्रू बलाढ्य आहे. त्याच्याविरुद्ध आपल्याला उभं राहायचं आहे. कोणी एकटा हे कार्य करणं जिकिरीचं आहे. आपण सर्वांनी मिळून क्रांती केली पाहिजे. आपण सर्वजण क्रांतीचे पाईक आहोत. कुणी एकटा क्रांतिकारक असूच शकत नाही; त्याला सर्वांची साथ असावी लागते.

नवबौद्ध समाजाची जबाबदारी अधिक मोठी आहे, हे पँथर समजते. नवबौद्ध समाजातील तरुण पँथरसाठी झगडत आहेत. ते अग्रभागीच राहणार. संघर्षात मागेपुढे ही भावना महत्त्वाची नसते. संघर्ष महत्त्वाचा आहे आणि तो करावा लागणार आहे. एकट्यालाही या संघर्षात उतरावेच लागणार आहे, हे पँथर जाणून आहे. इतर जातिजमातींच्या तरुणांनी पँथरमध्ये यावं; पण ते येईपर्यंत पँथर थांबणार नाही. ती पुढेच जाईल. या युद्धयात्रेत कुणी केव्हा यावं, कसं यावं हे ज्याचं त्यानी ठरवायचं आहे. पँथरला कुठल्याही समाजाचे ओझे वाटत नाही. ती सर्व तळागाळातल्या लोकांसाठी संघटित होत आहे. आता लोकांनीही या संघटनेत आलं पाहिजे.

आम्ही पँथर्स इतर दलित समाजातील तरुणांचं स्वागतच करतो. आमच्या चळवळीत अनेक समाजाचे तरुण आहेत. त्यांची संख्या कमी असेल; पण त्यांची निष्ठा आमच्यापेक्षा कमी नाही. त्यांना आंबेडकरवाद पटला आहे. ते आंबेडकरी विचाराने भारावले आहेत. त्यांना पँथरची शक्ती कळली आहे. पँथर आपल्यावरील अन्यायाला वाचा फोडू शकते, हा विश्वास त्यांच्या मनात जागला आहे. पँथर एक लढाऊ संघटना आहे. तिचा दरारा आहे. असा दबदबा आपल्या समाजातील संघटना निर्माण करू शकत नाहीत. आपण आणि आपले कार्यकर्ते घेऊन आपण या चळवळीत

जाणेच क्रमप्राप्त आहे. आपण जितका उशीर करू, तितके आपले प्रश्न लांबणीवर पडतील. एकेका जातीचा संघटित आवाज हा दुबळाच असणार आहे. सर्व जातींचा मिळून एक आवाज बुलंद असणार आहे.

आपण सर्वजण जातिव्यवस्थेच्या विरोधात लढतो आहोत. मग आपणच आपल्यातील जाती सर्वप्रथम नष्ट करूया. निदान कार्यकर्त्यांनी तरी आपल्या जातीच्या सीमारेषा ओलांडल्या पाहिजेत. आपल्यातील दरी संपवली पाहिजे. आपण एक झालं पाहिजे. आपण किती दिवस या जातीच्या कोंडवाड्यात राहणार आहोत ?

आम्ही आपल्यातील जाती मोडण्याची भाषा करतो, तसेच सवर्णांतीलही जाती मोडण्याची भाषा करतो. काही बदमाष मंडळी आम्हाला सांगतात, ' तुम्ही जातीयवादी आहात, आंबेडकर जातीत कोंडून ठेवत आहात. ' आम्ही आंबेडकरवाद कधीच आमच्या जातीत बंदिस्त केला नाही. तुम्हाला इतको आंबेडकरवादाची आवड आहे तर नामांतराला विरोध का ? तुम्हाला इतकी आंबेडकरवादाची आवड आहे तर गावाबाहेर वेगळ्या वस्त्या का ? भाडोत्री खोली देताना जात विचारणारे तुम्ही, आम्हावर आंबेडकरवाद डाबून ठेवण्याचा आरोप करता ? सूर्य कधी डांबून ठेवता येतो का ?

आंबेडकरवाद सूर्यासारखा उगवत आहे. तो उगवणारच. आमचे दरवाजे सताड उघडे आहेत. तुम्ही दरवाजे बंद करून घेत आहात. तुम्हाला प्रकाशाची सवय नाही. टिळक चौक, सावरकर चौक, हेडगेवार चौक इथं बसवणार का बाबासाहेबांचा पुतळा ? तुमच्या कॉलनीत आहे का आमच्या भीमनगरमधील माणसासाठी एखादी जागा ? देणार का तुमच्या मुली, आम्ही लग्नाचे झालो आहोत ? पाहू या कोण कोणाला बंदिस्त करीत आहे ? आम्ही बंद दरवाजे लाथेने उघडणार आहोत. आम्हाला आमची ताकद वाढवायची आहे; म्हणूनच आमच्या तमाम बहिष्कृत जातीतील तरुणांना एकत्र येण्याचा विचार आम्ही सांगत आहोत.

बौद्धेतर मागास समाज जागा झाला पाहिजे. भटका–विमुक्त समाज संघटित झाला पाहिजे. आदिवासी समाज चळवळीत आला पाहिजे. ' तुम्ही आमच्यासाठी काय केलं आहे ? ' हा प्रश्न विचारण्याची ही वेळ नाही. आपण सर्वांनी मिळून काही करू या. इतिहासाचं उत्खनन करण्यापेक्षा भविष्याचे शिलालेख कोरू या. जातिजमातींच्या भिंती तोडून एकत्र येऊया. जे या ऐक्याच्या प्रक्रियेत सामील होणार नाहीत, त्यांना काळच धडा शिकवेल.

मित्रांनो, आपणास आंबेडकरवाद समजून घ्यावा लागेल. आपले प्रश्न याच वाटेने सुटणार आहेत, हे आपण पूर्णपणे जाणता; तरीही तुमच्यातील अस्वस्थ अलिप्तता का जपता ? भारतीय दलित पँथर ही तरुणांची संघटना आहे. या

संघटनेत तुम्ही आलं पाहिजे. मला मान्य आहे, नवबौद्ध समाजातील सर्वच तरुण तुम्हाला खुल्या दिलाने स्वीकारणार नाहीत. त्यांच्या मनात काही हिंदुत्ववादी अवशेष असू शकतात; त्यामुळे प्रारंभी याचा सर्वांनाच त्रास होणार आहे. एकट्या-एकट्याने आल्याने हा त्रास लवकर संपणार नाही. सर्वांची मानसिकता बदलावी लागणार आहे. तेव्हा एकट्याने न येता समूहाने या. एकटे जगण्याचे सोडून देऊ या.

आपणच एकमेकांना सुधारायचे आहे. आपणच आपले शिल्पकार आहोत. काही सोसून पुढे जाण्याचा धीर प्रत्येकाजवळ असला पाहिजे. त्याग करण्याची भावना काळजात असू द्या. सोसण्याची सहनशक्ती मनात असू द्या. पराभव पचविण्याची जिद्द विसरू नका. आपलं अंतिम ध्येय आहे, माणसाला मुक्त करणं. तेव्हा साध्या हेवादाव्यांना मूठमाती द्या. उद्यासाठी जगू या.

उद्या आपण गुलाम असणार नाही. आपणावर कोणी अन्याय करणार नाही. आपण सारे एक असणार आहोत. आपण आपला समाज घडवणार आहोत. आपलं आयुष्य महान आहे; कारण आपण सर्वजण गुलामीविरुद्ध लढत आहोत. या लढाईत आपण प्रत्येकानं लढलंच पाहिजे.

७

रिपब्लिकन ऐक्य आणि पँथर

रिपब्लिकन पक्षाचा इतिहास पाहिला की एक जाणवते, हा पक्ष पुढाऱ्यांसाठी आहे. त्यांच्या मनमानी राजकीय खेळीची रिपब्लिकन पक्ष एक पोतडी आहे. रिपब्लिकन पक्षाचे आजवरचे ऐक्याचे प्रयत्न म्हणजे केवळ स्वार्थी नाटके होती. मनापासून त्यांना ऐक्य नको आहे. ऐक्याचे नाटक करून दलित समाजाची ते दिशाभूल करीत आहेत. ऐक्याच्या प्रक्रियेमुळे दलित जनतेच्या मनात राजकीय महत्त्वाकांक्षा निर्माण करणे, इतर राजकीय पक्षांवर दबाव पाडणे, ही खेळी ऐक्यामागे आहे. ऐक्य निर्दोष भावनेने होत नाही. रिपब्लिकन ऐक्य हे केवळ मृगजळ आहे. रिपब्लिकन ऐक्याचा आधार आंबेडकरी विचार नसतो, तर राजकीय सौदेबाजीचे गणित असते. कुणाला पाठिंबा द्यायचा, कुणाशी युती करायची, कोण किती जागा देईल, याच्यासाठी ही ऐक्याची उठाठेव होती. पुनर्घटित रिपब्लिकन पक्षाचे एकछत्री नेतृत्व कुणी स्वीकारायचे, हा मूळ ज्वलंत प्रश्न होता. ऐक्याच्या रेटचात चार न पटणाऱ्या गटांनी एकत्र येऊन केलेली ही तडजोडच. भिन्न विचारप्रवृत्ती, वेगवेगळी उद्दिष्टे, प्रत्येकाची स्वार्थ साधण्याची स्वप्ने या भावना घेऊन ऐक्य प्रक्रियेत सामील झालेली माणसं आंबेडकरवादी असू शकतात ?

प्रत्येक गटाच्या शिलेदाराला ऐक्याच्या प्रक्रियेत आपला जास्त कसा फायदा होईल, याचीच काळजी होती. बाबासाहेबांच्या स्वप्नांपेक्षा स्वतःच्या स्वप्नाला, संघटनेला महत्त्व देणारे हे रथी-महारथी होते. त्यांच्या वैयक्तिक महत्त्वाकांक्षांना

तडे जाताच या ऐक्याचे बारा वाजलेले आहेत. राजकीय स्वार्थ साधण्यासाठी चारचौघांनी एकत्र येऊन राजकीय डाव खेळला होता.

ऐक्याविषयी सर्वांच्या भावना तीव्र आहेत आणि असाव्यात; पण जे ऐक्य होत नाही, झालेच तर टिकत नाही, त्या ऐक्यासाठी समाजाने काय किंमत मोजावी, याचाही विचार केला पाहिजे. एक खिळखिळी झालेली. इतर राजकीय पक्षांच्या दावणीस बांधलेली, केवळ निवडणुकीचे, राजकीय राखीव जागांपुरते राजकारण करणारी आणि राजकारणात अस्तित्व हरवून बसलेली अशी दलितांची राजकीय यंत्रणा म्हणजे रिपब्लिकन पक्ष !

' भारतीय दलित पँथर ' ही एक स्वतंत्र संघटना आहे. ती राजकीय पक्षासारखेच कार्य करते. या संघटनेचं स्वतःचं एक राजकारण आहे. या राजकारणामागचा विचार आंबेडकरी विचार आहे. आम्ही केवळ बहिष्कृत माणसाला केंद्र मानून राजकीय गणित मांडतो. आम्हाला निवडणुका महत्त्वाच्या वाटतात; पण त्याहीपेक्षा सत्ताधारी शासनाबरोबर केवळ निवडणुकीच्या काळातच दोन हात करायचे ही आमची नीती नाही. शासनाला विरोध करण्यासाठी प्रबळ विरोधी पक्षाची केवळ सदनामध्येच गरज असते असे नाही. शासन सदासर्वकाळ संसदेत जगत असते, असे नाही. निवडणुकांशिवायही शासनाबरोबर चार हात करण्याचे अनेक प्रसंग आहेत. सत्तेबरोबर राजकारणात लढण्यापेक्षा आम्ही सत्तेबरोबर समाजकारणात लढू आणि सत्तेच्या राजकारणावर मात करू. संसदेबाहेर सरकारला कोंडीत पकडू. सदनाबाहेर शासनाला वेठीस धरू. आमची आमच्या आंदोलनावर भिस्त आहे. आम्ही जनतेला संघटित करू. जनता आमच्या बाजूने येईल तर शासनही आमच्या बाजूने येईल.

रिपब्लिकन पक्षाच्या ऐक्यात आम्हाला रस नाही. या पक्षाच्या राजकारणाविषयी आम्हाला सदैव आस्था वाटणार आहे; कारण हा पक्ष बाबासाहेबांच्या नावे जगतो आहे. रिपब्लिकन पक्ष जितकी स्वतंत्र संघटना तितकीच ' दलित पँथर ' ही स्वतंत्र संघटना आहे. आमचे आणि रिपब्लिकन पक्षाचे काहीच संबंध नाहीत. आम्ही आता स्वतंत्रपणे उभे राहू इच्छितो. रिपब्लिकन पक्षाच्या सावलीखाली उभे राहण्याची आमची इच्छा नाही.

रिपब्लिकन पक्षाविषयी आमच्या मनात आजवर खूप आदर होता; म्हणून वेळोवेळी पँथर रिपब्लिकन पक्षासाठी पुढं आली आहे; पण रिपब्लिकन पक्षाच्या ऐक्यासाठी ' पँथर 'चा बळी देण्याचा प्रयत्न झाला तेव्हा मात्र आम्ही या पक्षापासून दूर गेलो आहोत.

' पँथर ' ही फिनिक्स पक्ष्यासारखीच आहे. जेव्हा जेव्हा पँथर बरखास्त

करण्यात आली आहे, तेव्हा तेव्हा पँथर पुन्हा जोमाने उभी राहिली आहे. फिनिक्स हा कविकल्पनेतला पक्षी आहे. हा पक्षी जाळला तरी पुन्हा राखेतून जिवंत होतो. अगदी पँथरही तशीच आहे. राजा ढालेंनी 'पँथर' बरखास्त केली; पण पँथर बरखास्त झाली नाही. रामदास आठवले यानी "पँथर" बरखास्त केली; पण पँथर बरखास्त झाली नाही. मुळातच 'पँथर' ही संस्था नाही. 'पँथर'ला बरखास्त करणारे संस्थानिक नाहीत. चळवळी कधीच बरखास्त करता येत नसतात. चळवळी बरखास्त करणारेच संपतात. ते चळवळीपासून दूर फेकले जातात. चळवळीला नवे नेते मिळतात, नवे अनुयायी मिळतात आणि चळवळी वाढत राहतात. चळवळी कुणासाठी थांबत नसतात.

भारतीय दलित पँथरला आता एकाकी युद्धप्रवास करावा लागणार आहे. पुन्हा वादळी वेगानं उठावं लागणार आहे. समाजातील शिथिलता, मरगळ दूर करावी लागणार आहे. झोपडी-झोपडीत सूर्य पेरावे लागणार आहेत. आग ओकणाऱ्या तरुणांना अन्याय-अत्याचाराच्या जागा दाखवून द्याव्या लागणार आहेत. पँथर दलित तरुणांना लढाऊ बनवू इच्छिते, पँथर समाजालाच नेता बनवू इच्छिते.

रिपब्लिकन पक्ष आणि दलित पँथरमध्येही गट पाडणारी, ऐक्य करणारी, स्वतःचे नेतृत्व लादणारी काही मंडळी आहेत. त्यांना ओळखण्याचं काम प्रत्येकानं केलं पाहिजे. दलित समाज अशिक्षित व अज्ञानी आहे. तेव्हा गटपाडू नेत्यांना ठेचण्याचं काम केवळ पँथरचा तरुणच करू शकतो. पँथरने हे काम धाडसाने केले पाहिजे. चळवळीत गट पाडले जातात ते स्वार्थासाठीच. चळवळीचं ऐक्य केलं जातं तेही स्वार्थासाठीच. या स्वार्थी भावना ओळखल्या पाहिजेत. चळवळीसाठी काय होते, हे पारखले पाहिजे. स्वार्थी होणाऱ्या चांगल्या गोष्टीही नाकारण्याचं धाडस दाखविलं पाहिजे.

'भारतीय दलित पँथर' आता रिपब्लिकन ऐक्याच्या नाटकात भाग घेऊ इच्छित नाही. सध्या दलित तरुणांच्या संघटना नाहीत. पँथरसारखी बलाढ्य संघटना तर नाहीच. तेव्हा दलित तरुणांनी इतर संघटनांचे दुकान उघडू नये. प्रत्येकाने याच संघटनेत स्वतःला वाहून घ्यावं. स्वतःपेक्षा चळवळ महत्त्वाची मानावी. 'भारतीय दलित पँथर'ला भवितव्य आहे. जोवर दलितांवरचे अन्याय-अत्याचार नष्ट होणार नाहीत, तोवर दलित पँथरचं ऐतिहासिक कार्य संपणार नाही. जोवर जुलूम अस्तित्वात आहे, तोवर 'पँथर' अस्तित्वात आहे. जुलमाचा शेवट करण्यासाठी पँथरचा जन्म आहे. छळ जिवंत ठेवून पँथरला नष्ट करता येणार नाही.

जे कुणी पँथरला बरखास्त करू इच्छितात, ते समाजद्रोही आहेत; कारण दलितांची विद्रोही ताकद संपवून वर्णवादी विचारांना अभय देण्याचं काम ते करीत

असतात. जे कोणी पँथरविरोधी आहेत, त्यांना दलित समाजाचं संरक्षण करणारी ताकद नको आहे. जे कोणी पँथरविरोधी आहेत, त्यांना दलित समाज असुरक्षित करावयाचा आहे. दलित समाजाला संरक्षक, अभेद्य कवच पुरवायचं असेल तर प्रत्येकाने – अर्थात रिपब्लिकनवाल्यांनीही – पँथरचं समर्थन करायला हवं, पँथरला पाठिंबा द्यायला हवा. पण त्यांना पँथरसारखी मजबूत चळवळ दडपून टाकायची आहे. पँथर मजबूत झाली तर त्यांचे स्थान शून्य होणार आहे. त्यांना समाजाच्या अस्तित्वापेक्षा स्वतःच्या अस्तित्वाची अधिक काळजी वाटते; म्हणून ते पँथरविरोधी बनतात. पँथर अशा प्रवृत्तींना नष्ट करू इच्छिते.



८

पँथर ही काळाची गरज आहे

'भारतीय दलित पँथर' बरखास्त झाली आणि अन्यायाची मालिका सुरू झाली. पँथरचा दहशतवाद संपला. सवर्ण माथेफिरूंना रान मोकळे वाटले; पण या नराधमांना माहीत नाही, पँथरचा उदय हा प्रत्येक अन्यायातून होत असतो. पँथरचा जन्म हा दीनदलितांच्या अश्रूंतून होत असतो. पँथर मुळातच छळाचा प्रतिकार करण्यासाठी सरसावली आहे. तिने दलितांचा कैवार घेतला आहे. या आक्रमक प्रवृत्तीतून आम्हाला मरगळलेला समाज जागा करायचा आहे. सवर्ण समाजाविषयी दलित तरुणांच्या मनात संतापाची भावना रुजवायची आहे. मुक्या समाजात पौरुषाचे वादळ पेरायचे आहे. आमच्या अशा कृत्यांतून जातीय तेढ वाढली तरी बेहत्तर; पण लाचार होऊन आम्हाला सलोखा नको आहे.

आम्हाला आमचे हक्क हवे आहेत. ते उपकार, दया किंवा सहानुभूती म्हणून नव्हे. आम्ही या देशाचे तुमच्याइतकेच नागरिक आहोत. आम्ही या देशातील प्रत्येक सत्ता-संपत्तीवर तुमच्याइतकाच हक्क सांगू इच्छितो. हे हक्क आम्ही मिळवणारच. हजारो वर्षे अनिर्बंधपणे तुम्ही आमचं शोषण केलेलं आहे. राजीखुषीने ही सत्ता तुम्ही सोडणार नाही. यासाठी केवळ लढून, हो, लढूनच आम्हाला अस्तित्व प्रस्थापित करावं लागणार आहे. एका हातात बुद्ध आणि एका हातात युद्ध अशी आमची वाटचाल असणार आहे. आमचे प्रश्न सनदशीर मार्गानेच सुटावेत, अशी आमची इच्छा आहे. आमचे प्रश्न केवळ मूलभूत गरजांचे असते तर एकवेळ तुमच्या

योजना, विकास आणि सवलतीच्या मार्गाने आम्ही सुधारण्यासाठी तयार झालो असतो. एकवेळ अन्न मिळालं नाही तर आम्ही उपाशी राहू शकतो. एकवेळ वस्त्र नाही मिळालं तर अर्धनग्न राहण्याची आमची तयारी आहे. एकवेळ निवारा नाही मिळाला तरी आम्ही उघड्यावर राहू.

आजवर हजारो वर्षे आम्ही असेच जगलो आहो; पण आमच्या हजारो वर्षांच्या इतिहासात आंबेडकर नावाचं वादळ आलं नव्हतं. आम्ही तुमचे सर्व गुन्हे उदार मनाने माफ करू; पण आमचा माणूसपणाचा अवमान आम्ही कधीच सहन करणार नाही. आमच्या स्वाभिमानाची हेटाळणी आम्ही कधीच सहन करणार नाही. एखादा अन्याय आम्ही सहन करू; कारण अन्याय सहन करण्याची आमच्याकडे प्रचंड शक्ती आहे; पण शूद्र, दलित, अस्पृश्य म्हणून जर आमचा अपमान होत असेल तर अपमान होण्यापूर्वी अपमान करणाऱ्याची आम्ही धिंड काढू. आम्ही उघडे आहोत. आम्ही बेकार आहोत. आम्ही दरिद्री आहोत. हरवण्यासाठी आमच्याजवळ काहीच नाही. नुकसान झालंच तर आमची कवडीमोलाची झोपडी जळेल; पण आम्ही जेव्हा पेटून उठू तेव्हा मात्र तुमचं लाखाचं नुकसान होईल. तुमच्या हवेल्या जळताना आम्ही आनंदाने नाचू, गाऊ. आम्हाला आता दंगलीची भीती वाटत नाही. आम्हाला आता मरणाची भीती वाटत नाही. आम्हाला आता कुठल्याच नाशाची भीती वाटत नाही. आमची भीती संपलेली आहे.

आता खरेच दंगली झाल्या पाहिजेत. आमच्या मनात साठलेल्या प्रचंड संतापाला संधी मिळाली पाहिजे. आमचे हात शिवशिवत आहेत. आमचं मन भडकत आहे. आता कुठेतरी अन्याय झाला पाहिजे. आता अन्याय करणाऱ्यांची राखरांगोळी करू. उद्दामपणे, उद्धटपणे जुलूम करणाऱ्यांची कुचेष्टा करू. अन्याय करणारा माणूस असेल तर त्याला ताब्यात घेऊ. हे इतकंच होईल असं नाही. आम्ही त्याचं घर ताब्यात घेऊ. हे इतकंच होईल असं नाही, आम्ही ते गाव ताब्यात घेऊ आणि पेटवून देऊ. आता अन्यायाला उत्तर तितक्याच कडव्या अन्यायाने देऊ; म्हणजे अन्यायाचा अर्थ आणि परिणाम कळू शकतील.

दि. १६ ऑगस्ट, १९९१

परभणी जिल्ह्यातील पिंपरी–देशमुख या गावी कोतवाल अंबादास साबणे याची हत्या झाली. पाऊस पडत असताना अंबादास साबणे मंदिरात आडोशाला गेला होता; त्यामुळे मंदिर विटाळले म्हणून परमेश्वराची प्रार्थना करणारी मंडळी चिडली आणि साबणेची हत्या केली. बाबासाहेब आंबेडकरानी मंदिरप्रवेशासाठी सत्याग्रह केला होता. आजही हा सत्याग्रह संपलेला नाही. कायद्याने दलितांना समान हक्क मिळाले; पण प्रत्यक्षात मात्र पदरी काहीच पडले नाही.

मंदिरात प्रवेश केला म्हणून एका दलिताची हत्या होते. हा अमानुष प्रकार आहे. माणसाच्या स्पर्शाने ईश्वर विटाळतो, ही घाणेरडी कल्पना आहे. आपण सर्व एकाच देवाची लेकरे म्हणणारी ही माणसं अशी नीच वागतात. 'विश्वची माझे घर' म्हणणारी ही रानटी माणसं. गावागावांत वेगवेगळी जातीची घरं निर्माण केलेली आहेत. गाढवाला गंगा पाजून पुण्य पदरात पाडून घेणारी ही माणसं. शूद्रांना पाणी पाजणार नाहीत. रेड्याला वेद शिकवतील; पण शूद्रांना साधं मंदिरातही येऊ देणार नाहीत. चोखोबाला यांनी असंच पायरीजवळ ठेवलं. मंदिरात येऊ दिलं नाही. जळी–स्थळी–काष्ठी–पाषाणी यांना परमेश्वर भेटेल. वराह, वानर, सर्प, कुत्रा यांच्यात यांना देव भेटेल; पण अस्पृश्य माणसात यांना साधा माणूसही दिसणार नाही. मांजर मारले तर काशीला जातील, पुण्य मिळवतील; पण अस्पृश्य माणूस ठार मारताना तितकेही लाजणार नाहीत.

अंबादास सावणे मंदिरात आला म्हणून त्याची हत्या केली जाते, हा रानटी प्रकार आहे. अंबादास सावणे स्वाभिमानी दलित होता. त्याला गावात बाबासाहेब आंबेडकरांचा पुतळा बसवायचा होता. या सावणेचा गावकऱ्यांनी परमेश्वराच्या साक्षीने खून केला. या वेळी परमेश्वर धावून आला नाही. परमेश्वर संकटाच्या वेळी धावून येतो म्हणतात. द्रौपदीचं वस्त्रहरण होताना श्रीकृष्ण मदतीला धावून येतो; पण आमच्या दलित स्त्रीचे वस्त्रहरण होताना हा भडवा कोठे असतो ? त्याला केवळ सुंदर सवर्ण स्त्रीलाच मदत करावी वाटते का ? द्रौपदीचं वस्त्रहरण थांबवणारा हाच श्रीकृष्ण गौळणींची वस्त्रं घेऊन पसार झाला होता, हेही लक्षात घेतलं पाहिजे.

मंदिरात दलितांना आजही प्रवेश दिला जात नाही. मराठवाड्यात ऐंशी टक्के खेड्यांत दलितांना मंदिरप्रवेश नाही. २३ नोव्हेंबर, १९९१ रोजी दूरदर्शनवरून राष्ट्रीय प्रसारणात 'ताना–बाना' हा कार्यक्रम दाखविण्यात आला. यामध्ये 'तय्यम'ची माहिती देण्यात आली. आजही दलित तय्यमाना कर्नाटकात मंदिरात प्रवेश दिला जात नाही, हे सांगण्यात आलं. जग एकविसाव्या शतकाकडे जात आहे आणि आमचा माणूस मंदिरातही जाऊ शकत नाही; कारण हिंदू धर्माच्या पावित्र्याचं रक्षण ही मंदिरं करीत आहेत. भारतीय दलित पँथर या मंदिराचं पावित्र्य नष्ट करू इच्छिते आणि माणसाचं पावित्र्य पुजू इच्छिते.

दि. ७ सप्टेंबर, १९९१

अहमदपूर तालुक्यातील गोताळा इथं कोतवाल सटवाजी कांबळे आणि त्याची जवान मुले मोहन सटवाजी कांबळे व रावसाहेब सटवाजी कांबळे यांची हत्या करून ही प्रेतं रस्त्याने ओढत आणून चावडीसमोर टाकण्यात आली. हा कसला

अमानुषपणा ? पिंपरी-देशमुख प्रकरण महाराष्ट्रभर चर्चिलं जात होतं. संपूर्ण राष्ट्रात त्याची चर्चा होत होती. मंत्र्यांनी, मुख्यमंत्र्यानी पिंपरी–देशमुखला भेट दिली होती. अंबादास सावणेच्या हत्येविरुद्ध जनमत तयार झालं असताना गोताळा प्रकरण घडतं. दोन्ही ठिकाणं एकाच मराठवाड्यातील जवळजवळची आहेत. म्हणे सटवाजी कांबळेचं घर गुंडगिरी करीत होतं. त्याची मुलं स्त्रियांची छेड काढीत होती. काय कारणं दिली जातात ! आज हजारो वर्षे तुम्ही गुंडगिरी केली, स्त्रियांना छळलं, असा हाहाकार कधीच घडला नाही. कोतवाल कांबळेची मुलं स्त्रियांची छेड काढतात, म्हणून त्यांची सामुदायिकपणे हत्या करणं, प्रेतं ओढत नेणं हा निंद्य प्रकार आहे. मुळात या घराण्याचा स्वाभिमान सवर्णांना आवडला नाही. या घराण्याचं बेदरकार वागणं सनातन गावकऱ्यांना पटलं नाही. दलितांनी जोड्यात वागलं पाहिजं, पायरीनं राहिलं पाहिजे, हा नियम गोताळा इथल्या दलितांनी झुगारला होता.

सवर्ण स्त्रियांची छेड काढणं गैर असेलही; म्हणून काय अख्ख्या कुटुंबाची हत्या केली पाहिजे ? खरं तर हिंदूंचं पवित्र तत्त्वज्ञान हे भगवद्गीतेपेक्षा इथल्या हिंदू स्त्रीच्या शुद्ध योनीत दडलेले आहे. शुद्ध वंश, शुद्ध रक्ताची काटेकोर अंमलबजावणी सवर्ण स्त्रीच्या चारित्र्यात दडलेली आहे. या स्त्रीवर पातिव्रत्य लादून, सीतासावित्रीचा आदर्श सांगून ही जातिव्यवस्था मजबूत करण्याचा प्रयत्न केलेला आहे. ही व्यवस्था उधळून लावायची असेल तर रक्तसंकर झाला पाहिजे.

९ सप्टेंबर, १९९१

अमरावती जिल्ह्यातील सावनेर इथं (ता. नंदगाव खंडेश्वर) ७० दलितांची घरे जाळण्यात आली. त्यात ५० घरे पूर्णपणे भस्मसात झाली. मनोहर वसंतवाने याच्या घराचे दार तोडून त्याला दगडाने ठेचून मारण्यात आले व अनेकांना गंभीर जखमी करण्यात आले; कारण दलितांनी पाटीलकी करू नये. त्यांनी पाटीलकी सोडून दिली पाहिजे. दलितांनी सत्ता उपभोगू नये, प्रतिष्ठेने राहू नये हाच रोख या अन्यायामागे आहे.

११ सप्टेंबर, १९९१

यवतमाळ जिल्ह्यातील कळंब तालुक्यातल्या उपळाई इथं दवंडी देण्यास नकार दिला म्हणून दोन दलितांची घरे जाळली आणि दलितांना जबर मारहाण करण्यात आली.

२१ सप्टेंबर, १९९१

विजापूर जिल्ह्यात बागलकोट तालुक्यात ' हिटनळी ' या गावी एका दलित तरुणाने सवर्ण मुलीबरोबर प्रेम केले. त्याच्या संपूर्ण घराची नासधूस करण्यात आली.

त्याच्या संपूर्ण कुटुंबाची हत्या करण्यात आली.

सप्टेंबर, १९९१

अहमदनगर जिल्ह्यातील भूतवडा इथं दलित तरुण दत्तू लक्ष्मण सदाफुले याने मारुतीच्या देवळाला नारळ फोडून नवस पूर्ण केला व मठात प्रवेश करून पूजा केली म्हणून दलित वस्तीवर बहिष्कार टाकण्यात आला. याच महिन्यात देवपुडी इथल्या दलितांच्या गायरान जमिनीची नासधूस करून दलितांना मारहाण केल्यामुळे आठ कुटुंबांचा सांभाळ औरंगाबादच्या पँथर्सनी केला. ५ सप्टेंबर, ९१ रोजी या दलितांनी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर उपोषण सुरू केले.

३० सप्टेंबर, १९९१

अहमदनगर जिल्ह्यातील चंदनगर इथं भाऊसाहेब खामकर यांच्या घरात घुसून सवर्णांनी त्याना बेदम मारहाण केली आणि त्यांच्या पत्नीला विवस्त्र करून भर बाजारातून तिची धिंड काढली.

१९ ऑक्टोबर, १९९१

ओरिसामधल्या, मौडिया–बराडा या गावातील हरिजन वस्तीवर जमावाने हल्ला करून दोघांना ठार मारले. १५ जणांना जखमी केले. २२ घरे पेटवून भुईसपाट करण्यात आली.

२४ ऑक्टोबर, १९९१

तळेगाव–दाभाडेपासून जवळच असलेल्या आंबळे वस्तीवर सवर्णांनी हल्ला केला. दलितांनी धम्मचक्र प्रवर्तन दिन साजरा करू नये म्हणून हा प्रकार करण्यात आला.

१८ जुलै, १९९१

निलंगा तालुक्यातील, वांजरखेडा इथं जिड्डे व कांबळे कुटुंबियांना जातिवाचक शिव्या देऊन मारहाण करण्यात आली.

वर्तमानपत्रांत प्रसिद्ध झालेल्या आणि माझ्या अनियमितपणे वाचनात आलेल्या दलितांवरील अन्याय–अत्याचारांवरील ह्या ठळक बातम्या आहेत. सवर्ण किती माथेफिरू आहेत, याचीच ही उदाहरणे आहेत. दलित पँथर या घटना पाहून पुन्हा कामाला लागली आहे. हा अन्याय–अत्याचार थोपवायचा असेल तर 'पँथर' ही आजच्या काळाची गरज आहे, हेच त्याचे उत्तर आहे.

९

भारतीय दलित पँथर ही राष्ट्रवादी

भारतीय दलित पँथर ही विद्रोही चळवळ आहे. ती हिंदू धर्माने लादलेल्या अमानुष व्यवस्थेविरुद्ध निकराने लढू इच्छिते. आमच्यावर लादलेली 'अस्पृश्यता' हा आमच्यावर कलंक आहे. तो आम्ही इथल्या रानटी हिंदूंच्या रक्ताने धुऊन काढू. या रस्त्यात विषारी नाग आणि हिंदुत्ववादी दिसला, तर सर्वप्रथम आम्ही हिंदुत्ववाद्याला ठेचून काढू. विषारी नागापेक्षाही भयंकर असे या हिंदुत्ववाद्याचे डोके असते. नाग एखाद्या माणसाला दंश करू शकतो; पण हा हिंदुत्ववादी माणूस एका विराट मानवसमूहाला 'अस्पृश्य' लेखतो. या माणसाचे विष खूप जहरी असते; म्हणून नागापेक्षाही याला अगोदर ठेचले पाहिजे. आम्ही हिंदुधर्मातील आमच्याविषयी विष ओकणाऱ्या ऋचा, ओव्या, मंत्र, धर्मग्रंथ नष्ट करू इच्छितो, आमचा अवमान करणारे कुठलंही पान जिवंत राहू नये, वाचले जाऊ नये. माणसाची पूजा करणारा कुठलाही धर्मग्रंथ असो; तो आम्हाला प्रिय वाटतो. माणुसकीचा विचार देणारे रद्दीतले पानही आम्हाला भगवद्गीतेपेक्षाही श्रेष्ठ वाटते. चातुर्वर्ण्याचं समर्थन करणारे तत्त्वज्ञान आम्ही समूळ नष्ट करू इच्छितो. आम्ही मंदिर उद्ध्वस्त करू. जिथे दगडाची पूजा होते आणि माणसांना मज्जाव केला जातो. जात, धर्म आणि भाषा यांच्या नावानं होणारा दुजाभाव आम्हाला नको आहे. आम्ही स्पष्टच कबूल करतो की, या देशात एक सवर्ण समाज आहे आणि एक अस्पृश्य समाज आहे, एक गाव आहे आणि गावाबाहेरचं गाव आहे. आजवर आम्ही

आमच्या अज्ञानामुळे तुमच्याशी लाचारीने वागलो. निमूटपणे अन्याय सहन केला. आमचं निमूटपणे जगणं तुम्हाला हवं आहे. आम्ही तुमचे सदैव चाकर असलो म्हणजे तुम्हाला राष्ट्रवादी वाटतो. आम्ही तक्रार न करता ही जातिव्यवस्था स्वीकारली म्हणजे आम्ही राष्ट्रवादी आणि या जातिव्यवस्थेविरुद्ध बोललो तर अराष्ट्रवादी, ही व्याख्या आम्हाला मान्य नाही.

आम्ही जातिव्यवस्थाविरोधी आहोत. जातिव्यवस्थाविरोधी बोलणे हे जर देशद्रोहीपणाचे लक्षण असेल तर आम्ही जरूर देशद्रोही आहोत. आम्हाला असा देश हवा आहे, जिथं आमच्या 'माणूसपणा'ची कदर होईल. जिथं जात, धर्म, पंथ वा भाषा या नावाने माणसाची विटंबना न होईल. आम्हाला माणसाला केंद्र मानणारे राष्ट्र हवे आहे. दगडाधोंड्यांची पूजा करणारी संस्कृती आमची नाही. ती आम्हाला मान्य नाही.

आम्ही 'हिंदूविरुद्ध' बोलतो, हिंदुस्थानविरुद्ध बोलतो, जातीविरुद्ध बोलतो, कारण आमच्या राष्ट्राला लागलेल्या ह्या जळवा आहेत. हिंदूंचं विषारी तत्त्वज्ञान जिवंत ठेवून राष्ट्रात जातीय सलोखा नांदू शकणार नाही. शांतता कमिट्या, पोलीस किंवा लष्कराच्या साहाय्याने ही व्यवस्था टिकवून ठेवता येणार नाही. आजवर ती टिकली याचं एकमेव कारण म्हणजे दलित–शूद्र समाजाचे अज्ञान. जो जो माणूस शिकेल, तो तो माणूस स्वाभिमानी होईल आणि या स्वाभिमानी माणसाला त्याचं 'शूद्रपण' अपमान करणारं वाटेल.

शूद्र, स्वाभिमानी माणसाला आपण गावाबाहेर का आहोत, याचा पहिला प्रश्न पडेल. आपल्यासाठी वेगळे वसतिस्थान का आहे? आपल्यासाठी वेगळी स्मशानभूमी का आहे? आपल्यासाठी वेगळा पाणवठा का आहे? आपल्याला मंदिरात का येऊ दिले जात नाही? सार्वजनिक ठिकाणी आपणास दुय्यम स्थान का आहे? आपल्यावर का अन्याय होतोय? आपल्याच स्त्रीची धिंड का निघतेय? आपल्या समाजाविरुद्धच का जातीय दंगली घडतात? आमचेच का खून होतात? आम्ही अस्पृश्य का? आम्ही झोपडयांत का राहतो? आम्ही का या गावात / शहरात का राहत नाही? आमच्याकडे माड्या, बंगले, हवेल्या का नाहीत? आमच्याकडे मोटारी, गाड्या, कारखाने का नाहीत? आम्ही मेलेली जनावरे का ओढतो? आम्ही घाण कामं का करतो? आम्हाला सुंदर सवर्ण स्त्रिया बायका म्हणून का मिळत नाहीत? आम्हाला शहरात भाड्याने घरं का मिळत नाहीत? आम्हाला ऑफिसमध्ये का त्रास होतो? शाळेत शिक्षण घेताना आमची मुलं वेगळी का बसतात? आमच्या मुलीच देवाला का सोडल्या जातात? सवर्णांच्या मुली का देवदासी होत नाहीत? आम्हीच वाघ्या–मुरळी, पोतराज का? इथले भोसले, कुलकर्णी व देशपांडे या सवर्णांच्या मुलांना का वाघ्या–मुरळी, पोतराज म्हणून

देवाला सोडले जात नाही ? अशा असंख्य प्रश्नांनी दलित समाज जेव्हा खडबडून जागा होईल तेव्हा विषमतेवर आधारलेल्या हिंदुधर्माची पाचावर धारण बसेल. त्या वेळी शंबुकाचा वध करणारा राम आम्ही पूजणार नाही. ज्या महाभारतात भगवद्-गीता आहे आणि ज्या भगवद्गीतेत चातुर्वर्ण्याचे समर्थन आहे, त्या भगवद्गीतेला आम्ही मानणार नाही. आमची निंदा करणाऱ्या परमेश्वराचीही आम्ही निंदा करू.

आम्ही आता सांगू, ब्रह्महत्या हे पुण्य आहे. शूद्रहत्या हे पाप आहे. आम्ही सांगू, ब्राह्मणांनी संडास साफ केले पाहिजेत आणि शूद्रांनी पोथ्या वाचल्या पाहिजेत. आम्ही सांगू, शहाण्णव कुळातील घरंदाज सवर्णांच्या बायकांनी आता रस्ते झाडले पाहिजेत आणि शूद्र स्त्रियांनी आता थोडा वेळ शाळेत शिकणाऱ्या मुलांना समतेचं शहाणपण शिकवलं पाहिजे; कारण सवर्ण स्त्रिया 'आई' व्हायला नालायक आहेत. सवर्ण स्त्री म्हणजे विषारी डोक्याच्या सवर्णाला जन्म देणारा निर्जीव कारखाना आहे. या स्त्रियांनी आपल्या मुलांना 'माणूस' बनवण्यापेक्षा सवर्ण बनवलं आहे. त्याच्याबरोबर खेळू नको, त्याच्याबरोबर बोलू नको, तो आपल्या जातीचा नाही, अशी शिकवण देणाऱ्या स्त्रिया आई होऊच शकत नाहीत. त्या रानटी कैदाशिणी आहेत. अशा स्त्रियांवर अन्याय–अत्याचार झाला तर आम्हाला आनंदच वाटतो. आम्ही अशा सवर्ण स्त्रियांची बाजू घेणार नाही. शूद्रांबरोबर या सवर्ण स्त्रियाही आपल्या हक्कांसाठी रस्त्यात आल्या तर आम्ही त्यांच्याबरोबर राहू. सवर्ण स्त्री खऱ्या अर्थाने शिकून स्वाभिमानी झाल्याशिवाय आमचा लढा पूर्णांशाने यशस्वी होणार नाही. हिंदू धर्माचं नष्टचर्य हे केवळ हिंदू स्त्रीच्या हाती आहे. हिंदू स्त्रीचं शोषण थांबलं आणि या स्त्रीला स्वातंत्र्य मिळालं तर ही व्यवस्था खूप लवकर बदलेल, असा आम्हाला विश्वास वाटतो. हिंदू स्त्रीला चूल आणि मूल सांभाळण्यासाठी लावून तिला जीवनाच्या सर्व क्षेत्रांपासून अंधारात ठेवलं आहे. जेव्हा या स्त्रीचे डोळे उघडतील तेव्हाच खऱ्या संस्कृतीची पहिली पानं लिहिली जातील आणि शूद्र–अतिशूद्रांच्या लढ्यातील शेवटचा टप्पा आम्ही जिंकू.

आम्ही आमच्या देशातील रानटीपणाविरुद्ध बोलतो. याचा अर्थ आम्ही देशाविरुद्ध बोलतो असा नाही. आम्हाला आमचा देश संस्कृतिसंपन्न असावा असे वाटते. या देशातील अन्याय–अत्याचार नष्ट झाला पाहिजे, यासाठी आम्ही लढत आहोत. आम्हाला माणसं मारायची नाहीत, माणसांचं मन क्रांतिकारक बनवायचं आहे. मनं बदलली की आमचा लढा सोपा होणार आहे. हजारो वर्षांच्या घाणेरड्या अंधारात सुस्त पडलेल्या समाजाला अर्ज–विनंत्या आणि विनवण्यांच्या रूपाने जागं करता येणार नाही. या समाजाला जागं करण्यासाठी आता बंडाची भाषा बोलावी लागेल, आरोळ्या ठोकाव्या लागतील. प्रसंगी काहीवेळा जाणूनबुजून अन्याय-अत्याचाराच्या वाटेने जावे लागेल.

आमच्या या हिंसक कृत्यांमागे इथल्या माणसाला जबरदस्त धक्का देण्याचं तंत्र आहे. आम्ही माणूस जागा करू इच्छितो. त्यासाठी थोडं आक्रमक होऊ इच्छितो. आमच्या विद्रोही भूमिकेमुळे इथले इमले हादरतील. इथला माणूस भयभीत होईल आणि विचार करू लागेल. अशाही घनघोर, बिकट अवस्थेत हा माणूस विचार न करता अविचाराने जगू पाहणार असेल आणि या समाजाला आम्ही सदैव गुलाम राहावे असे वाटत असेल तर हा समाज मूर्खांच्या नंदनवनात राहतो आहे. हा देश आमचा आहे. आम्ही या देशाचे आदिनागरिक आहोत. आर्य हे खैबरखिंडीतून आलेले परकीय होते. या आर्यांनी आता आपण उपरे आहोत, हे ओळखून वागले पाहिजे आणि या देशाच्या आदिनागरिकांना दुय्यम ठरवून त्यांच्याशी व्यवहार करू नये. त्यांनी त्यांची जागा ओळखावी, एवढेच.

•

१०

भारतीय दलित पँथर : एक मुक्तिलढा

भारतीय दलित पँथर अस्पृश्यांवर होणाऱ्या अन्यायाचा प्रतिकार करण्यासाठी जन्मलेली आहे. आमच्या तमाम चळवळी लोकशाही मार्गानेच करावयाच्या आहेत. आमच्या प्रत्येक चळवळीला आणि मागणीला कायद्याचा आणि सामाजिक न्यायाचा आधार आहे. आमच्या सर्व चळवळी कायदेशीर मार्गानेच होत आहेत. या देशाचे सार्वभौम शासन हे दलितांच्या बाजूने बोलते. कायदा हा मागासवर्गाच्या हिताची भाषा बोलतो. कायदा आणि शासन हे दलितांच्या कल्याणाची भाषा बोलतात; पण हिंदुत्ववादी तेवढे याविरुद्ध बोलताना दिसतात. इतके प्रबळ शासन दलितांच्या बाजूने असतानाही दलितांवर अन्याय होतो, याचा अर्थ काय ?

कायदा आणि शासन या अत्यंत महत्त्वाच्या ठिकाणी हिंदुत्ववादी आहेत; त्यामुळे आम्ही शासनकर्ती जमात होणे आणि कायदे करण्याची आणि अंमलबजावणी करण्याची शक्ती ताब्यात घेणे महत्त्वाचे आहे. म. गांधीजी म्हणायचे, ' भंगी या देशाचा राष्ट्रपती झाल्याशिवाय या देशात खऱ्या अर्थाने समानता येणार नाही. ' पण या देशात हे गांधीजींचे स्वप्न पूर्ण होईल असे वातावरण नाही; कारण दलित किंवा भंगी शिपाई झाला तरी त्याला नीट सरकारी नोकरी करू दिली जात नाही. त्याचा नाना कारणांनी छळ केला जातो. दलित माणसाला या शहरात भाड्याने जागा मिळत नाही, तिथं तो देशाचा राष्ट्रपती होणे किती कठीण आहे ! भंगी राष्ट्रपती झाला तर सगळ्यांना भंगीकाम करावे लागेल, म्हणून आंदोलन करण्यासाठी हिंदुत्व-

वादी आकाशपाताळ एक करतील; कारण मराठवाडा विद्यापीठाला डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे केवळ नाव द्यावयाचे आहे; पण आमच्या पदव्यांच्या प्रमाणपत्रावर बाबासाहेबांचे नाव नको म्हणून या हिंदुत्ववाद्यांनी ' मराठवाड्याची अस्मिता ' हे कारण दाखवून आंदोलन केलेले आहे.

मराठवाड्यासारख्या एका छोट्या भूप्रदेशाची अस्मिता मोठी की हजारो वर्षांपासून दडपल्या गेलेल्या संपूर्ण देशातल्या दलितांची अस्मिता मोठी ? जिथं नामांतराला विरोध होतो, त्या देशात दलितांच्या उद्धाराची चळवळ ही सवर्णांच्या सहानुभूतीवर किंवा दयेवर चालवून भागणार नाही. सवर्णांची सहानुभूती पोकळ असते. जोवर त्यांना या सहानुभूतीची कुठलीच किंमत मोजावी लागत नाही, तोवर पुरोगामीपणाचं सोंग मिरविण्यासाठी ते दलितांची बाजू घेतात. दलितांना पाण्याचा हौद खुला केला म्हणून घराबाहेर पडणारे महात्मा फुले कुठे ? आणि जुगारात राज्य आणि पत्नी हरून घराबाहेर पडलेले पांडव कुठे ? जुगारास पत्नी पणाला लावणारे पांडव आमचे आदर्श होऊच शकत नाहीत. आपल्या पत्नीला, स्त्रियांना शिकविण्यासाठी समाजाचा रोष पत्करून शिक्षिका करणारे महात्मा फुले आमचे आदर्श आहेत. संत एकनाथांनी महाराच्या मुलाला कडेवर घेतलं म्हणून महारांचे प्रश्न सुटले नाहीत. संत एकनाथांसारखेच दरवर्षी अनेकजण मागासवर्गीय मुलांना खाऊ, गणवेष आणि वह्या–पुस्तके वाटून संत होण्याचा प्रयत्न करीत असतात आणि ' दलितमित्र ' म्हणून जगत असतात. आमच्या नावावर थोर होणाऱ्या तमाम ढोंगी माणसांचा आम्हाला द्वेष वाटतो.

आम्हाला माहीत आहे, या देशात सर्वांत मोठा हिंदू धर्म आहे. या धर्माचे नागरिक बहुसंख्य आहेत. या धर्माला हजारो वर्षांचा इतिहास आहे. हा धर्म समूळ नष्ट करणे म्हणजे जादूची गोष्ट नाही; पण हेही लक्षात घेणे गरजेचे आहे की, हा धर्म बदलत आहे. तो स्वखुशीने बदलत आहे असे नव्हे. या धर्माला टिकून राहावयाचे असेल तर बदलावेच लागणार आहे. कायद्यामुळे दलितांना संरक्षण मिळाले आहे. अस्पृश्यता पाळणे हा कायद्याने गुन्हा आहे. अस्पृश्यांवर होणारा अन्याय–अत्याचार संपला नसला तरी तो गुन्हा आहे. हिंदू धर्माने हा गुन्हा मानला नव्हता. या गुन्ह्याखाली आज कुठल्याही जातीच्या हिंदूवर खटला भरता येतो व त्याला शिक्षा होते. दवाखाने, शाळा, वाहतूक व्यवस्था, राजकारण, खेळ, साहित्य, नाटक, संगीत अशा अनेक कारणांमुळे सवर्ण व शूद्र एकत्र येत आहेत. अस्पृश्यांसाठी वेगळे पाणवठे आहेत; पण हाच अस्पृश्य मुलगा हॉटेलमध्ये नोकरी करतो आणि हॉटेलमध्ये येणाऱ्या सवर्ण गिऱ्हाइकांना चहा–पाणी देतो तेव्हा त्याची जात पाहिली जात नाही. बसमध्ये, रेल्वेमध्ये सवर्ण आणि अस्पृश्य मांडीला मांडी लावून बसतात. माझ्या बसच्या प्रवासात मी अनेक वेळा अनुभवलेय, अनेक सवर्ण सुंदर स्त्रिया

माझ्याशेजारी बसून उत्तेजित झाल्या होत्या. अशी सवर्ण स्त्री एरवी माझ्यासारख्या अस्पृश्याच्या मांडीला मांडी लावून उत्तेजित होणे तर दूरच; पण बसूही शकली नसती. अनेक सवर्ण स्त्रिया अस्पृश्यांच्या मुलांवर प्रेम करीत आहेत. त्यांच्याशी विवाहबद्ध होत आहेत.

शिक्षण, बदलती समाजव्यवस्था, कायदा, वाढणारी शहरे, राजकारणाचा प्रभाव, आधुनिक ज्ञानाचा झपाट्याने होणारा प्रसार, विज्ञानामुळे जवळ येणारे जग, पाश्चात्त्यांची भाषा, संस्कृती, चालीरीती आणि पेहराव यांमुळे सनातन हिंदू धर्म बदलताना दिसतो आहे. हा बदल झपाट्याने होत नाही. अजूनही हिंदू माणसाच्या मनामनात जातीयतेचे जहरी विष आहे. हिंदूंच्या मनातील माणूसद्रोही हिंदुत्व नष्ट व्हावे आणि तो भारतीय व्हावा, हाच आमचा प्रयत्न आहे. आम्हाला माहीत आहे, हिंदूंच्या सहजीवनाशिवाय आम्ही जगू शकत नाही; तसेच आमच्या अस्तित्वाशिवाय हिंदू जगू शकणार नाहीत. हा प्रश्न हिंदू आणि अस्पृश्यांपुरताच नाही. इथला अल्पसंख्यांक शीख, मुस्लिम आणि ख्रिश्चन समाजही हिंदूंपासून तुटला आहे. तो दलितांइतका विद्रोही बोलू शकत नाही. ख्रिश्चन आणि मुस्लिम हे परराष्ट्रीय धर्माचे अनुयायी असल्याने त्यांची मानसिकता दुबळी बनलेली आहे. आज ना उद्या तेही संघर्षाच्या मार्गानेच जाणार आहेत. तेव्हा आपले राष्ट्र संघर्षानेच दुबळे बनवायचे की माणुसकीच्या न्यायाने बलवान बनवायचे, हे ठरवले पाहिजे.

या देशात अनेक जाती आहेत. प्रत्येक जातीचे वेगवेगळे संस्कार आहेत. त्यांच्या सवयी, चालीरीती, रोटीबेटी ही त्यांच्या जातीपुरतीच बंदिस्त आहेत. प्रत्येक जात एका स्वतंत्र राष्ट्रासारखी जगत असते. या जाती नष्ट केल्याशिवाय आपण कसे एकात्म होणार ? जाती टिकविणारा धर्म, धर्मग्रंथ, मंदिरे सांभाळणार असाल तर हा जातीजातींनं खिळखिळा झालेला देश विनाशाच्या मार्गानेच जाईल. तुमच्याबरोबर आमचाही विनाश होणार यात काहीच वाद नाही. हा विनाश थांबावा हाच प्रयत्न आहे. जी संस्कृती, जो धर्म, जो समाज, जे राष्ट्र उभे करावयाचे आहे, ते तुमच्या-आमच्या घामाच्या, अश्रूंच्या आणि भावनेच्या ऐक्यातूनच साकार होईल. आम्हाला नगण्य समजून, आम्हाला अस्पृश्य ठरवून तुम्ही कुठलीच नवी संस्कृती, नवा धर्म, नवा समाज किंवा नवे राष्ट्र घडवू शकणार नाही. भारतीय संस्कृती ही इथल्या मानवी समाजाच्या संघर्ष आणि सहजीवनातूनच होणार आहे. विकृतीशी संघर्ष करावा लागणार आहे आणि संस्कृती स्वीकारावी लागणार आहे. आमचं भांडण इथल्या विकृतीबरोबर आहे. आम्ही ही विकृती संपविल्याशिवाय थांबणार नाही; कारण या विकृतीनेच आमचा हजारो वर्षे छळवाद मांडलेला आहे. आम्ही आज जागे झालो आहोत. आम्हाला आमच्या नाशाची कारणे कळली आहेत. आम्ही संघटित झालो आहोत. तेव्हा लढलेच

पाहिजे. अन्यथा आम्हाला भविष्यकाळ माफ करणार नाही; कारण या देशाला समृद्ध आणि सामर्थ्यशाली बनवण्याची ऐतिहासिक जबाबदारी आमच्या शिरावर येऊन पडली आहे.

या देशातील विकृत माणसं आम्ही नष्ट करू इच्छितो. या देशातील विकृत धर्मग्रंथ आम्ही नष्ट करू इच्छितो. या देशातील जातीवाद आम्ही गाडून टाकू. या देशातील अस्पृश्यता आम्ही बंद करू. या देशातील रानटी रूढी समूळ उखडून टाकू. या देशातील 'माणूस' सर्वप्रथम 'माणूस' बनवू. या देशातील माणूस न्याय, समता, स्वातंत्र्य आणि बंधुताप्रिय बनला की आमची लढाई संपेल. तोवर आम्हाला अविश्रांत रावावे लागणार आहे आणि यासाठीच आमचा जन्म आहे. हा देश असाच जगला तर तो लवकर मरेल; म्हणून आम्हाला युद्धपातळीवर काम करावयाचे आहे. केवळ विकासाच्या योजना रावबून नवीन इमारती, नवीन सडका, नवे कारखाने निर्माण करण्याने सुधारणा होत नसते. जातिव्यवस्था बळकट ठेवून या योजना रावविल्या तर जातिव्यवस्था नष्ट होणार नाही. ती मजबूत होईल.शोषकाचे हात बळकट होतील. हे आम्हाला होऊ द्यावयाचे नाही. सडकांबरोबर संस्कृती निर्माण झाली पाहिजे. नवी संस्कृती, ती सर्वांच्या सहजीवनातूनच साकार होणार आहे; पण हिंदुधर्म सहजीवन नाकारतो. रोटीबेटी व्यवहाराला विरोध करतो. तो माणसाला माणसापासून जातीच्या नावावर दूर ठेवतो. त्याला हीन लेखतो. हिंदु-धर्मातील हे माणूसद्रोही तत्त्वज्ञान लवकर समूळ नष्ट झाले पाहिजे. हा प्रश्न केवळ हिंदूंचा नाही. तो आमचाही आहे; कारण या प्रश्नांमुळे आमचे भूत, भविष्य आणि वर्तमान चिरडले आहे.

भारतीय दलित पँथर माणसाला महान मानते. माणसाच्या मुक्तीसाठी लढते. माणसाचं कुठल्याही कारणाने होणारे शोषण पँथरला अमान्य आहे. पँथर रानटी माणसांना शत्रू समजते. पँथर माणसासाठी मरण पत्करते. पँथरची चळवळ ही मानवमुक्तीची चळवळ आहे. ती माणसाला शोषणमुक्त करू इच्छिते. माणसाला सहजीवनाचे सुंदर तत्त्वज्ञान सांगू इच्छिते. पँथर या देशातील सर्व दमनयंत्रणा नेस्तनाबूत करू इच्छिते. पँथर म्हणजे एक आंबेडकरी वादळ आहे. पँथर म्हणजे मुक्त माणसाचा स्वाभिमान आहे. पँथर म्हणजे स्वातंत्र्याचा अर्थ आहे. पँथर सर्वसामान्य माणसाची शक्ती आहे. ती सदैव दुबळ्यांची, दलितांची बाजू घेते. पँथर ही मुक्तिलढाच आहे.

११

भारतीय दलित पँथर आणि शिवसेना

भारतीय दलित पँथर ही दलितांचं हितरक्षण करणारी संघटना आहे, तर शिवसेना ही हिंदुत्वाचं रक्षण करणारी संघटना आहे. आम्ही 'हिंदुत्व'वादी-विरोधी आहोत; त्यामुळे शिवसेनाविरोधी असणे हे आलेच. शिवसेना ही केवळ हिंदुत्वाचं रक्षण करणारी संघटना नाही तर ती दलितांना आणि अल्पसंख्यांकांना ठेचून काढणारी सवर्णांची संघटना आहे. ही संघटना जेव्हा दलितांविरुद्ध दंगल माजवते, तेव्हा अल्पसंख्यांक समाजाविरुद्ध मौन धारण करीत असते. ही संघटना जेव्हा अल्पसंख्यांक समाजाविरुद्ध भूमिका घेऊन सक्रिय होते, तेव्हा ती दलितांविषयी मौन पाळते. याचा अर्थ ती एकेका समाजाला वेगवेगळे पाडून वेगवेगळचा वेळी अत्याचार करीत असते. एकाच वेळी दलित आणि अल्पसंख्यांक समाजावर जर अन्याय करण्याचं सत्र ही संघटना जेव्हा सुरू करील, तेव्हा आपोआप दलित व अल्पसंख्यांक समाजात भावनिक ऐक्य निर्माण होईल आणि असे ऐक्य हिंदुत्ववादी संघटनांना नको आहे; कारण त्यांना ते परवडणारे नाही.

शिवसेना किंवा अन्य हिंदुत्ववादी संघटनांचा हा कावेबाजपणा सतत दंगलीचे भक्ष्य ठरणाऱ्या समाजाच्या लक्षात आणून देणे गरजेचे आहे. इथला दलित समाज मुस्लिम समाजापेक्षा अधिक बंडखोर आहे, याचे कारण हा समाज भारतापासून फुटून निघाला नाही. पाकिस्तानच्या निर्मितीमुळे भारतीय मुस्लिमांच्या जुन्या पिढचा या अपराधी भावनेने जगल्या आहेत. पाकिस्तानात मुस्लिमांनी हिंदूंचा छळ केला आहे.

तर भारतात हिंदूंनी मुस्लिमांचा छळ केला आहे. हा रक्तलांच्छित इतिहास आहे. रक्ताचा एकही थेंब न सांडता स्वातंत्र्य मिळाले असले तरी हे स्वातंत्र्य हिंदू–मुस्लिमांच्या दंगलींनी, रक्ताने, अश्रूंनी कलंकित झालेले आहे, हे विसरणाऱ्यांनी जरूर विसरावे. हिंदू–मुस्लिम दंग्यात मुसलमानांना बकऱ्यासारखे कापले आहे. पाकिस्तानात हिंदू भंगी आहेत तर भारतात मुस्लिम भंगी आहेत. हिंदू–मुस्लिम द्वेषाचं यापेक्षा ठळक उदाहरण आणखी कुठलं असू शकेल ?

पाकिस्तानच्या निर्मितीमुळे उद्‌भवलेल्या भीषण दंग्यांनी मुस्लिम समाज भयभीत झाला आणि हिंदू समाज आक्रमक झाला. पाकिस्तानची निर्मिती आणि नंतर पाकिस्तानने भारतावरोबर केलेले युद्ध यामुळे इथल्या हिंदूंचा द्वेष सदैव मुस्लिमविरोधी पोसला गेला आहे. इथल्या मुसलमानांना पाकिस्तानात पाठवलं पाहिजे, त्यांना भारतात राहण्याचा अधिकार नाही; कारण त्यांना पाकिस्तान दिले आहे. पाकिस्तान जसा मुस्लिमांचा आहे तसा भारत हिंदूंचा आहे. हिंदुधर्म हा राष्ट्रीय धर्म होईल. भगवा ध्वज हा राष्ट्रध्वज होईल. 'मुस्लिम नाव असलेल्या शहरांची नावं बदलली जातील आणि हिंदूंचं राज्य आणलं जाईल,' अशी भूमिका हिंदुत्ववादी संघटनांची आहे. याविरुद्ध मुस्लिम समाज आवाज उठवू शकला नाही; कारण या समाजात अपराधी भावना होती.

हिंदुत्ववाद्यांपासून संरक्षण मिळावे म्हणून हा समाज 'राष्ट्रीय एकात्मता' मानणाऱ्या काँग्रेसच्या वाजूने राहिला आहे. काँग्रेसने 'राष्ट्रीय ऐक्य' जगविले आहे. मतासाठी का होईना, काँग्रेसने 'मुस्लिम हित' लक्षात घेतले आहे; त्यामुळे मुस्लिम समाज मोठ्या संख्येने काँग्रेसच्या वाजूने उभा राहिला आहे. काँग्रेसच्या राजकारणाच्याही काही मर्यादा आहेत. काँग्रेस हा राष्ट्रीय पक्ष आहे. अनेक जाति-जमातींचा पक्ष आहे. तो कुठल्या एका जातिधर्माचा पक्ष नाही; त्यामुळे तो कुठल्या एका समाजाचे प्रश्न प्रधान मानून कार्य करीत नाही. यासाठी स्वतंत्रपणे मुस्लिम प्रश्न घसास लावण्यासाठी मुस्लिम संघटना निर्माण झाल्या. मुस्लिम संघटना निर्माण होण्याचं एकमेव श्रेय भारतीय लोकशाहीला द्यावे लागेल.

मुस्लिम समाजातील आजची पिढी ही अपराधी भावनेतून मुक्त झालेली आहे. ती हिंदुत्वविरोधी भावनेने संघटित होत आहे आणि यापुढे ही भावना प्रबळ होत राहणार आहे, हे सांगणे नको. मुस्लिम संघटना मुस्लिम हितांना घेऊन यापुढे रस्त्यात येणार आहेत. आजवर हा समाज जसा जगला तसा यापुढेही जगेल असे समजणे गैर आहे. हा समाजही भारतीय आहे. मुस्लिम माणूस या देशाचा नागरिक आहे. त्यालाही आता सत्ता–संपत्तीत अधिकार हवे आहेत. त्याला लोकशाही मार्गाने नाही मिळाले तर तो अधिक कडवा मुस्लिम होईल. तो 'राष्ट्रीय' होण्यापेक्षा

अधिक 'अराष्ट्रीय' होईल; कारण त्याच्या राष्ट्रीयत्वाचीच जर आपण आजही शंका घेऊ लागलो तर तो राष्ट्रीय राहावा असं समजणं चुकीचेच ठरणार आहे. इथल्या मुस्लिमांना अराष्ट्रीय वनविण्यात जितका हिंदुत्ववाद कारणीभूत आहे, तितकाच दलितांनाही तो याच मार्गाने जाण्यास भाग पाडेल की काय, अशी भीती वाटते.

हिंदुत्ववादी प्रभावी विचारधारेमुळे अल्पसंख्यांक समाज आणि बहिष्कृत जातिजमाती वेगळ्या राहिल्या आहेत. हिंदुत्ववाद म्हणजे ब्राह्मण्यवाद होय. हिंदू म्हणजे एक माणूस नाही, तर अनेक जातींत विखुरलेला एक समाज आहे. 'हिंदू' या नावाने इथला कुठलाच माणूस ओळखला जात नाही; ओळखला जातो तो त्याच्या जातीने. हिंदू धर्म हा अनेक जातींचा धर्म आहे. या जातीतही, श्रेष्ठ–कनिष्ठता आहे. दुसरे म्हणजे या धर्मातून कुठल्याही धर्मात प्रवेश करता येतो; धर्मांतर करता येते. माणूस बौद्ध, शीख, ख्रिश्चन वा मुस्लिम होऊ शकतो; पण हिंदू होऊ शकत नाही; कारण हिंदू धर्मात यायचे झाल्यास त्याने कुठल्या जातीत प्रवेश करावा, हा प्रश्न आहे; त्यामुळे या धर्माला कंटाळलेले धर्मांतर करतील. जे या धर्मात राहतील, ते या हिंदू धर्मातील जातिव्यवस्था आणि वर्णव्यवस्था नाकारतील आणि त्यामुळे मूळ हिंदू धर्म नष्ट होईल.

आमचा उद्देश हाच आहे की, इथला हिंदू धर्मच काय, सर्व धर्म नष्ट झाले पाहिजेत, सर्व जाती नष्ट झाल्या पाहिजेत. भारत देश एक उकळती कढई बनली पाहिजे. या कढईमध्ये सर्व जाती, जमाती, पंथ, भाषा, प्रदेश आणि धर्म वितळले पाहिजेत. त्यांचा एकमेकांमध्ये संकर झाला पाहिजे आणि एक नवी भारतीय संस्कृती निर्माण झाली पाहिजे. मुळातच सहजीवन, सहवास आणि संकराला हिंदुत्ववाद विरोध करतो. वर्णश्रेष्ठत्वाची भावना तो सोडत नाही. त्याचा परिणाम म्हणून सर्वच जातीजमाती आपलं अस्तित्व स्वतंत्र टिकवून ठेवत आहेत; त्यामुळे नवी संस्कृती निर्माण होण्यापेक्षा जुन्याच संस्कृतीचे पुनर्जीवन होताना दिसते. याला भारतीय दलित पँथर विरोध करते. पुनर्जीवनवाद, प्रतिगामी प्रवृत्ती पँथर हाणून पाडते.

आजवर हिंदुत्ववाद हा आर. एस. एस.च्या शाखांवर शिकवला जात होता. मूठभर ब्राह्मण समाजातील माधुकरी मागणारी मुले लाठ्या–काठ्यांच्या लढाईत टिकणार नाहीत; तेव्हा इथला मराठा, कुणबी, तेली, तांबोळी हा समाज हाताशी धरला पाहिजे, त्यांच्या डोक्यात हिंदुत्ववाद घुसला पाहिजे आणि त्यांना दलित व अल्पसंख्यांकांविरुद्ध सैनिकांसारखे वापरले पाहिजे, या उद्देशाने शिवसेना निर्माण झाली. शिवसेना छत्रपती शिवरायांच्या नावानेच का निर्माण होते ?

शिवाजी महाराजांचे नाव घेतल्याने ब्राह्मणेतर समाज हा हिंदुत्वाच्या

दावणीला आणता येतो, ही कूट नीती आहे. ज्या ब्राह्मण धर्माने शिवरायाना शूद्र ठरवून राज्याभिषेक नाकारलेला आहे, त्या ब्राह्मणधर्माने आता छत्रपतींना स्वीकारले आहे याचे कारण त्याला शिवाजीराजे प्रिय आहेत असे नव्हे, तर शिवाजी महाराजांपेक्षाही त्यांना ' हिंदुत्व ' प्रिय आहे. ज्या शिवाजी महाराजांनी मावळ्यांना घेऊन स्वराज्य स्थापन केले, त्या मावळ्यांच्या छत्रपतींचा राज्याभिषेक करायला गागाभट्टानी नकार दिला आहे. मावळ्यांचं राज्य येऊ नये, पेशवाई टिकावी म्हणून छत्रपती शिवाजी महाराजांचा जप चालू आहे.

' गोब्राह्मण प्रतिपालक ' असे छत्रपती शिवाजो महाराज होते याचा प्रचार होतो. केवळ गाई आणि ब्राह्मणांचं प्रतिपालन करणं हे छत्रपती शिवाजीराजांनी केलेलं नाही. शिवाजीराजांना स्वीकारण्यामागे हिंदुत्ववाद्यांचा आणखी एक उद्देश आहे, तो म्हणजे शिवाजीराजांना ' मुस्लिमविरोधी ' म्हणून उभे करणे त्यांना सोयीचे होते. अफझलखान, औरंगजेब या शिवाजीराजांच्या शत्रूंना आज द्वेषाने शिव्या देण्यामागचे एकमेव कारण म्हणजे या निमित्ताने त्याना आजच्या भारतीय मुसलमानांना औरंगजेब व अफझलखान यांचे वंशज ठरवायचे असते आणि स्वतःला शिवाजीराजे यांचे वंशज ठरवून इतिहासातील युद्ध आज खेळायचे असते. शिवाजी आणि औरंगजेब हे भारतीय राजे होते, हे ऐतिहासिक सत्य त्यांना लपवून ठेवायचे असते. आपण स्वतंत्र भारताच्या इतिहासात जगत आहोत, हे आजही हिंदुत्ववाद्यांना मान्य नाही. ते आजही वेद–पुराणांचा काळ पुन्हा आणू इच्छितात. त्यांना मागे जायचे आहे. पँथर राष्ट्राला पुढे नेऊ इच्छिते.

' होता भिवा म्हणून वाचला शिवा ' हा इतिहास आहे. हा भिवा शूद्र होता, हे लक्षात घेतले पाहिजे. भिवाने शिवाला वाचवले; पण आज शिवाच्या नावाने भिवाचे खून होताहेत. बाबासाहेबांचं नाव भिवा होतं. आज त्यांचं नाव नाकारलं जात आहे. ही शिवसंस्कृती नव्हे, ही ब्राह्मणी संस्कृती आहे. पँथरला भारतीय संस्कृती हवी आहे.

शिवसेना ही ब्राह्मण्यवादी आहे, ती मावळा, मराठा, कुणबी, तेली, तांबोळी यांच्याविरुद्ध आहे, हे शिवसेनेतील तरुणांना उमगत आहे. लाठ्या, काठ्या धनगर–मराठा या समाजाच्या मुलांनी घ्यावयाच्या आणि नेतृत्व मात्र शिवाजींच्या नावाने ब्राह्मणांनी करायचं, हे मावळचा-मराठ्यांना कळलं आहे. शिवसेनेच्या जातीयवादाविरुद्ध शिवसैनिकांमध्ये असंतोष निर्माण होत आहे; कारण शिवसैनिकांत बहुसंख्य सैनिक हे ब्राह्मणेतर समाजातले आहेत. त्यांनी ब्राह्मण्यवादाविरुद्ध हल्ला सुरू केला आहे; त्यामुळे शिवसेना आता फुटीच्या मार्गाने जात आहे. ब्राह्मण शिवसेना आणि ब्राह्मणेतर शिवसेना असे गट होणार आहेत, याचं ज्वलंत आणि सत्य उदाहरण द्यायचे झाल्यास शिवसेनेतील मनोहर जोशी यांच्या ब्राह्मणी नेतृत्वाला नाकारून

छगन भुजबळ यानी शिवसेना फोडली. छगन भुजबळ आणि त्यांचे इतर आमदार जेव्हा शिवसेना जातीयवादी आहे, ती मंडल आयोगाविरुद्ध आहे, ती ब्राह्मण्यवादी आहे, ती ब्राह्मणेतर समाजविरोधी आहे, असे म्हणतात, तेव्हा शिवसैनिकांना शिवसैनिकांकडूनच उत्तर मिळाले, हे लक्षात घेतले पाहिजे.

फुले–आंबेडकरांचे स्वप्न साकार करण्यासाठी शिवसेनेत असलेल्या ब्राह्मणेतर कार्यकर्त्यांनी समतेच्या लढाईत सामील झालं पाहिजे. शिवसेनेत राहून दलितांच्या झोपडचा पेटविण्यापेक्षा दलित पँथरमध्ये येऊन गरीब, दलित, दुबळचा समाजाच्या बाजूने उभे राहिले पाहिजे. जातिव्यवस्था नष्ट करण्यासाठी त्यांनी पँथरवादी बनले पाहिजे. आम्ही त्यांना हिंदुत्व शिकवणार नाही; त्यांना भारतीयत्व शिकवू. आम्ही त्यांना खऱ्या अर्थाने भारतीय करू.

१२

नथुराम की राम ?

' राम ' या शब्दाला गेल्या अर्धदशकात खूप महत्त्व प्राप्त झाले आहे. ' राम ' ही एक भावना बनली आहे. विशेष करून हिंदुत्ववाद्यांनी हा ' रामवाद ' लोकांपुढे अलीकडे सतत मांडलेला आहे. या भावनेची पाळंमुळं काय आहेत की ज्यामुळे ' राम ' हा आज वादविषय बनत आहे. रामायण या महाकाव्यातील ' राम ' आज कलह-विषय का ठरत आहे, याची कारणं तपासली पाहिजेत. विशेषतः महाराष्ट्रात याविषयी गेल्या अर्धदशकात उलटसुलट चर्चा झाली आहे. या चर्चेची चिकित्सा करणे मला गरजेचे वाटते.

' रामायण ' आणि ' महाभारत ' ही दोन महाकाव्ये आहेत; पण ' रामायण ' हे हिंदू संस्कृतीचे तपमापक आहे. रामाला जसा इथला समाज आदर्श मानतो, तसाच सीतेलाही आदर्श मानतो. पुरुषानं रामासारखं मर्यादापुरुषोत्तम असावं, स्त्रीनं सीतेसारखं पतिनिष्ठ असावं, अशी ही भावना गेल्या अनेक वर्षांपासून जपली गेली आहे. हा ग्रंथ हजारो वर्षांपासून अक्षरवाङ्मय म्हणून भारतीय साहित्यात अमर ठरला आहे. इतकेच नव्हे तर या ग्रंथातील शहरं, जागा, स्थळं आज पवित्र तीर्थक्षेत्रे बनली आहेत. दूरदर्शनवरील रामायण कितीतरी श्रद्धेनं पाहिलं जायचं. ही भावना सर्वांमध्ये असली तरी दक्षिण व उत्तरेत याचा अतिरेक जाणवतो.

दोन भारत

आपला भारत देश थोडासा अमेरिकेला मिळताजुळता आहे. दक्षिण आणि

उत्तर अमेरिका असे दोन विभाग या राष्ट्राचे पडलेले आहेत. एका विभागात काळ्यांची संख्या अधिक तर दुसऱ्या विभागात गोरे लोक अधिक. उत्तर भारतात प्रथम आर्य आले आणि त्यांनी हळूहळू आपली वसाहत उत्तरेकडे वाढवली. आर्यांची संख्या उत्तर भारतात स्थिरावली म्हणून इथले लोक व संस्कृती ही 'आर्य संस्कृती' ठरली आहे. उत्तर भारतातील हिंदी भाषा, त्यांचं धिप्पाड गोरंगोमटं शरीर हे उदाहरण म्हणून देता येईल. दक्षिण भारत हा द्रविडांचा आहे. द्रविडांच्या तमीळ, तेलगू सारख्या भाषा, त्यांचा काळा रंग, त्यांची अनार्य संस्कृती ही वेगळीच आहे. उत्तर भारतात रावणाचं दहन केलं जातं, तर दक्षिण भारतात रामाचं दहन करतात. आर्य–अनार्य संस्कृतिसंघर्षातला हा टिकून राहिलेला अवशेष आहे. उत्तर भारतात रामाविषयी उत्तमोत्तम ग्रंथ अधिक लिहिले गेले आहेत, तर दक्षिणेत रामविरोधी ग्रंथलेखन केलं गेलं आहे. रामस्वामी नायकर, पेरियर यांनी अशा विचारांना पुष्टी दिली आहे.

महाराष्ट्रात 'राम' हा सतत वादाचा विषय बनलेला आहे. प्रा. अरुण कांबळे यांनी 'दै. नवशक्ती'मध्ये रामाविषयी लेखन केलं होतं. पुढं त्यांचं 'रामायणातील संस्कृती–संघर्ष' हे पुस्तकही प्रकाशित झालं. या पुस्तकात रामाविषयी प्रा. अरुण कांबळेनी अभ्यासपूर्ण लेखन केलं आहे. या पुस्तकाची उलटसुलट चर्चा झाली. कर्तारसिंग थत्ते यानी तर दै. नवशक्तीच्या कार्यालयात जाऊन धुडगूस घातला. प्रा. कांबळे याना जिवे मारण्याचा संकल्प केला. धार्मिक श्रद्धा दुखावल्यानंतर माणूस पिसाळतो. सलमान रश्दी या लेखकानेही महंमद पैगंबराविषयी असेच लेखन केले. संपूर्ण मुस्लिम समाज ढवळून निघाला. इराणमध्ये सलमान रश्दीना जिवंत मारण्याचं सरकारी फर्मान निघालं. व्यक्ती, समाज आणि शासनही अशा प्रकारे श्रद्धाखोर असतातच. छत्रपती शाहू महाराजांची बदनामी करणारे लेखन प्रकाशित झाल्यामुळे गॅझटचे संपादक मंडळच महाराष्ट्र शासनाने बरखास्त केले नाही का ? म. फुले यांची बदनामी केली म्हणून बाळ गांगलांविरुद्ध किती ओरड झाली ? छत्रपती शिवाजी महाराजांची बदनामी करणारा लेख खुशवंतसिंगानी लिहिला म्हणून 'इंडिया टुडे' या अंकाची होळी करण्यात आली. शूद्र व स्त्रियांविषयी अमानुष आज्ञा मनुस्मृतीमध्ये सांगितल्या आहेत, म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकरानी मनुस्मृती जाळली नाही का ? अस्तित्व व अस्मिता दुखावली गेली की माणसं खवळून उठतात. अशी कितीतरी उदाहरणे देता येतील.

एखाद्या पुतळ्याची विटंबना झाली, एखाद्या मंदिराची किंवा मशिदीची विटंबना झाली की सर्व समाज विध्वंसक बनतो. एखादी गाय मुस्लिम खाटकांनी ओढून नेताना पाहिले की दंगली होतात, एखाद्या मशिदीपुढे डुक्कर आले की, दंगलींना ऊत येतो. मुस्लिमांनी 'फटाके' उडवले म्हणून कुणाचं माथं भडकतं.

हिंदूंनी मशिदीपुढे वाद्ये वाजविली म्हणून कुणाच्या तळपायाची आग मस्तकाला जाते. अन्याय–अत्याचाराविषयी सारे कसे चूप असतात; कारण त्यांच्या श्रद्धा या मंदिर–मशिदीची निगडित आहेत.

सर्व काही माणसांसाठीच !

मंदिर–मशीद ही पूजास्थानं आहेत. माणसानं या ठिकाणी शरण गेलं पाहिजे; पण आज कधी नव्हे इतकी विध्वंसक ठिकाणं म्हणून मंदिरं–मशिदींकडे बोट दाखवता येईल. अमृतसरचे सुवर्ण मंदिर, अयोध्येतील राम मंदिर आज राष्ट्राची सत्त्वपरीक्षा पाहत आहेत. धर्म माणसासाठी आहे. मंदिरं माणसासाठी आहेत. परमेश्वरही माणसासाठी आहे. माणूस हे सर्वश्रेष्ठ मूल्य आहे. माणसाला दुय्यम मानून अलीकडं धर्म व पंथाला अधिक महत्त्व का देण्यात येत आहे ?

संवेदनाक्षम स्थळे आणि राजकारणी

डॉ. आंबेडकरांचं नाव घेतलं की दलित समाज संवेदनाक्षम बनतो. रामाचं नाव घेतलं की हिंदू संवेदनाक्षम बनतो. मशिदीचं नाव काढलं की मुस्लिम संवेदनाक्षम बनतात. म्हणून संवेदनाक्षम जागा हेरून त्या सतत छेडण्याचं काम इथल्या राजकीय पुढाऱ्यांनी केलं आहे. कामचेष्टेत जसं संवेदनाक्षम जागेला महत्त्व असतं, तसाच हा प्रकार आहे. समाजाच्या श्रद्धा सतत छेडून आपलं नेतृत्व निर्माण करण्याचाच प्रयत्न अलीकडे होताना दिसतोय. समाजाच्या समस्यांचं कुणालाच देणं–घेणं नाही. समाजही आपल्या श्रद्धांना कुरवाळत बसला आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा ' रिडल्स इन् हिंदुइझम ' हा ग्रंथही असाच वादविषय ठरला. प्रचंड चर्चा झाल्या. मोर्चे निघाले. लेखनस्वातंत्र्याची बाजू मांडण्यात आली. डॉ. बाबासाहेब आंबेडकरानी ' रामाविषयी ' वाईट लिहिले आहे म्हणून समग्र हिंदू समाज ढवळून निघाला. दलित आणि हिंदू असा तणाव शिगेला पोहोचला. बाबरी मशिदीत रामाचा जन्म झाला आहे. ही मशीद पाडून राममंदिर बांधणार अशी भूमिका ऐरणीवर आली. रथयात्रा निघाली. गावोगाव राममंदिरासाठी विटा जमा करण्यात आल्या. कारसेवेसाठी देशाच्या निरनिराळ्या भागांतून असंख्य कारसेवी अयोध्याला गेले. रथयात्रा अडवण्यात आली आणि मंदिराच्या प्रश्नावर स्वतंत्र सार्वभौम राष्ट्राचं सरकार पाडण्यात आलं. सरकार महत्त्वाचं नाही, मंदिर महत्त्वाचं. मंदिराच्या प्रश्नावर भावना चेतवण्यात आल्या. हिंदू–मुस्लिमांत तेढ वाढली. सतत हिंदू–मुस्लिम किंवा हिंदू–दलित अशा दंगली होत आल्या आहेत; पण या दोन दंगलग्रस्त जाती कधीच एकत्र आल्या नाहीत.

तफावत

दलित–मुस्लिमांचं ऐक्य घडविण्याचा प्रयत्न प्रा. जोगेंद्र कवाडे आणि हाजी मस्तान यांनी केला आहे; पण त्यांना हवे तसे यश मिळाले नाही; कारण डॉ. बाबासाहेब आंबेडकरानी बौद्ध धर्म स्वीकारला आहे, त्यामुळे इथला दलित हा इस्लामधार्जिणा होऊ इच्छित नाही. दलित आणि मुस्लिम हे दोन्ही समाज वेळोवेळी हिंदूंच्या रोषाला बळी पडत असतात. तेव्हा दलित–मुस्लिम ऐक्य घडवून भडकलेल्या हिंदूंना अधिक चिथावण्यापेक्षा एक तर अलिप्त राहिलं पाहिजे किंवा हिंदूंचा अनुनय केला पाहिजे. हीच भूमिका या दोन्ही समाजांची आजवर राहिली आहे; पण अलीकडे हिंदूंची पुनरुज्जीवनवादी शक्ती मोठ्या प्रमाणात एकवटत असल्याने स्वसंरक्षणाच्या हेतूने हे समाजही अधिक एकवटत आहेत. या अल्पसंख्याकांच्या संघटित होण्यात व हिंदुत्ववाद्यांच्या संघटित होण्यात खूप तफावत आहे. आपल्यावर अन्याय होऊ नये म्हणून अल्पसंख्याकांत एकजूट होते आहे तर अल्पसंख्याकांवर अन्याय करणं हा आमचा धर्म आहे म्हणून हिंदुत्ववादी संघटित होत असतात. पण दहाव्या लोकसभेच्या वेळी सर्वसामान्य समाजातलं चित्र हे वेगळं होतं. व्ही. पी. सिंग यानी एकीकडे बाबरी मशिदीचं रक्षण केलं, तर दुसरीकडे ' मंडल आयोगाची ' घोषणा करून ओ. बी. सी. समाजाला हक्क दिले. दलितांनाही ते जवळचे वाटले; कारण त्यानी डॉ. बाबासाहेबांचं तैलचित्र लोकसभेत लावलं. बाबासाहेबाना भारतरत्न ही पदवी दिली. बौद्धांना सवलती दिल्या. यामुळे महार आणि मुस्लिम हा व्ही. पी. सिंगवादी झाला आहे. सर्वसामान्य मुस्लिम व महार समाजाच्या माणसात ही भावना उघड उघड दिसून येईल. हे राजकीय ध्रुवीकरण होत आहे असं म्हटलं जातं. या राजकीय ध्रुवीकरणात केवळ ' मंडल ' हा निकष असता तर ते मान्य करता आले असते. पण या ध्रुवीकरणात एकीकडे मुस्लिमांची मशीद, दुसरीकडे दलितांचे आंबेडकरप्रेमही आहे. ' राम ' आणि ' मंडल ' अशी ही लढाई नाही. यात ' रहिम 'ही आहे.

रामाला वेठीस धरले

राजकारण डावे असो किंवा उजवे, ते लोकांच्या भावना बळकावून केले जाते. आज ' रामा 'लाही असेच वेठीस धरले आहे. भारतीय जनता पक्षाने ' राम, रोटी और इन्साफ ' अशी घोषणा दिली असली तरी ' राम ' हा त्यांच्या डिबेटचा मुख्य प्रश्न आहे. एकीकडे ' राम ' हा भावनेचा प्रश्न बनवला गेला आहे, तर दुसरीकडे त्याला उत्तर म्हणून ' राष्ट्रीय एकात्मता ' हा विषय आणला आहे. रामाविरुद्ध राष्ट्रीय एकात्मता असे या चर्चेचे स्वरूप आहे. रामामुळे राष्ट्रीय ऐक्य धोक्यात येईल, देशाची फाळणी होईल असा सूर लावला जात आहे. ज्या राष्ट्रात रामाला

आदर्श मानले आहे, त्याच राष्ट्रात राष्ट्रीय ऐक्याच्या प्रश्नावरून दुय्यमत्व देण्यात येत आहे. एक पक्ष राष्ट्र मोठे मानतो, एक पक्ष रामाला मोठे मानतो. राष्ट्रीय ऐक्याची भावना उगाळून सत्ता साधण्याचा डावही मला ' राममंदिर ' वाल्यांइतकाच निकृष्ट वाटतो. लोकांच्या प्रश्नावरच राजकारण केलं गेलं पाहिजे, भावनेवर नाही. मग ही भावना कुठलीही असो.

धार्मिक भावनेला हात घालणारी मागणी

' राम ' हा नाजूक व स्फोटक विषय आहे असे कळल्यानंतर त्याचा फायदा उठवण्याचा प्रयत्न होतो आहे. ' प्रभू रामाची शपथ तुम्हाला, मते द्या हिंदुत्वाला ' ही विश्व हिंदू परिषदेची मागणी धार्मिक भावनेला हात घालणारी आहे. मतासाठी राम पुढे करण्याचा प्रकार घडल्यामुळे कधी नव्हे इतकी ' राम ' ही राजकीय एन्टीटी व आयडेंटिटी बनली आहे. रामास जितके ग्लोरीफाय करता येईल तितके करण्याचा प्रयत्न होतो आहे. रामाच्या नव्या नव्या व्याख्या त्यामुळेच करण्यात आल्या. ' हिंदुत्व धोक्यात आले आहे. ' ' हिंदू जगेल तर राष्ट्र जगेल.' अशा घोषणा मोठ्याने होऊ लागल्या. ' राम आणि हिंदुत्व ' असं समीकरण मांडण्यात येऊ लागलं. ' राम ' ही केवळ हिंदूंचीच इस्टेट आहे असंही समजण्यात आलं. हिंदू म्हणजे केवळ भाजप व शिवसेनेला मानणारे असेही गणित मांडले जाऊ लागले. काँग्रेस, जनता दल, जनता पक्ष, कम्युनिस्ट अशा अनेक राजकीय पक्षांना अनुसरणाऱ्या हिंदूंविषयी बोलणे टाळण्यात येऊ लागले. भगवा झेंडा, भगवा गुलाल यांना जसं महत्त्व प्राप्त झालं, तसंच निळा झेंडा, निळा गुलाल व हिरवा झेंडा यांनाही महत्त्व प्राप्त होऊ लागलं. जाती तिखट बनू लागल्या आणि प्रत्येक जातीने आपल्या जातीच्या माणसाला महात्मा ठरवण्याचं काम सुरू केलं. जुन्या, अज्ञात व्यक्तींचा शोध करून त्यांना श्रद्धास्थान मानण्यात आलं. मातंग समाजाने ' लहुजी वस्तादा 'चा शोध घेतला. ढोर समाजानी ' वीरशैव ककय्या 'चा आधार घेतला. श्रद्धा अधिक बळकट करणे हा एकमेव कार्यक्रम अलीकडे फोफावतो आहे. या श्रद्धा केवळ श्रद्धाळू माणसाच्या असत्या तर खूप बरे झाले असते; पण ह्या श्रद्धा दुसऱ्याच्या द्वेषातून निर्माण झाल्या आहेत. ' रामा 'विषयी सर्वांनाच प्रेम असू शकते; पण अलीकडील रामाविषयीचे प्रेम हे मुस्लिम द्वेषातून फोफावते आहे; म्हणूनच राष्ट्रीय ऐक्य धोक्यात येत आहे, अशी हाकाटी राजकारणात येते आहे, हे लक्षात घेतले पाहिजे.

पुजाऱ्याचा राम आणि पुढाऱ्याचा राम

' हिंदुत्व ' धोक्यात आले आहे का ? खरे तरं हिंदू, मुस्लिम, ख्रिस्ती व दलित माणूस हा महागाई, भ्रष्टाचार, अन्याय, अत्याचार यांमुळे गांजला आहे. या भौतिक जगात माणूस पोखरला जात आहे, एकाकी होतो आहे. त्याला या गर्दी–

गोंधळाच्या जगात जगण्यासाठी केवळ श्रद्धा तेवढ्या शिल्लक होत्या; पण आज या श्रद्धेचंही व्यापारीकरण होते आहे, ही खेदाची गोष्ट आहे. पुजारी ' रामाचा ' उपयोग देणगीसाठी करून घेतात, तर पुढारी ' मतासाठी. ' पुजाऱ्याचा राम व पुढाऱ्याचा राम यांत खूप तफावत आहे. तशीच रामाविषयी भक्तांची व मतदारांची श्रद्धाही वेगवेगळी आहे.

म. गांधीजींनी ' रामा 'ला राज्याचा आदर्श म्हणून स्वीकारले. ' रामराज्या 'ची कल्पना मांडली. त्यांच्या ' रामराज्या 'त भंगी राष्ट्रपिता व्हावा, राम–रहिम एक असावा, अस्पृश्य हे हरिजन (हरीचे जन) आहेत. ' स्वदेशीचा स्वीकार व परदेशी मालाची होळी ' ही त्यांची कल्पना होती; पण या गोष्टी ' हिंदुत्ववादी ' रामराज्याच्या चौकटीत येऊ शकत नाहीत. तिथं ' हिंदूहित ' याविषयीच्या गोष्टी असतात.

मंडल : फसवा विरोध

' हिंदूहित ' हे देखील व्यापक नसतं; कारण मंडल आयोगातील आजवर अविकसित असलेल्या हिंदू जातींना फायदा मिळणंदेखील मान्य होत नाही. विरोधासाठी ' आर्थिक निकष ' पुढे आणला जातो. खायचे दात वेगळे असतात, दाखवायचे दात वेगळे असतात. देवीलाल यानी शेतकऱ्यांच्या मेळाव्याचं आयोजन केलं म्हणून व्ही. पी. सिंगानी मंडल आयोग लागू केला हे जसं खरं आहे, तसंच ' मंडल आयोग ' लागू केला म्हणून रथयात्रा सुरू झाली, हेही खरं आहे. रथयात्रा ही केवळ रामासाठी नव्हती तर ती मशीद व मंडल-विरोधी होती. या रथयात्रेमुळे ' राम ' देश आणि देशाबाहेरील चर्चेचा विषय ठरला आहे.

शिवरायांचा राज्याभिषेक नाकारणारेच त्यांना स्वीकारतात

' राम ' हा एकदा भावनेचा विषय बनवल्यानंतर ' हिंदुत्वा 'ला चेतवण्यात आले. ' हिंदुत्व ' प्राण मानून राजकारणातल्या संघटना एकत्र आल्या. भारतीय जनता पक्ष, शिवसेना व विश्व हिंदू परिषद यांनी ' हिंदुत्व ' हा चर्चेचा विषय केला. महाराष्ट्रात शिवसेनेने ' शिवाजी आणि हिंदुत्व ' असे समीकरण मांडले. ' जय शिवाजी, जय भवानी ' या घोषणा जातीय भावनांना चिथावू लागल्या. लोकमान्य टिळकांनी ' शिवजयंती ' उत्सव राष्ट्रीय भावनेसाठी सुरू केला होता; पण आजच्या शिवजयंतीत ही राष्ट्रीय भावना किती असेल ? शिवाजी महाराजाना हिंदुत्ववाद्यांनी हस्तगत केलं आहे. ज्यांनी ज्ञानेश्वरांचा उपनयन संस्कार करण्याचं नाकारून त्याना समाधी घेण्यास भाग पाडलं, ज्यांनी शिवरायांचा राज्याभिषेक नाकारून त्याना शूद्र लेखलं, ज्यांनी बाबासाहेबाना संस्कृत शिकवण्याचं नाकारून त्याना पारशी शिकायला लावलं, त्या हिंदुत्ववाद्यांनी शिवाजी, ज्ञानेश्वर व आंबेडकर या तीन महापुरुषांना

आता नको इतकं स्वीकारलं आहे, केवळ राजकारणासाठी.

नथुरामचे पुतळे कशासाठी ?

शिवाजी महाराजांची ' शिवसेना ' ही आता ' नथुरामचे पुतळे उभारण्याची भाषा बोलते आहे. शिवाजी आणि गांधीजी यांनी स्वभाषा, स्वधर्म, स्वराज्य आणि स्वदेशीला राजकारणाचे सूत्र मानले आणि ते परकीयांविरुद्ध लढले आहेत. पण शिवाजी महाराजांचा उपयोग करून स्वकीयांतच भांडणं पेरण्याचं काम सध्या सुरू झालं आहे. शिवाजी व नथुराम यांना एकत्र आणणं म्हणजे महाराष्ट्राची अस्मिता दुखावणं आहे. गांधीजींचा अपमान करणं व नथुरामाचा गौरव करणं ही राष्ट्रीय भावना दुखावणारी घटना आहे. म. गांधीजींच्या समाधीची नासधूस काही दलित कार्यकर्त्यांनी केली. राजघाटावर देशातल्या महत्त्वाच्या व्यक्तींच्या समाधी आहेत· पंडित जवाहरलाल नेहरू, म. गांधीजी, इंदिराजी गांधी, चौधरी चरणसिंह अशा नेत्यांचा अंत्यसंस्कार इथं झाला आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर घटनेचे शिल्पकार होते. त्यांचं निधन दिल्लीत झालं असं असतानाही त्यांचा अंत्यसंस्कार मुंबईत का ? त्यांची समाधी राजघाटावर का नसावी ? या हेतूने काही दलित तरुणांनी बापूजींच्या समाधीची नासधूस केली. हे निंद्य कृत्य होते. लगेच बहुजन समाज पार्टीने त्याचा निषेध केला आहे; पण कुठल्याच शिवसैनिकाने ठाकरे यांच्या विधानाचा निषेध केला नाही, हे लक्षात घेण्यासारखे आहे.

जुन्या जखमा ताज्या करणारा प्रवास

रामाकडून हिंदुत्वाकडे, शिवाजीकडून नथुरामाकडे हा प्रवास चालू आहे. जुन्या जखमा बऱ्या करावयाच्या की उकरून ती दुखापत वाढवायची ? जखमा जागया करणं ही विकृती आहे. ती व्यक्तिगत जीवनात ज्यांनी त्यांनी जोपासावी; पण राष्ट्राच्या जीवनात ती निश्चितच विघातक आहे.

१३

दलित पँथर व दलित साहित्य

दलित पँथर आणि दलित साहित्य ही आंबेडकरी चळवळीची दोन फुप्फुसे आहेत. पँथर चळवळीमुळे दलित साहित्याला विद्रोहाचा कणा मिळाला आहे. पँथर चळवळीने दलित साहित्य धगधगते ठेवले आहे आणि दलित साहित्याने पँथरचा विद्रोह अक्षरांतून चिरंजीव केला आहे. प्रत्येक पँथरने दलित साहित्य वाचले पाहिजे, समजावून घेतले पाहिजे.

दलित साहित्यातला विचार पँथरने अभ्यासला पाहिजे. कार्यकर्त्यांनी दलित साहित्य वाचून चर्चा केली पाहिजे.

१

दलित साहित्य : प्रेरणा आणि प्रवृत्ती

कलेसाठी जन्मलेले साहित्य ' ललित साहित्य ' तर अनुभूतीतून जीवनासाठी जन्मलेले ' दलित साहित्य. ' दलित साहित्याची मर्यादा ही त्याच्या आयुष्यानुभवात आहे. दलित साहित्याची मुळे त्याच्या जगलेल्या अनुभवात आहेत. वेदना हा प्राणवायू म्हणता येईल. दलित साहित्यातील वेदना ही मुळात जुलमातून जन्मलेली आहे. वर्ण आणि वर्गव्यवस्थेच्या आसूडाने जर्जर झालेल्यांचं आरबाळणे शब्दमुखर

झाले आहे. आंबेडकर आणि मार्क्स हे वेदनेचे जवळचे विचार आहेत; किंबहुना वेदनामुक्त करणारा तो क्रांतिकारक मार्ग आहे. वेदनेविरुद्ध वादळी झुंज घेण्यास प्रवृत्त करणाऱ्या शक्ती या आंबेडकर व मार्क्स या विचारात असू शकतील; पण दलित साहित्याचा मूलस्रोत ही वेदनाच. वेदनेविरुद्धचा असंतोष हा विद्रोह होय. वेदनेचं मूळ ही समाजव्यवस्था आणि विद्रोहाचे मूळ हा विचार म्हणता येईल.

दलितत्वातच दलित साहित्याचा जन्म झाला आहे. दलितत्व ही एक जगण्याची अवस्था आहे. ती वरिष्ठ वर्गांनी कनिष्ठ वर्गांवर पिढ्यान्‌पिढ्या लादलेली गुलामी आहे. ' दलित ' हा शब्द दलित समाजाच्या सांस्कृतिक अंगांचे प्रतिनिधित्व करणारा आहे. दलित शब्दाने दलितांचा काळाकुट्ट भूतकाळ जसा डोळ्यांपुढे उभा राहतो, तसा संघर्षमान वर्तमान आणि अनिश्चित दूर असलेले भविष्य स्पष्ट होते. दलित हा शब्द गुलामीचा द्योतक नसून, गुलामीविरुद्ध प्रचंड ताकदीने एकवटलेल्या समाजाचा तो प्रतीक आहे. दलितपणातून मुक्त होण्यासाठी हा संघर्ष आहे. दलितांनी आपल्या दलितपणाविरुद्ध व दलितपण लादणाऱ्यांविरुद्ध चळवळ उभी केली आहे. जोवर शहराबाहेर वाढणाऱ्या बकाल झोपडपट्ट्या आणि गावकुसाबाहेरील मानवरचित विषमता संपुष्टात येणार नाही, तोवर हा लढा आमरण आहे आणि या लढ्यातून धगधगते साहित्य जन्मणार, हेही तितकेच अटळ आहे.

जो समाज संघर्षातून जगतो आहे, त्याचे साहित्य व चळवळ निश्चितच वेगळी असणार. ही माणसामाणसांची उच्च–नीच विभागणी वैदिक काळापासून ते आजपर्यंत, खेड्यापाड्यांपासून ते शहरांपर्यंत, शास्त्रापासून ते कथा–कादंबऱ्यांपर्यंत; हॉटेल–खानावळीपासून ते मसणवटीपर्यंत कावेबाजपणे रचून ठेवली आहे. जोवर ही विषम समाजरचना समूळ नष्ट होत नाही, तोवर हा संघर्ष आणि साहित्य अटळच आहेत. दलितत्वाच्या त्याग करून दलित साहित्यनिर्मिती अशक्य. फक्त दलितांनीच दलितत्वाचा त्याग केल्याने हा लढा संपणारा नाही, तर ज्यांनी दलितांवर ही गुलामी लादली आहे, त्यांनी ती संपवली पाहिजे.

दलित साहित्य जेव्हा प्रस्थापित साहित्य नाकारीत असते, तेव्हा त्याला सम्यक् जाणीव अभिप्रेत असते. विषम समाज नाकारत असताना वर्गवर्णविहीन समाजव्यवस्था हवी असते. फक्त नकाराचे साहित्य असू शकत नाही, हे जरी खरे असले तरी ' नकार ' पूर्णार्थाने अनेकांगी असतो. यात एका नव्या व्यवस्थेचा स्वीकार असतो. दलित साहित्यातील नकार हा विविधांगी आहे. दलित साहित्यातील नकार हा अष्टपैलू आहे. जोवर त्यांच्यावर नकोशी व्यवस्था लादली आहे, तोवर हा नकार इतिहाससिद्ध आहे आणि या नकारामुळेच दलित साहित्याचे वेगळेपण स्पष्ट होते.

दलित साहित्य हिंदू समाजसंस्कृती नाकारीत असताना हिंदू पुराण–प्रतिकांचा वापर करीत असते. दलित लेखक आत्मा, पुनर्जन्म, देव हे शब्द वापरतो. अश्वत्थामा, द्रौपदी, कर्ण, एकलव्य, शंबूक ही प्रतिके सर्रास येतात. मग दलित लेखकाने ही प्रतिमा–प्रतिके का वापरावीत ? असा एक प्रश्न आहे. दलित लेखकांनी नव्या प्रतिमा, प्रतिके, पुराणकथा निर्माण कराव्यात, असा एक सूर आहे; तो स्वागतार्ह आहे; पण दलित लेखकाला जर हिंदू, इस्लाम, ख्रिश्चन, पारशी या धर्मांतील काही कथा, प्रतिमा, प्रतिके अर्थपूर्ण वाटली तर ती त्याने का वापरू नयेत ? पुराण–प्रतिकांचा स्वीकार याचा अर्थ पुराणांचा स्वीकार असा होऊ शकत नाही. या उलट असा एक सूर आहे की, दलित लेखकांनी केवळ दलित साहित्यच लिहू नये. त्याने एक साहित्यिक म्हणून मराठी साहित्यात मोलाची भर घालावी. दलित साहित्यिकांनी केवळ आपल्या जातीचे दुःख उगाळत न बसता ' अवघे विश्वचि माझे घर ' या न्यायाने सर्वच सामाजिक दुःखाला सामोरे जावे म्हणजे त्यांचे साहित्य अक्षर ठरेल.

आजपर्यंतचे मराठी साहित्य गावकुसाबाहेरील विराट दुःखाला पाठमोरे होते. मराठी लेखकांनी दलितांच्या वेदना–विद्रोहाला अपार कणवेतून चितारले; पण खरा दलित माणूस मराठी साहित्यातून व्यक्त झाला नाही. केशवपन, दारूबंदी, सतीची चाल, हुंडाबंदी, बालविवाह, जरठकुमारीविवाह, पुनर्विवाह हाच मराठी साहित्याचा जीवनवाद होता. या पलीकडे मराठी साहित्याचा जीवनवाद विस्तारायाला तयार नव्हता. खऱ्या अर्थाने ' जीवनवाद ' दलित साहित्याने मराठी वाचकाला उलगडून दाखविला. साने गुरुजी, माधव ज्यूलियन यांची आई व दया पवार, लक्ष्मण माने यांची आई यांत किती फरक आहे ? दलित लेखकांनी आपल्या दुःखाकडे पाठ फिरवून कुठल्या दुःखावर कविता लिहावी ? दलित लेखक ज्या समाजात जगतो आहे आणि रोजच अत्याचाराच्या नाकेबंदीत सूर्यफुलासारखा वाढतो आहे, त्याने कुणासाठी ललित लिहावे ? पेटल्या झोपडीत किंकाळी फोडणाऱ्याला सुरात गा म्हणण्यातला हा प्रकार आहे. निखारे पचवून जगणारे अंगारेच ओकणार. हे वास्तव विस्तवासारखे असते. हे वास्तव विसरता येत नाही. हा झोंबरा सूर न पेलणाऱ्या, पटणाऱ्या वाचक–लेखकांनी दलित लेखकाला सल्ला देऊ नये. ' उपरा, ' ' बलुतं 'चा वाचक किती दांडगा आहे. उद्या मराठी साहित्यावर दलित साहित्य प्रभुत्व गाजवणार नाही कशावरून ?

दलित साहित्य अनादी कालापर्यंत लिहिले जावे हे चुकीचे आहे. शंभर वर्षानंतर जातिव्यवस्था संपुष्टात आली तर दलित साहित्य संपेल. त्याची दलित लेखकाला तमा नाही. जातिव्यवस्था संपवणे हेच दलित साहित्याचे प्रमुख उद्दिष्ट आहे आणि तेच नष्ट झाले तर दलित साहित्य लिहिणे जरूर थांबेल; पण जे दलित साहित्य लिहिले गेले आहे, ते थोडेच नष्ट होणार आहे ? तो एक इतिहास होईल.

संतसाहित्य आज लिहिले जात नाही; पण अभ्यासले मात्र जाते. किती काळ कुठले साहित्य लिहिले जाते यावर त्याचे अक्षरत्व अवलंबून नसते. लांबीरुंदीवरून साहित्याचे चिरंतनत्व ठरवले जात नाही. ते किती काळ वाचकाच्या मनावर अधिराज्य गाजवते, यावर त्याचे अक्षरत्व असते. ज्ञानेश्वरी अक्षर होण्यासाठी आजही ज्ञानेश्वराना एकाही ओवीची भर घालावी लागत नाही. ती एकेकाळी लिहिली. आज देखील वाचली जाते. हे ज्ञानेश्वरीचे अक्षरत्व असू शकेल. दलित साहित्य लिहिणे थांबेल; पण लिहिलेले नष्ट होणार नाही. दलित साहित्य म्हणजे एका संस्कृतीचा उदय आहे. तो न मिटणारा इतिहास आहे. ही प्रस्थापित व्यवस्था नेस्तनाबूत करण्यासाठी, परिस्थितीच्या अनिवार्यातून जन्मास आलेली, ती एक या परिस्थितीची अविभाज्य घटना आहे.

ज्ञानेश्वरी तरी अजून दोनएक शतकांनंतर वाचली जाईलच का ? परिस्थितीच्या रेटयात ज्ञानेश्वरीचे अक्षरत्व संपणार नाही का ? ज्ञानेश्वरी, गीता वाचली तरी का जाते ? केवळ धार्मिक समाधान मिळावे यासाठीच ना ? मग 'कोकशास्त्र' अक्षरवाङमय का ठरू नये ? अक्षरवाङमय म्हणजे तरी काय ? जे शतकानुशतके वाचले जाते ते ! साहित्याचे अक्षरत्व ते किती काळ टिकते यावर अवलंबून नसावे, तर किती काळ परिवर्तन करू शकते हे महत्त्वाचे आहे. माणूस किती वर्षे जगतो यावर त्याचे चिरंजीवित्व अवलंबून नसते, तर तो कसा जगला हे महत्त्वाचे आहे. दलित साहित्य किती काळ लिहिले जाईल, किती काळ वाचले जाईल, यापेक्षा दलित साहित्य किती काळ क्रांतीची प्रेरणा देईल, विषमतेविरुद्ध चीड निर्माण करील हे महत्त्वाचे आहे. दलित साहित्याचे 'अक्षरत्व' हे त्याच्या जीवनवादात आहे. ललित साहित्याचे 'अक्षरत्व' धार्मिक, कौटुंबिक, लैंगिक भावभावनेत आहे. माणसाच्या भावभावनेचे रिझवणूक करणारे साहित्य 'अक्षर' ठरू शकते; मग माणसाला स्वमुक्तीसाठी संघर्षप्रवृत्त करणारे साहित्य 'अक्षर' का होऊ शकत नाही ? दिंडीत टाळ कुटणाऱ्यांना किती अंभगांचा अर्थ कळत असतो ? ते अंधश्रद्धेने पछाडलेले, घरदार विसरून निघालेले असतात, परमात्म्याच्या अमरत्वाकडे. हे अमरत्व वारकऱ्यांना लाभत नसते. भगतसिंगांसारखे क्रांतिकारकच अमर होऊ शकतात. हुतात्मा स्मारके ही राष्ट्रीय भावना चेतवीत असतात आणि थडगे, समाधी, मंदिरे ही धर्म, पंथ बळकट करीत असतात.

दलित साहित्यात 'तोचतोपणा' आहे असा एक आरोप आहे. मराठी साहित्यात प्रेमकविता, कथा–कादंबऱ्या किती विपुल आहेत आणि आजही त्या लिहिल्या जातात; पण इथे 'तोचतोपणा' का जाणवू नये ? रामायणापासून ते ग. दि. माडगूळकरांच्या गीतरामायणापर्यंत तोचतोपणा का जाणवत नाही ? आक्षेप तोचतोपणाला का असावा ? कुठल्याही साहित्यात मानवी भावनांचे समान पदर

असतात. अनेकांनी आईवर कविता लिहिलेली असते; पण त्यांची अभिव्यक्ती ही वेगवेगळी असते.

दलित साहित्य हे अश्लील साहित्य आहे, असा एक साळसूद आरोप आहे. दलित साहित्य आमच्या बायकामुलांनी कसे वाचावे ? असा एक प्रश्न आहे. ललित साहित्यात चंद्र-चांदणे प्रतीक म्हणून येतात; पण दलित साहित्यात झोपडपट्टीतील वास्तव, बोलीभाषा व्यक्त होते. ब्राह्मण आई आपल्या मुलाला ' काटर्चा, मूर्खा, गाढवा ' अशा शिव्या देते; पण दलित वस्तीत हीच आई आपल्या मुलाला घाणेरड्या शिव्या देत असते. मुळातच त्याना हिडीस जीवन जगायला भाग पाडले, ते इथल्या व्यवस्थेनेच. दलितांची नावे शुभ नसावीत, दलितांनी गावाबाहेर राहावे, मातोची भांडी वापरावीत, मेलेल्या माणसाचे कपडे वापरावेत, गाढव, कुत्रे हीच शूद्रांची संपत्ती अशी विचारधारा घाणेरडी असते, अश्लील असते.

दलित साहित्यातील अश्लीलता ही कामुक नसते. ते वास्तव असते. तो विद्रोह असतो. दलित साहित्यातील अश्लील शब्द कामक्रीडा करणारे नसतात, ते सरळसोट प्रस्थापितांवर आग ओकणारे असतात. कुठलेच शब्द अश्लील नसतात. कुठल्याच शब्दांना शरीरे नसतात.

दलित साहित्यातदेखील मानवी जीवनाचे अनेक पदर आहेत. दलित जीवनात प्रेम आहे, प्रेयसी आहे, संघर्ष, अंतर्द्वंद्व आहे. सर्वांत महत्त्वाचे म्हणजे दलित साहित्यात एक विचार आहे. विद्रोहातील अनावर स्फोटकतेची सतत असणारी लय ही किती विलोभनीय असते, हे दलित कवितेत दिसून येईल. वेदना, विद्रोह हा कलेचा आविष्कार होऊ शकत नाही का ?

दलित साहित्य वास्तव आणि संस्कृती यांचे संवर्धक आहे. दलित साहित्याला मुक्त माणूस हवा आहे. दलित साहित्य गुलामी नाकारते. दलित साहित्य कोणालाच मानत नाही. देव, धर्म, पुनर्जन्म, आत्मा या साहित्याला अमान्य आहे. स्त्रीसाठी जगात अनेक लढाया झाल्या, महाकाव्ये लिहिली. भाकरीसाठी क्रांत्या झाल्या; पण आत्मसन्मानाचा हा लढा आहे. दलित साहित्य म्हणजे आपल्या अस्मितेचा शोध-प्रवास आहे. दलित साहित्य हे युद्धाचे साहित्य आहे.

' शब्दांनीच पेटतात घरेदारे
आणि देशसुद्धा !'

२

दलित साहित्य : एक भूमिका

' दलित साहित्य अशी वेगळी चूल का ? ' ' साहित्य ' दलित ' असू शकते

का ? ' असे प्रश्न दलित साहित्याच्या संदर्भात उपस्थित होताना जसे दिसतात, तसे दलित लेखकाने मराठी लेखक म्हणूनच वाचकाकडून हक्काने दाद घेतली पाहिजे. दलित साहित्य हे मराठी साहित्याचाच एक प्रवाह अशीही चर्चा आज ऐकू येते. कुठल्याही साहित्यात ' प्रयोग ' आणि ' प्रवाह ' नव्याने होत असतात. साहित्यात निरनिराळे प्रयोग होणे हे त्या साहित्याच्या जिवंतपणाचे लक्षण होय आणि साहित्यात निरनिराळे प्रवाह निर्माण होणे, ही त्या साहित्याची समृद्धी होय.

संतसाहित्य, लोकसाहित्य, जनसाहित्य, ग्रामीण साहित्य अशा वेगवेगळ्या जाणिवांचे प्रवाह आपल्या अंगभूत गुणवैशिष्ट्यांनी आपले निराळेपण स्पष्ट करीत असतात. ज्ञानेश्वर, तुकाराम, केशवसुत, मर्ढेकर ही मराठी साहित्यातील वाटावळणे आहेत. मराठी साहित्याच्या संदर्भात दलित साहित्याची भूमिका, दलित साहित्याचे निराळेपण आणि बांधिलकी स्पष्ट होणे महत्त्वाचे आहे.

मराठी प्रमाण भाषा ही दलित साहित्याला उपरी व अपुरी वाटते. गावकुसातील माणूस व त्याचे समग्र जीवनविश्व व्यक्त करण्यासाठी रूढ मराठी शब्द तोकडे वाटतात; बटबटीत व परके वाटतात. गावकुसातील वास्तवाचे संदर्भ मराठीकडे नाहीत. चंद्रबिंदी म्हणजे काय, डोवडी म्हणजे काय, सादळलेली झाडे म्हणजे काय, रांडकी पुनव कशी आणि कुठे असते, खैरवांडे, पांजरापोळ, डग्गा याचा अर्थ काय, धेंडधाय, पोटले कशाला म्हणावे ? पाणचट गवशी कुठे असते ? छपन्न टिकली वहुचकपणा गवशी नक्की कसा, मगरमच्च पलित्याचा अर्थ काय, धम घेऊन म्हणजे काय करून, रायरंदी हाडूक कसे असते ? खोडाबोडा हात म्हणजे कसा होता, बिदाचिंदा हा कुठला शब्द, पिंढ म्हणजे शरीराचा कुठला भाग, डिंगडांग घनिंगचा शब्दार्थ काय, गुपची, शिगा, डेडाळे, डल्ली, सल्ली, बोटी, गुडसे, डल्लीबोळ ही कुठली भाषा, अनबन कसे बनवतात ? हे संदर्भ कळत नाहीत. ही भाषा कोण्या एका धर्माची, पंथाची नाही. सगळी नैतिक, आध्यात्मिक बंधने झुगारून तथाकथित लोकांच्या मर्यादित जगापलीकडे जगत असलेल्या एका असंतोषित समूहाची ती भाषा आहे.

गावकुसातील भाषेचा अर्थ मराठीला उमगत नाही. दलित साहित्याला आपली बोलीभाषाच जवळची वाटते. ज्या बोलीभाषेतून दैनंदिन जीवनव्यवहार, भावना व्यक्त होतात, ती भाषा सोडून एकदम नवीच, निराळी व नकली अशी ' प्रमाण मराठी भाषा ' अभिव्यक्तीला अर्थवान कशी वाटेल ? मराठी भाषा ही दलितांची भाषा नाही. ती अध्यात्माची, संस्कृतीची, ब्राह्मणांची भाषा आहे. आत्मा, परमात्मा, स्वर्ग, नरक, पाप, पुण्य, ईश्वर, पोथी, पुराण, अभंगांची भाषा आहे. दलित साहित्य हे सर्वच नाकारते. जी भाषा अध्यात्म–परमात्म्याची

अभिव्यक्ती व वरिष्ठ वर्णाची मक्तेदारी असते, ती भिन्न अशा दलित जीवन-दर्शनाची न्याय्य व अर्थपूर्ण अभिव्यक्ती होऊच शकत नाही.

शूद्रांना ज्ञानाचा अधिकार नव्हताच. ज्यांना होता ते ब्राह्मण आणि ब्राह्मण्य-ग्रस्त साहित्य हे शूद्रांचे–अतिशूद्रांचे साहित्य होऊ शकत नाही. मराठी साहित्य मुळातच वरिष्ठ वर्गवर्णाच्या हितसंबंधाचे साहित्य आहे. आता दलितांना शिक्षणाचा अधिकार प्राप्त झाल्याने ते स्वतःच्या भाषेत व्यक्त करीत आहेत. केवळ अनेक वर्षांपासून अनेक लेखकांनी अनेक ग्रंथ लिहिले म्हणून तो मूळ आणि मुख्य प्रवाह होऊ शकत नाही. ' पूर्वी जेव्हा साहित्याचा आणि म्हणून संस्कृतीचा प्रसार एका विशिष्ट वर्गाकडे होता, तेव्हा त्या त्या संस्कृतीचे चित्रण साहित्यात उमटणे अगदी नैसर्गिक होते. त्यात काही चूक नव्हती, ' हे विधान आत्मघातकी आहे. एका विशिष्ट वर्गाकडे साहित्य आणि संस्कृतीचा प्रसार आणि प्रचार असणे अन्याय-कारक आहे; कारण तो वर्ग आपले हितसंबंध जपतो व इतरांच्या हितसंबंधांना नाकारत असतो. ह्या विशिष्ट वर्गाने आपलेच हितसंबंध जपणे, दुसऱ्या विराट वर्गाला नाकारणे आणि आपले हितसंबंध, साहित्य, संस्कृती तमाम समाजावर लादणे हा असंतोषजनक प्रकार आहे. माटे मास्तरांसारख्यांनी दलितांना सहानुभूती, दया, कणव या भावनेने उभे केले. दया किंवा भीक म्हणून दलितांना त्यांचे हक्क नको आहेत. मराठी साहित्य म्हणजे उद्ध्वस्त होत असलेल्या एका माणूसद्रोही संस्कृतीचे टिकून राहिलेले अवशेष आहेत. सरंजाम प्रवृत्तीचा हा मरणप्राय आविष्कार आहे.

बदलता काळ, कायदा, विज्ञान, शिक्षण यांमुळे शब्दहीन समाज शब्दप्रभू होत आहे. त्याला गुलामीची आणि हक्कांची जाणीव होत आहे. काळाच्या रेटचात परिस्थिती आणि रचना बदलत आहे आणि त्याचे पडसाद साहित्यात उमटत आहेत. हक्काच्या उग्र जाणिवेतून दलित साहित्य निर्माण झाले आहे. ज्याचे हक्क आणि जीवन मराठी साहित्याला अज्ञात होते, तो विराट समाज लिहू लागला आहे. त्यामुळे मराठी साहित्य हे विशिष्ट वर्गाचे असलेले साहित्य मूळ प्रवाह (Main Stream) असू शकत नाही. ते वर्गबंदिस्त असे Dead Water आहे. ' पारंपारिक भाषेला अध्यात्माने गुलाम बनवून एकतर तिचा सर्वांगीण विकास थोपवून ठेवला आणि वरती शिरजोरी करून ही त्रुटीत, एकांगी आणि अर्धवट भाषाच सगळ्या प्रकारच्या अनुभवांचा आविष्कार करण्यास समर्थ आहे, असा दावाही केला. आपल्या मोल-करणीला जगातील यच्चयावत कामे सहज करता येतात, असा दावा एखाद्या अहंमन्य धनिकाने करावा, तसाच प्रकार भाषेच्या बाबतीत संस्कृतीने केला व करीत आहे. '

' समाजामध्ये होणाऱ्या बदलाचा प्रभाव साहित्यनिर्मितीवर आणि त्याच्या

स्वरूपावर पडतो.' हे कितपत खरे आहे ? डॉ. आंबेडकरानी उभ्या केलेल्या चळवळीची नोंद मराठीने किती घेतली ? मराठी साहित्य वाचून दलित समाज व दलित माणसाचे खरे दर्शन होते का ? ज्या साहित्यात त्या समाजाचे खरे वास्तव प्रतिबिंबित असते, तेच साहित्य त्या समाजाची सांस्कृतिक ठेव असते. काळाराम मंदिरप्रवेश, महाडच्या चवदार तळ्याचा सत्याग्रह, मनुस्मृती दहन या घटना मराठीला वर्ज्य आहेत. चैत्यभूमी, दीक्षाभूमी, दलित चळवळी यांचे मराठीत काय योगदान आहे ? नामांतर आंदोलनावर मराठीत किती कविता आहेत ? दलितांवर अन्याय-अत्याचार झालेल्या वेलछी, ढोकी, ऐरणगाव, सुगाव, सिरसगाव या छळावर मराठीत किती कथा आहेत ? युगपुरुष डॉ. आंबेडकराना किती अर्पण-पत्रिका आहेत ? मराठी साहित्यात दलित जीवनाच्या संघर्षाचे, बदलाचे प्रतिबिंब नाही. मराठीने आधुनिकता स्वीकारली, पाश्चात्त्व तत्त्वज्ञान अभ्यासले; पण आपल्या शेजारच्याच दलित माणसांची व्यथा-वेदना समजून घेतली नाही.

' तुमची संस्कृती आम्ही नाकारतो, तुमचे सौंदर्यशास्त्र आम्ही नाकारतो, ' असे म्हणताना आमची संस्कृती तुमच्यावर लादू अशी गर्भित धमकी त्यात असते. या देशातल्या दलितांना सर्व समाजावर लादण्यासारखी खरोखरच संस्कृती आहे काय ? हा प्रश्न अत्यंत महत्त्वाचा वाटतो. दलितांनी प्रस्थापित संस्कृती नाकारीत असताना इतरांवर दलित संस्कृती लादण्याचा निष्कर्षच चुकीचा आहे. इथे लादण्याच्या वृत्तीलाच नकार Total Rejection आहे. आपणावर कोणी लादणे किंवा आपण कोणावर लादणे असे संस्कृती-संघर्षाचे रूप नाही. ' आम्हीही माणसं आहोत ' हे मान्य व्हावे म्हणून आमचा प्रस्थापिताला नकार आहे. ' दलितांना खरोखरच संस्कृती आहे काय ?' हा प्रश्न मात्र अंतर्मुख करणारा आहे. दलितांवर, शस्त्रवंचित शिक्षणवंचित, सत्तावंचित, संपत्तीवंचित असे बहिष्कृत जीवन लादले होते. तो इतिहास आहे. दलितांनी बौद्ध धर्माचा स्वीकार केला, म्हणून ' बौद्ध संस्कृती ' ही त्यांची संस्कृती आहे, हा युक्तिवादही मला मान्य नाही. धर्मांतराने दलितांना आत्मविश्वास, स्वाभिमान, संघटन आणि संघर्षाची अभूतपूर्व जाणीव झाली. हेच दलित संस्कृतीचे आरंभमूळ होय. धर्मांतराने ' अस्पृश्यता आणि दारिद्र्य ' नष्ट झाले नाही. जातिवादाने राक्षसी रूप धारण केले आहे. जातिव्यवस्था आणि वर्ग-व्यवस्था नष्ट होण्यापर्यंतच्या क्रांतिपर्वात दलित संस्कृतीची गर्भबीजे लपली आहेत.

मराठी साहित्य आणि संस्कृती यांपेक्षा दलित साहित्य हे भिन्न तर आहेच; पण परस्परविरोधीही आहे; त्यामुळे कोणी कोणाचा उपप्रवाह संभवत नाही. दोन समाजांतील सामाजिक अंतर त्या समाजाच्या साहित्यात एक फरक करीत असते. केवळ लिपी एक म्हणून प्रवाह एक असा समज निव्वळ खोटारडा ठरतो. त्र्यंबक सपकाळे म्हणतात :

' अरे, एक अक्षरही
लिहिले नाही तुम्ही
ज्या संघर्षात होतो आम्ही
जो संग्राम दिला
जीवनकलह तुडविताना '

किंवा दया पवार म्हणतात :

' हे महाकवी,
तुला महाकवी तर कसे म्हणावे ?
अन्याय-अत्याचार वेशीवर टांगणारा
एक जरी श्लोक तू रचला असतास
तर तुझे नाव काळजावर कोरून ठेवले असते. '

३

दलित साहित्य आणि दलित चळवळ

' निग्रो साहित्य ' म्हटले की निग्रो समाज, त्याच्या व्यथा-वेदना जशा लक्षात येतात, तशाच दलित साहित्य म्हटलं की दलित समाज, त्याच्या व्यथा-वेदना लक्षात येतात आणि हे साहित्य ज्या भाषेत आकाराविष्कारात लिहिले आहे, ते आपोआप दुय्यम ठरते. दलित साहित्य हे मराठीत लिहिले म्हणून ते संतसाहित्यासारखे एक मराठीचे अंग आहे, मराठी साहित्यातील एक प्रवाह आहे, असे म्हणणे सयुक्तिक होणार नाही. दलित साहित्याची प्रेरणा आणि प्रवृत्ती ही स्वतंत्र असल्याने हे साहित्य कुठल्याच प्रवाहाचा भाग होऊ शकत नाही. दलित साहित्याची भाषा मराठीला अश्लील व हलकट वाटते. दलित साहित्यामुळे मराठी साहित्य समृद्ध होत आहे, असे कौतुकोद्‌गार काढत असताना दलित साहित्याला मराठीत पचविण्याचा पद्धतशीर प्रयत्न होत असतो. बुद्ध-चार्वाकालाही या संस्कृतीने असेच पचविले आहे. ही संस्कृती कॅन्सरसारखी आहे. दलित साहित्य हे दलित समाजाची स्वतंत्र अशी सांस्कृतिक ठेव आहे, दलित चळवळीचे ऐतिहासिक दस्तऐवज आहे.

दलित साहित्य म्हणजे गुलामाला झालेली स्वाभिमानाची जाणीव. आपल्यावर होणारा अत्याचार हा ईश्वराने केलेला नसतो. ईश्वराच्या नावाने इथली प्रस्थापित व्यवस्था ' नाही रे 'ची घोर पिळवणूक करीत असते. दलितांचे धनिक शोषण करीत असताना पीडित बंड करण्याची शक्यता असते; म्हणून त्याला शोषणाचे मूळ ईश्वराकडे बोट करून दाखविले जाते. ईश्वर हा अस्तित्वातच नसतो; त्यामुळे

कोणाविरुद्ध बंड करण्याचा प्रश्नच येत नाही. गतजन्माचे पाप म्हणून अन्याय सहन करणे हाच धर्म बनतो; म्हणून गुलामीची जाणीव होण्यात पहिली कोणती अडचण असेल तर तो 'धर्म' होय. धर्म हा शोषणव्यवस्थेचा समर्थक दलाल आहे. माणसाच्या मनातील धर्म आणि ईश्वर उखडून टाकल्याशिवाय तो भयमुक्त व अगतानुगतिक होणार नाही. माणसाला तो सर्वप्रथम माणूस आहे, त्यालाही माणूस म्हणून जगण्याचा महत्त्वाचा हक्क आहे, हा हक्क देव, धर्म, शासन किंवा कुठलाही समाज नाकारू शकत नाही, हा जाहीरनामा दलित साहित्य जाहीर करीत असते.

दलित साहित्याच्या अभ्यासकांनी प्रथमतः साहित्यिक पूर्वग्रह टाकून दिले पाहिजेत. ज्याला इथला महारवाडा, मांगवाडा माहीत नाही, त्याला तिथले जीवघेणे वास्तव कसे कळणार ? स्वातंत्र्याच्या ४५ वर्षांनंतरही भटका समाज पोट पाठीशी बांधून रानोमाळ फिरतो आहे. त्याच्या वेदना या 'सेल्फकंटेन्ड' ब्लॉकमधील लोकांना कशा कळणार ? अन्याय–अत्याचाराची शिकार होणारी स्त्री ही कुठल्या लोकसत्ताक स्वातंत्र्याची नागरिक असते ? आज स्नान करतानाही या माऊलीला आडोसा नाही की लाज झाकण्यासाठी अंगभर कपडा नाही. यांच्या जीवनातील हुंकार तपासताना या पार्श्वभूमीची जाण असणे महत्त्वाचे आहे. पाण्यासाठी फोडलेला टाहो, पेटल्या झोपडीत होरपळणारी किंकाळी, चार बदमाषांच्या तावडीत गुदमरणाऱ्या अबलेचा आक्रोश हे कुठल्याच साहित्याच्या निकषातून जोखता येणार नाहीत. दलित साहित्य समजून घेण्यासाठी दलितांनी जगलेली जीवघेणी गुलामी, दलितांनी जीवनमरणाच्या लढाईत दिलेला असीम संघर्ष, दलितांच्या स्वाभिमानाविरुद्ध खुनशी सवर्णांनी केलेले क्रूर हल्ले, इथली विषम समाजव्यवस्था माहीत असणे आवश्यक आहे. जो माणूस दलिताला शूद्र म्हणून त्याचा द्वेष करतो, त्याला दलित साहित्य तरी आपले कसे वाटेल ?

एकीकडे दलित साहित्याचे कौतुक करायचे, दलित साहित्यिकांचा सन्मान करायचा, डॉ. आंबेडकरांचे नाव घ्यायचे आणि पुरोगामी म्हणून मिरवायचे. दुसरीकडे इथल्या दलित माणसाला चार हात दूर ठेवायचे, दलित वस्तीचा तिरस्कार करायचा, घरात वर्णाश्रम व्यवस्था मानायची ही दुटप्पीपणाची वागणूक असते. सुशिक्षित, चांगल्या कपड्यांतील प्रतिष्ठित दलिताला आपल्या घरी चहाला बोलविले किंवा त्याच्या घरी जाऊन चहा घेतला म्हणजे आपण परिवर्तनवादी ठरतो असे नाही. यासाठी पूर्णपणे खालचा वर्ग हा वर गेला पाहिजे आणि वरचा वर्ग पूर्णतः खाली खेचला पाहिजे. धनिकांना धनिक ठेवून दलितांना निराधार योजनेचे साठ रुपये दिल्याने गरिबी नष्ट होत नाही. या उलट गरीब माणसाला दरमहा साठ रुपये देऊन त्याच्या मनातील अराजक, असंतोष इथली प्रस्थापित व्यवस्था विकत घेत असते. तुटपुंज्या आर्थिक मदतीमुळे दलितांची प्रस्थापित व्यवस्थेविरुद्धची चीड थंड

होते आणि प्रस्थापित समाज व शासन स्थिर होण्यास मदत होते. संसदेत कुठला पक्ष किंवा कुठल्या जातीचा माणूस बसला आहे हे महत्त्वाचे नसून तो कुठल्या विचाराचा आहे, हे महत्त्वाचे आहे.

भारताला राजकीय स्वातंत्र्य मिळाले; पण अद्यापही सामाजिक समता नाही. संपूर्ण भारत वर्गवर्णाच्या गुलामीत वाढतो आहे. सामाजिक स्वातंत्र्याच्या प्रस्थापनेसाठी, सांस्कृतिक क्रांतीसाठी दलित समाज झगडतो आहे. दलितांना स्वातंत्र्य प्राप्त होईपर्यंत चाललेल्या चळवळीचे नाव 'दलित चळवळ' व खऱ्या अर्थाने दलित माणसाला आत्मसन्मान मिळून इथल्या जातिव्यवस्थेचं पूर्णतः उच्चाटन होणार नाही, तोवर दलित साहित्य आणि चळवळ अमर आहेत. वाढते औद्योगिकीकरण, शिक्षणाचा प्रसार, विज्ञान व कायद्यामुळे जातींची बंधने काही प्रमाणात शिथील होत आहेत. पेशवाईतील जातीयता आज नसली तरीदेखील सवर्ण वस्तीत दलितांना आजही घरे मिळत नाहीत. नामांतर, राखीव जागा, मंडल आयोग यांसारखे नवे प्रश्न मूळ धरत आहेत. पूर्वी दलितांना गावातील सवर्णांचा रोष पत्करावा लागायचा, पण आज दलितविरोधी षड्यंत्र देशपातळीवर फैलावत आहे आणि दलित चळवळ आपल्या शक्तिसामर्थ्यानिशी उठाव करीत आहे.

हिंदू धर्मव्यवस्थेला प्रचंड धक्का कोणी दिला असेल तर तो ब्रिटिशांनी. पाश्चात्त्य तत्त्वज्ञानानेच क्रांतीचे वारे भारतात वाहू लागले. भारतीय स्वातंत्र्यांदोलन हे पाश्चात्त्य विद्याविभूषित मंडळींनीच छेडले होते. भारतीय समाजरचनाच अशी आहे की जेथे उच्चवर्ण व वर्ग यांचे पद्धतशीर संगोपन केलेले आहे.

स्वातंत्र्योत्तर काळात शिक्षण व चळवळीमुळे दलित समाजाला हक्क व न्यायाची जाणीव झाली आणि यासाठीच चळवळ उभारली गेली. आपल्यावर होणारे अत्याचार हे अमानुष आहेत, हा अन्याय आहे, तो नाकारला पाहिजे. 'मीही माणूस आहे.' या अर्थाने संपूर्ण दलित समाज ढवळून निघाला. सुशिक्षित दलित तरुण या व्यवस्थेविरुद्ध बोलू–लिहू लागले. आपल्या प्रचंड धुमसणाऱ्या नाकेबंदीला त्यांनी शब्दांतून वाट करून दिली. या व्यवस्थेविरुद्ध बोलणारे चळवळीचे कार्यकर्ते ठरले तर शब्दांत विद्रोह पेरणारे साहित्यिक ठरले. या एकाच चळवळीच्या दोन बाजू आहेत. दलित साहित्य हे चळवळीतून जन्मलेले साहित्य आहे. दलित साहित्य एक सांस्कृतिक चळवळ आहे. असाच एक भारतीय इतिहासात एक काळ होता. ब्रिटिशांविरुद्ध भारतीय साहित्यिक लिहीत होते आणि भारतीय क्रांतिकारक ब्रिटिश पारतंत्र्याविरुद्ध लढत होते. या स्वराज्य चळवळीला 'देश' स्वतंत्र करायचा होता. सामाजिक स्वातंत्र्यासाठी लढणाऱ्या दलित साहित्य चळवळीला 'माणूस' मुक्त करावयाचा आहे.

निग्रोंच्या पुढे मी कोण ? माझा देश कुठला ? हा प्रश्न आहे. दलितांचा प्रश्न तसा नाही. दलित या देशाचे आदिनागरिक. या भूमीचे एकेकाळचे राज्यकर्ते. आर्यांनी त्यांचा पराभव केला व त्यांना दास केले. दलितांना स्वतःचा देश आहे. आम्हीही या देशाचे नागरिक आहोत. आम्हालाही समता, स्वातंत्र्य, बंधुता, न्याय मिळायला पाहिजे, ही विचारधारा दलितांच्यापुढे आहे. दलितांनी वेदकाळपूर्वीपासून ते आजपर्यंत या देशासाठी रक्त, घाम, अश्रू दिले आहेत. या देशाची श्रमशक्ती ही दलित जनता आहे. हा देश दलितांच्या रक्त, घाम व अश्रूंवर डवरला आहे.

दलित चळवळीपुढचा महत्त्वाचा धोका म्हणजे राजकारण. डॉ. आंबेडकराना संपूर्ण समाज हा 'शासनकर्ती' जमात बनवायचा होता; पण इथे दलित पुढारीच समाजाचा राजकीय सौदा करीत आहेत. सत्ताधारी पक्ष दलित राजकीय शक्तीला मोडीत काढण्याचा डाव खेळत आहेत. दलित समाज झोपडपट्टीतच आहे आणि राखीव पुढारी, जातीची एकगठ्ठा मते घेऊन खुर्चीभोवती फिरत आहेत. दलित चळवळ एक संस्था बनली आहे आणि नेतृत्व महंतशाही. चळवळीपेक्षा नेतृत्व महत्त्वाचे ठरत असल्याने सामाजिक प्रश्न दुय्यम व नेतृत्व सर्वप्रथम बनत आहे. चळवळ गौण ठरून जो तो स्वतःच्या नेतृत्वासाठी चळवळी निर्माण करतो आहे. नवे गट-तट यातूनच निर्माण होत आहेत. चळवळ, विचार, नेतृत्व यांपेक्षा, जोवर आपण सामाजिक प्रश्न महत्त्वाचे मानत नाही, तोवर चळवळ, नेतृत्व आणि विचारांची निकोप वाढ होणेच शक्य नाही. कुठल्याच विचारमर्यादेत चळवळ बंदिस्त न करता वाढली पाहिजे. वैचारिक संघर्ष हा हितशत्रूंनीच पेरून ठेवलेला असतो. विचार चळवळीबरोबर वाढत असतो. शेवटी वैचारिक वाद हे चळवळीचे समर्थ साधन असावे.

१४

कार्यकर्त्यांच्या संदर्भातलं आत्मगत

सहा डिसेंबर १९५६ रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे महापरिनिर्वाण झाले. याच वर्षी माझा जन्म झाला. डॉ. बाबासाहेब आंबेडकर मरणोत्तरकाळातील एक दलित अपत्य म्हणून मी माझ्या समग्र जीवनाकडे पाहतोय.

आम्हाला मिळालेले स्वातंत्र्य, स्वातंत्र्यातही आमचे कुठलेच न सुटणारे प्रश्न, निवडणुका येतात–जातात; फरक काहीच पडत नाही. कुठलेच सरकार क्रांतीचे चक्र पूर्ण ' आसासह ' फिरवत नाही. आमच्यावरचे अत्याचार वाढतात, आम्ही सर्व ताकदीनिशी लढतो, काही मिळवतो, काही हरवतो; पण आमचे आंबेडकरी स्वप्न साकार होत नाही. परत परत चळवळी बांधल्या जातात. कार्यकर्त्यांची फळी निर्माण होते. चळवळ गतिमान होते. नेतृत्वाची स्पर्धा, परत गटबाजी, चळवळीचं खच्चीकरण, कार्यकर्त्यांत नाराजी व निराशा, कार्यकर्ते, समाज, चळवळी व विचार गटागटांत विभागले जातात. हे ऋतुचक्र मी पाहतोय, अनुभवतोय. ऐक्य होतेय, फिसकटतेय, चळवळी बरखास्त होतात. पुन्हा पुनर्जीवन होते, वेगळ्या चुली मांडल्या जातात. हे कुठंवर चालायचं ?

गावपातळीवर मागास जातीजातींत असलेल्या दुफळ्या,शिवाय एकाच जातीत असलेले दोन गट आणि या सर्व मागासजातींवर असलेलं गावकऱ्यांचं निरंकुश प्रभुत्व यांमुळे मी खूप अस्वस्थ व्हायचो. गावाच्या विरोधात काही करावं म्हटलं

तर गावाच्या विरोधात जावं लागायचं. हा विरोध इतका सीमित स्वरूपाचा असता तर खूप बरे झाले असते; पण गावविरोधी लढ्याला आमच्याच समाजाचा पाठिंबा नसायचा. ' आम्हाला इथं जगायचं आहे. आपण पायरीनं वागलं पाहिजे. गावकरी आपल्याला गाव बंद करतील. गावच्या विरोधात आपण कसं टिकणार, आपण गावाचं मीठ खाल्लंय, ' अशा भावनेने तमाम समाज आम्हाला डाफरायचा. गावाची भीती आणि आपल्याच समाजाचा रोष पत्करायला नको म्हणून घरही विरोधीच वागायचं. ' आम्हाला इथं राहायचंय, आम्हाला जगू देतो की नाही. सर्वजण आमची गाढवावरून धिंड काढतील. दहा जणांच्या विरोधात जाणं चांगलं नाही. ' असा उपदेश व शिव्यांची लाखोली ऐकावी लागायची. अशा अवस्थेत आपलं लाचार वागणं आवडायचं नाही. मन बंड करून उठायचं आणि याच मनात विस्तवाचं वादळ शिवशिवू लागायचं. या वादळाचं नाव असायचं डॉ. बाबासाहेब आंबेडकर.

गाव सोडून शिक्षणाच्या निमित्ताने शहरात आलो तर इथंही वेगळाच गुंता होता. शहरी विरुद्ध ग्रामीण नेतृत्व हे जसं होतं, तसं महार विरुद्ध महारेतर अशी अंतर्गत दुहीही नांदत होती. कार्यकर्त्यांची स्पर्धा, चढाओढ, चळवळीतील गटबाजी याचं जवळून दर्शन झालं. आपण कुठं काम करावं ? हा प्रश्न खूप अस्वस्थ करणारा वाटे. संपूर्ण दलित समाजाची एक अभेद्य संघटना असावी असा विचार मी ' साधने 'च्या १८ जुलै, १९८१ च्या अंकात मांडला होता.

दलित पँथर, भारतीय दलित पँथर, मास मूव्हमेंट, दलित मुक्ती सेना, समता सैनिक दल, दलित युवक आघाडी अशा कितीतरी नवबौद्ध तरुणांच्या संघटना काम करीत होत्या. डी. एस. फोर, बामसेफ, बहुजन समाज पार्टी, रिपब्लिकन पक्षाचे गट, महाविद्यालयीन दलित तरुणांच्या संघटना, बौद्ध धम्माच्या संघटना व त्यांचे कार्यक्रम यात कुठं कसं शिरावं हा भेडसावणारा प्रश्न वाटे. बौद्ध, महार समाजाचं हे चित्र होतं, तर महारेतर समाज चळवळीपासून उदासीन होता.

दलित चळवळ म्हणजे केवळ नवबौद्धांची चळवळ नव्हे. नवबौद्धांशिवाय दलित समाज आहे, त्यांचेही प्रश्न आहेत; पण हा समाज आपापल्या जातीच्या चळवळी बांधण्यात, नवबौद्धांच्या विरोधी उभा राहण्यात व काँग्रेसघार्जिणा होण्यात धन्य मानत होता. नवबौद्ध समाज प्रत्येक प्रश्नावर लढायला तयार; पण इतर दलित समाज वेगळा पडे; म्हणून नवबौद्ध तरुणांत या समाजाविषयी मत्सराची भावना वाढायची. ' (बंदुकीच्या) गोळीला आम्ही, पोळीला ते ' अशी म्हणच रूढ होत होती तर डॉ. बाबासाहेब आंबेडकरानी आमच्यासाठी काहीच केलं नाही, सर्व सवलती महारांनाच मिळतात, अशी मत्सराची भावना महारेतर समाजात फोफावत असायची. आमचे प्रश्न केवळ सामाजिक आहेत असे नव्हे तर आर्थिकही आहेत, याची जाणीव होऊ लागली. महारेतर समाज चळवळीत आला पाहिजे, असं प्रकर्षानं वाटू लागलं.

महार, मांग, चांभार व ढोर अशा बहिष्कृत जातींना गावाबाहेर का होईना, स्थान आहे. वेगळा का होईना पाणवठा आहे, स्मशानभूमी आहे; पण जे भटकत आहेत. जगण्यासाठी चोरी करणं, भीक मागणं हाच ज्यांचा व्यवसाय आहे, अशा भटक्या-विमुक्तांचीही चळवळ, त्यांचे प्रश्न, त्यांचे मोर्चे, त्यांची शोभायात्रा आणि कार्यकर्ते जवळून पाहिले. त्यांच्यात मिसळलो. या चळवळीचं महत्त्व आणि मोठेपण कळलं. या चळवळींतही नेतृत्वस्पर्धा आणि गटबाजीनं पाय रोवले, चळवळ संपली.

रिपब्लिकन पक्षाचं ऐक्य झालं. समाजाची तशी उत्स्फूर्त इच्छा होती. सर्व संघटना लयाला गेल्या, एकसंघ रिपब्लिकन पक्षाची स्थापना झाली. ही पक्षबांधणी केवळ नवबौद्धांपुरती सीमित होती. नवबौद्धांशिवाय ज्या चळवळी आहेत, त्याही संघटित होण्यासाठी धडपडू लागल्या; पण कुणीच संघटित झालं नाही.

रिपब्लिकन पक्षाच्या ऐक्यासाठी अनेक सामाजिक प्रश्नांवर लढणाऱ्या दलित तरुणांच्या संघटना बरखास्त करण्यात आल्या. केवळ राजकीय हेतूने रिपब्लिकन पक्षाची एकजूट झाली. निवडणूक हे या ऐक्याचे एकमेव उद्दिष्ट होते; पण या निवडणुकीत एकही जागा जिंकता आली नाही. या मोबदल्यात रात्रंदिवस राबणाऱ्या कार्यकर्त्यांच्या संघटना काढून घेण्यात आल्या. जे कार्यकर्ते लोकांचे प्रश्न घेऊन कचेरी, कार्यालयात भांडत होते, ते कार्यकर्ते काँग्रेस कार्यकर्ते व काँग्रेस कार्यालयाभोवती फिरताना दिसू लागले. सामाजिक कार्यकर्ते व सामाजिक प्रश्न यांच्याकडे ऐक्याच्या प्रक्रियेत पूर्णपणे दुर्लक्ष करण्यात आले.

रिपब्लिकन ऐक्यामुळे केंद्र सरकारकडून नवबौद्धांना 'सवलती मिळाल्या, असाही प्रचार झाला. डॉ. बाबासाहेब आंबेडकराना 'भारतरत्न' ही पदवी मिळाली. चळवळीत आशेचं वातावरण निर्माण झालं. पँथरचे टी. एम. कांबळे व भटक्या विमुक्त चळवळीचे लक्ष्मण माने यांना विधान परिषदेचे सदस्यत्व मिळाले. रामदास आठवले याना शरद पवारानी समाजकल्याण मंत्रीपद दिले, प्रकाश आंबेडकराना राज्यसभेचे सदस्यत्व मिळाले, अरुण कांबळे याना जनता दलाचे सेक्रेटरीपद मिळाले तर काही दलित लेखकांना महाराष्ट्र सरकारने शासकीय मंडळावर नेमले. काही जणांनी फुले-आंबेडकर विशेषांक काढले, परिसंवाद व व्याख्याने झाली. सांस्कृतिक सभासंमेलनांचं आयोजन झालं. पण कार्यकर्ता अनिश्चितपणे या भाऊगर्दीत चिरडला जातोय.

कार्यकर्ते रस्त्यावरून मंत्रालयात गेले.

पण प्रश्न ?

प्रश्न आहेत तसेच आहेत.

लोकांच्या प्रश्नासाठी प्रामाणिकपणे लढणाऱ्या कार्यकर्त्यांची कोंडी झाली

आहे. ही कोंडी फोडण्याचा, निदानपक्षी आत्मटीका तरी करण्याचा आमचा हा संपादकीय प्रयत्न आहे. अनेक पातळ्यांवर, थरांवर काम करणाऱ्या कार्यकर्त्यांची मनोगतं या संपादनात मांडली आहेत.

ऐक्य व्हावं म्हणून सर्व समाज झपाटून जागा झाला; पण ऐक्य विघडल्यावर कुणीच काही बोललं नाही. सगळे चिडीचूप, हा प्रकारच कळत नाही. रामदास आठवले यांच्या नागपूर व सोलापूर इथल्या पँथर गटानं पँथरचं अस्तित्व कायम राखलं, नामदेव ढसाळानी बंडखोर दलित पँथरचं पुनरुज्जीवन केलं. पुनश्च हरिः ॐ. या रहाटगाडग्यात सामान्य कार्यकर्त्यांचं काय होणार ?

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या काळातल्या जुन्या कार्यकर्त्यांचा ताफा अजूनही समाजात वावरतो आहे. या जुन्या कार्यकर्त्यांची आंबेडकरी विचारांवर प्रचंड निष्ठा आहे. बाबासाहेबांचा विचार व संघटना प्रमाण मानून ते कार्य करतात. हा कार्यकर्ता साधनवंचित आहे. आयुष्यभर कार्य करून तो उभा राहू शकला नाही; कारण त्याने निःस्वार्थ भावनेने सेवा केली. तो कुठल्या पक्षाला विकला गेला नाही. तो सहकार क्षेत्र व शासकीय योजना यांपासून दूर राहिला; त्यामुळे तो दुर्बल बनला. शिवाय तो अल्पशिक्षित आहे. या जुन्या कार्यकर्त्यांची दलित समाजाने उपेक्षाच केली आहे. या जुन्या कार्यकर्त्यांनी नवं काही घडवलं नाही. केवळ निवडणुकीच्या युतीपुरतेच यांचे कार्य राहिले; पण काळाच्या ओघात नवी पिढी आली, नव्या समस्या झाल्या. या नव्या आव्हानापुढे जुने कार्यकर्ते थिटे पडले. त्यांच्या नेतृत्वाची ही मर्यादाच होती.

महात्मा फुले आणि आंबेडकरांचं नाव घेऊन इथं नवा जातीयवाद वाढत आहे. सवर्णांत दलितविरोधी भावना खूप जोमाने काम करते आहे. या नव्या परिस्थितीला जुन्या कार्यकर्त्यांना सामोरे जाणे जमले नाही. नवशिक्षित तरुणांची कोंडी झाली. ते हतबल नेतृत्वाविरुद्ध उभे राहिले. प्रत्येकाने आपल्या कुवतीप्रमाणे चळवळ सुरू केली. आपल्यापरीने ते आंबेडकरी विचार मांडू लागले.

या दोन वर्गांच्या कार्यकर्त्यांशिवाय दुसरा एक कार्यकर्त्यांचा वर्ग आहे तो म्हणजे काँग्रेसधार्जिणा वर्ग होय. सत्तेतल्या पक्षात या कार्यकर्त्यांनी प्रवेश करून माया कमवली आहे. सहकारात व शासकीय मंडळावर अशा कार्यकर्त्यांची वर्णी लागली आहे. समाज व चळवळ स्वतःच्या स्वार्थासाठी राबवणारा हा कार्यकर्ता आहे. सत्तेत असल्यामुळे आर्थिक सुबत्ता व मनुष्यबळ या कार्यकर्त्यांकडे उपलब्ध आहे. कार्यकर्ता अनेकवेळा समाजावर व चळवळीवर लादला जातो; त्यामुळे चळवळी क्षीण होतात आणि कार्यकर्त्यांत नाराजी पसरते. नेता आपली 'री' ओढणाऱ्या कार्यकर्त्यालाच उभा करतो. 'री' ओढणाऱ्या कार्यकर्त्यांची एक लॉबी

असते. आज कार्यकर्ता होण्यासाठी त्याच्या कामापेक्षा त्याला गॉडफादर असणे महत्त्वाचे असते. हा गॉडफादर आपल्या फॅनवर चळवळ सोपवतो. हा कार्यकर्ता समाजाच्या कामांपेक्षा गॉडफादरचीच कामे करतो. त्याला प्लीज करतो. त्याचे दौरे, त्याचा खर्च, त्याचा मुक्काम व खाना यांची सोय करतो.

राजकीय पुढारीही कार्यकर्त्यांना आपले ' एजंट ' म्हणून वापरतात. जो दुबळा आहे, उद्या आपला प्रतिस्पर्धी होणार नाही, अशा दुय्यम दर्जाच्या कार्यकर्त्याला हाताशी धरून त्या मोहल्ल्यात आपलं नेतृत्व टिकविण्याचा प्रयत्न करतात.

पोलीस खातेही कार्यकर्त्याला आपला ' मध्यस्थ ' म्हणून वापरते. कुठलेही प्रश्न आपल्या मर्जीतल्या कार्यकर्त्याच्या सल्ल्यानेच पोलीस खाते सोडवत असते. कार्यकर्ताही हस्ते-परहस्ते पोलिसांना मदत करीत असतो. त्यांच्या बदल्या, हप्ते, त्यांना हवी असलेली माहिती या मध्यस्थ कार्यकर्त्यांकडून विनातक्रार पार पडत असते. अशा कार्यकर्त्यांचं ' सोशल स्टेटस ' पोलिसांकडून निश्चित केलं जातं.

दैनंदिन जीवनात भेडसावणारे लोकांचे काही प्रश्न असतात. उत्पन्नाचा दाखला, जातीचा दाखला, संजय गांधी स्वावलंबन योजना व निराधार योजना, मागासवर्गीयांच्या विकासाची महामंडळे, बँक कर्ज प्रकरणे अशा प्रकरणांत कार्यकर्ता गरजू व्यक्ती व संबंधित अधिकारी यांच्यात ' दलाल ' म्हणून काम करतो. गरजू व्यक्तीकडून कार्यकर्त्याला पैसे मिळतात. कार्यकर्त्याकडून अधिकाऱ्याला कामाचे कमिशन मिळते. अधिकारीही आपल्या मर्जीतल्या कार्यकर्त्यांची प्रकरणं हातावेगळी करीत असतो. अशा प्रकारे शासकीय कार्यालयातून कार्यकर्ते निर्माण केले जातात.

दोन नंबर धंदेवाल्यांकडूनही काही कार्यकर्ते पेरले जातात; त्यामुळे चळवळीत ' माफिया गँग ' येते. लंपेन एलिमेंटचा फैलाव होतो. चळवळीत गुन्हेगार कार्यकर्त्यांची गँग वाढते. कमिटमेंटपेक्षा डिनर पार्टीला महत्त्व प्राप्त होतं. आयडिऑलॉजी ॲण्ड प्रिन्सिपल यांपेक्षा स्ट्रॅटेजीचा डाव खेळला जातो. दबावाचे राजकारण सुरू होते. सुरामाऱ्याची भाषा अवतरू लागते. रचनात्मक कामापेक्षा पोलीस चौकी व कोर्ट हेच कार्यकर्त्यांचे केंद्र बनू लागते. गुन्हेगार कार्यकर्त्यांच्या गँगमुळे चळवळीत एक हिंसक वातावरण व तणाव नांदू लागतो. गुंडांना पोलिसांपासून त्रास होतो; पण हेच गुंड कार्यकर्ते बनले की पोलिसांपासून त्यांची सुटका होते व त्यांच्या गुन्हेगारीला रान मोकळे होते. पोलिसांचा त्रास वाचावा म्हणून दोन नंबर धंदेवाले कार्यकर्त्यांना हाताशी धरतात. चळवळीच्या कार्यक्रमांना पैसा पुरवतात. पत्रके छापणे, मंडप घालणे, देणगी देणे अशा प्रकारे पैसा पुरवून ही मंडळी जाहीर कार्यक्रमांतून समाजात वावरतात, प्रतिष्ठा पावतात. ही मंडळी आपल्याला हवा असलेलाच कार्यकर्ता जवळ करतात व त्याला पैसा देतात.

संस्थानिक कार्यकर्त्यांचा एक संच नव्याने पुढे येत आहे. ही मंडळी समाजसेवा एक व्यवसाय म्हणून स्वीकारत आहेत. शासकीय योजना राववणं, अनुदान मिळवणं, परकीय पैसा पदरात पाडून घेणे, अशा प्रकारे पैसा मिळवणारा एक नवाच कार्यकर्ता प्रस्थापित होत आहे. ' मिळवणं ' व ' मिरवणं ' हा याचा हेतू असतो. चळवळी रजिस्टर करून, कार्यालये थाटून यांचा समाजसेवेचा रचनात्मक उद्योग चालू असतो.

या सर्वांनाच कार्यकर्ता म्हणता येईल ?

आजचं सामाजिक जीवन खूपच गुंतागुंतीचं झालं आहे. सर्व प्रश्न राजकारणाशी निगडित आहेत; त्यामुळे आपले प्रश्न धसास लावण्याची नवीनच रीत पुढे येत आहे. सत्याग्रह, उपोषण ही हत्यारे आता बोथट झाली आहेत. घेराओ, निदर्शने, रस्ता रोको, अधिकाऱ्यांना पळवणे, दगडफेक करणे, सक्तीने बंद पाळावयास लावणे, आक्रमक भाषणे, आत्मदहन अशा पद्धतींनी चळवळी वाढत आहेत. सर्वच पातळींवर आक्रमक आक्रोश व तणावपूर्वक संताप वाढत चालला आहे. संसदीय चौकटीत आपले प्रश्न सुटू शकत नाहीत. असंसदीय मार्गानेच आपले प्रश्न सोडवले पाहिजेत, ही भावना उत्तरोत्तर वाढत आहे. दलित चळवळ मात्र मोर्च्याच्या माध्यमातूनच आपले प्रश्न मांडते आहे, हे लक्षात घेतले पाहिजे.

दलित कार्यकर्त्यांतही दोन प्रकारचे कार्यकर्ते आहेत. एक पांढरपेशा तर दुसरा अल्पशिक्षित असा. सुशिक्षित कार्यकर्त्यांची नेहमीच समन्वयाची भूमिका असते. खरं तर उच्च शिक्षित माणूस कार्यकर्ता अपवादानेच होताना दिसतोय. ज्यांना नोकरी मिळत नाही, जे बेकार आहेत तेच चळवळीत पडत आहेत. सामान्य कार्यकर्ता एका आत्यंतिक ओढीनं चळवळीत स्वतःला झोकून देतो. हा त्याचा उमेदीचा काळ असतो; त्याची नेतृत्वावर निष्ठा असते; पण खूप काळ गेल्यानंतर त्याला आपण वापरले गेलो आहोत, याची जाणीव होते.

निवडणुकीपुरते काही कार्यकर्ते निर्माण होतात. ते कार्यकर्ते असण्यापेक्षा पगारी नोकरच म्हणून वावरतात. हा त्यांचा कमवण्याचा काळ असतो. सरळ सरळ मतांचा लिलाव होतो. आपला वेळ, पैसा आणि कार्य भांडवलासारखं चळवळीत गुंतवून पुढे याचा फायदा कसा करून घेता येईल, असा विचार करणारेही कार्यकर्ते आहेत. ते लांबचा विचार करून आपली स्ट्रॅटेजी आखतात. त्यांच्याकडे कामाचे नियोजन असते. कार्यकर्ते वापरण्याची कला असते.

समाज कार्यकर्त्यांकडे उपेक्षेनेच पाहतो. ज्या कार्यकर्त्यांकडे फोन, बंगला व गाडी आहे, त्याच्यामागे समाज जातो. जो रोज भेटतो, जो त्यांची कामं करतो असा

कार्यकर्ता त्यांना पटत नाही.ज्या समाजाचं काम कार्यकर्ता करीत असतो तो समाजच त्याला जवळ करीत नाही. राजकीय कार्यकर्त्यांशिवाय इतर सामान्य कार्यकर्त्याला काम करणं म्हणूनच अवघड होतं. सामान्य कार्यकर्त्याची कुचंबणा होते. शासन–दरबारी त्याचे काम होत नाही. काही कार्यकर्ते याला अपवाद होऊ शकतील; पण सामान्य कार्यकर्त्यांचं काय ? काही कार्यकर्ते प्रसिद्धी व प्रतिष्ठेसाठी चळवळीत येतात.

कार्यकर्त्याला उपजीविकेची हमी नसते तरी तो काम करीत असतो. तो सबंध आयुष्य जाळतो, पण त्याला त्या मोबदल्यात काहीच मिळत नाही. उलट अशा कार्यकर्त्याला संपवण्याचीच व्यापक मोहीम सदैव सुरू असते. नव्या कार्यकर्त्याच्या सामाजिक जीवनाचा खून केला जातो. त्याला आयुष्यातून उठवण्याचा प्रयत्न हितसंबंधी कार्यकर्ते करीत असतात. एखाद्या कार्यकर्त्याचे शासकीय काम न होऊ देणे, त्याची बदनामी करणे, तो चारित्र्यहीन आहे, भ्रष्टाचारी आहे, आपल्या विचाराचा नाही अशा पद्धतीचा अपप्रचार केला जातो. एखादा कार्यकर्ता शारीरिक-दृष्ट्या कमकुवत असेल तर त्याच्याशी दादागिरी करून त्याला हुसकावले जाते. त्याच्या उपजीविकेच्या साधनांवर हल्ला केला जातो. वरच्या नेत्यांचे त्याच्या विरोधात कान भरले जातात. कार्यकर्त्याला कार्यक्रमाच्या सूचना न देणे, त्याला भाषण न करू देणे, त्याचे नाव प्रसिद्धीस न देणे असेही प्रकार केले जातात; यामुळे नवा कार्यकर्ता निर्माण होऊ शकत नाही, नव्याची कोंडी केली जाते. त्याला संधी दिली जात नाही. त्याच्यावर वैचारिक दादागिरी करून त्याला दडपले जाते.

नवा येणारा कार्यकर्ता तरुण असतो. त्याच्याकडे संघर्ष करण्याची धमक असते. त्याच्या हाती नेतृत्व जाऊ नये म्हणून जुना कार्यकर्ता काळजी घेत असतो. नव्या उगवणाऱ्या नेतृत्वाकांक्षी कार्यकर्त्यांपासून इतर कार्यकर्त्यांना तोडले जाते व त्याला एकाकी पाडले जाते.

दलित चळवळीतला कार्यकर्ता सवर्ण पुरोगामी संघटनेत मान्य केला जात नाही. त्याच्याकडे नेतृत्व दिले जात नाही. त्याला दुय्यम ठेवले जाते. त्याला तोंडी लावायला वापरले जाते. त्याच्या कार्याचा वापर करून घेतला जातो. त्याची आंबेडकरनिष्ठा त्यांना सलत असते. पुरोगामी मंडळी गांधी, लोहिया, जयप्रकाश व नेहरूंचा विचार मांडत असतात. घरातलं सनातन वास्तव त्यांनी राखलेलं असतं. सत्यनारायणाची पूजा, गृहशांती, व्रतवैकल्ये, पूजाअर्चा चालूच असते. घरात शंकराचार्यांचा कायदा चालू असतो. घराबाहेर पुरोगामी विचार घेऊन ही मंडळी वावरतात. स्वतःच्या घराचा, समाजाचा बदल करणे यांना अशक्य असते; पण हे दलित उद्धाराची भाषा बोलत असतात. अशा कार्यकर्त्यांबरोबर काम करताना

दलित कार्यकर्त्यांची खूप गोची होती. त्याची जात त्याला सदैव गतिरोधक ठरत असते. दलित कार्यकर्त्याला पद्धतशीर टाळलं जातं.

चळवळी जगण्याचं साधन बनत आहेत. कार्यकर्ता चळवळीबाहेर फेकला गेला की त्याची ससेहोलपट होते. तो चळवळीत व आघाडीवर राहण्याचा प्रयत्न करतो. नेतृत्व टिकविण्याचा प्रयत्न करतो. आपल्या नेतृत्वाचा उपयोग तो वैयक्तिक स्वार्थासाठी करतो. पोलिसांकडून पैसे घेणे, रेशन दुकानदाराकडून पैसे मिळविणे, पोलीस केसमध्ये तडजोड घडवून पैसे खाणे, एखाद्याचे काम करण्यासाठी पैसे घेणे असे प्रकार रूढ होतात.

कार्यकर्त्यांना पैशाची अत्यंत गरज असते. सारी सोंगं करता येतात; पण पैशाचं सोंग करता येत नाही. कार्यकर्ता पैशाशिवाय काम करू शकत नाही. घरचं खाऊन तो लष्कराच्या भाकरी भाजत असतो. त्याला रिक्षाभाडे, पत्रव्यवहार, स्टॅम्प, टायपिंगचा खर्च हा दिलाच पाहिजे. त्याचे शोषण होऊ नये. त्याचा उत्साह, उमेद वापरली जाऊ नये. तो आपला नोकर नाही याची जाणीव सतत असली पाहिजे. कार्यकर्त्यानेही सेवाभावानेच काम केले पाहिजे. एखाद्याला अडवून धरू नये. कार्यकर्ता कामासाठी पैसा मागू लागला की गरजू व्यक्ती जो कमी पैशात काम करील त्याच्याकडे धाव घेते.

कार्यकर्त्याने इतर कार्यक्रमांचे व कार्यकर्त्यांचे निरीक्षण केले पाहिजे. सतत आत्मपरीक्षण केले पाहिजे व आपल्या कार्याची पद्धती ठरवली पाहिजे, तरच त्याच्या नेतृत्वगुणाचा विकास शक्य आहे. इतरांचे निरीक्षण, आत्मपरीक्षण व वाचन, चर्चा, चिंतन यांमुळे कार्यकर्त्याचा व्यक्तिमत्त्व विकास आपोआप होतो.

कार्यकर्ता जसा वस्तीत राहणारा असतो तसा वस्तीबाहेरून येणाराही असतो. वस्तीत राहणाऱ्या कार्यकर्त्याला लोकांच्या दैनंदिन समस्यांना नेहमीच सामोरं जावं लागतं. त्यामुळे एक पक्ष दुखावतो व एक पक्ष सुखावतो. दुखावला पक्ष कार्यकर्त्याच्या विरोधात प्रचार करतो. त्याला बदनाम करतो. वस्तीबाहेरून येणाऱ्या कार्यकर्त्याला याचा उपसर्ग पोहोचत नाही; पण समाजात राहणाऱ्या कार्यकर्त्याला चोवीस तास वेठबिगारासारखे काम करावे लागते. नळावरची भांडणं असोत की नवरा–बायकोची तक्रार असो, अशा प्रकरणांतही कार्यकर्त्याला भाग घ्यावा लागतो.

एखादा प्रश्न आपल्याकडे आला तर तत्काळ निर्णय घेऊ नये. भावनाविवश होऊ नये. प्रश्न घेऊन येणारी व्यक्ती खोटी असू शकते. ती ज्या भागातून आली त्या भागातल्या आपल्या कार्यकर्त्याशी संपर्क साधून सदर प्रश्नाची सविस्तर माहिती मिळवली पाहिजे. त्या भागात आपला कार्यकर्ता नसेल तर चारचौघांचा सल्ला घेतला पाहिजे. दोन्ही पक्षांचं ऐकून घेतलं पाहिजे. मगच पुढच्या कृतीचा योग्य

निर्णय घ्यावा. हा निर्णय घेतानादेखील आपल्या सहकारी कार्यकर्त्यांचा विचार घ्यावा. तो एकटयाचा निर्णय होऊ नये, याची काळजी घ्यावी. एकदा निर्णय घेतला की तो लावून धरला पाहिजे.

लोकांचे प्रश्न एकदम पोलीस चौकीत घेऊन जाऊ नयेत. ते स्थानिक पातळीवर मिटवणे खूप हिताचे असते. प्रश्न जर स्थानिक पातळीवर मिटत नसेल तरच पोलिसांच्या हवाली करावा. प्रश्नाच्या स्वरूपावरून त्याच्या सोडवणुकीचा मार्ग ठरवता येतो. त्यासाठी प्रश्न व प्रश्नाच्या परिणामांचा अभ्यास केला पाहिजे.

प्रश्न सुटो वा न सुटो, काही काळच लोकांना बरे वाटत असते. नंतर सर्वसामान्य जनता चळवळींना विसरून जाते, चळवळींचा विचार ते स्वीकारत नाहीत. पूर्ण समाज चळवळमय होत नाही. जो आपले प्रश्न सोडवील त्याच्यामागे समाज धावतो. कुठल्याही प्रश्नांना काही ना काही सोल्युशन असतेच. किमान समाधान तरी पदरी पडते, हे नाकारता येत नाही.

कार्यकर्ता लोकांना गुंड म्हणून हवा असतो.
कार्यकर्ता लोकांना नोकर म्हणून हवा असतो.
कार्यकर्ता लोकांना पुढारी म्हणून हवा असतो.
कार्यकर्ता लोकांना मध्यस्थ म्हणून हवा असतो.
कार्यकर्ता लोकांना मित्र म्हणून हवा असतो.

कार्यकर्ते पूर्णवेळ काम करणारे असतात तसे अर्धवेळ काम करणारेही असतात. आपली नोकरी, धंदा, व्यवसाय व घर सांभाळून काम करणाऱ्यांची पूर्णवेळ कार्यकर्त्यांकडून टर उडवली जाते. पूर्णवेळ कार्यकर्ता स्वतःला ' हिरो ' ठरवत असतो.

सार्वजनिक जीवनात चारित्र्याइतकाच चहा महत्त्वाचा आहे. चहा हे सर्वसामान्य जनतेचं पेय आहे. रांगेतल्या शेवटच्या माणसाच्या आदराचे ते प्रतीक आहे. आपण त्याचा चहा घेतला नाही तर त्याच्यात मिसळू शकत नाही. ज्या समाजात काम करावयाचे त्याची भाषा वेगळी असेल तर प्रॉब्लेम निर्माण होतात; पण भाषेपेक्षा प्रश्न महत्त्वाचे असतात, वेदना महत्त्वाची असते. त्यामुळे ग्रास रूट लेव्हलवर काम करताना इतके अवघड जात नाही. फिल्डवर्क करताना मदत करणारे आपोआप भेटतात. त्यासाठी आपली वृत्ती माणूससंग्रहाची, आपलेपणाची असली पाहिजे. अशा समाजात येणारी माणसं एकतर पैसा जमा करायला येतात किंवा पैसे द्यायला येतात तेव्हा ' आम्हाला काय देणार ?' 'तुम्हाला किती पैसे मिळतात?' असे प्रश्न प्रत्येकाच्या नजरांनी विचारलेले असतात. त्यांना विश्वासात घ्यावे लागते. त्यांच्यात आत्मविश्वास निर्माण करावा लागतो. त्यांच्या पाठीशी उभे राहावे लागते. कार्यकर्त्यांत जरूर स्पर्धा असावी. या स्पर्धेतून चांगले व्हावे; पण स्पर्धा सदोष होते

आहे. अशा स्पर्धेत कार्यकर्त्यांपेक्षा समाजाचेच जास्त नुकसान होते.

महिला कार्यकर्त्यांचे शोषण केले जाते. 'कार्यकर्ता' म्हणून तिचे स्वतंत्र व्यक्तिमत्त्व फुलू दिले जात नाही. ती कायम आपल्या पाठीमागे कशी राहील, याचाच विचार केला जातो. ती सुज्ञ झाली तर इतरांच्या पाठी लागेल हा अविश्वास असतो. समाजकार्य करणाऱ्या स्त्रियांची घरातून व चळवळीतूनही मुस्कटदाबी केली जाते. केवळ स्त्रीचा उत्साह व श्रम यांचा खुबीने वापर करून घेतला जातो. स्त्री–कार्यकर्ती चळवळीत काम करताना एखाद्या समविचारी कार्यकर्त्याशी अधिक बोलू लागते, म्हणून तिच्या चारित्र्यावर संशय व्यक्त केला जातो. नवे नवे कार्यकर्ते निर्माण होणे हे चळवळ जिवंत ठेवण्यासाठी गरजेचे आहे. सर्वत्र एकटचाने फिरणे अवघड असते. एकखांबी तंबू केव्हाही कोसळू शकतो. नेता संपला की चळवळ संपू नये. नेतृत्व ठराविक काळानंतर फिरतं असावं. ती एकाची मक्तेदारी होऊ नये. कार्यकर्त्यांचं जाळं तळागाळापर्यंत विणलेलं असावं, तरच चळवळ टिकते.

आजचा कार्यकर्ता नव्यानव्या प्रश्नांचा शोध घेत नाही. लोकच त्याच्याकडे आपले प्रश्न घेऊन येतात. कार्यकर्ता केवळ निवेदने देणे व वर्तमानपत्रात बातम्या प्रसिद्ध करणे एवढ्यातच धन्यता मानत आहे. बातम्यांसाठी तो काम करू लागला. निवेदन व बातम्या टाईप करणे हा त्याचा एक कलमी कार्यक्रम बनतो. स्टंट करण्यासाठी काही धडाकेबाज कार्यक्रम घेतले जातात. यातून केवळ धूळ उडते, प्रश्न तसेच राहतात.

कार्यकर्त्याची पत्नी मिळवती असावी. तिने आपल्या नवऱ्याची समाजसेवा खुल्या दिल्याने स्वीकारावी. एखाद्या कार्यकर्त्याला त्याच्या कुटुंबाने जगवावे. त्याच्या ऐतखाऊपणावर टोमणे मारू नयेत, तरच कार्यकर्ता जोमाने कार्य करू शकतो. कार्यकर्त्याला खासगी जीवन नसते, तो कुटुंबावर व स्वतःवर अन्यायच करीत असतो.

खरा कार्यकर्ता कधी एकटा पडत नाही. कार्यकर्त्याने नवे कार्यकर्ते निर्माण केले पाहिजेत. सिगारेट आण, दारू आण, चहा सांगून ये ही कामे सामाजिक नाहीत. अशी कामं ज्यांची त्यांनीच केली पाहिजेत. अशा कामांसाठी कार्यकर्त्याला वापरू नये. कार्यकर्त्याच्या जीवनात विसंगती असू नये. कार्यकर्ता हा घरात कार्यकर्ता नसतो. तो समाजाचं प्रबोधन करतो, पण घराचं नाही. बाहेर समतेची भाषा बोलतो; पण घरात इतरांना समता नाकारतो.

कार्यकर्ता व नेता यांचे संबंध तात्त्विक व सैद्धांतिक पातळीवरचे असावेत. जर हे संबंध व्यक्तिगत झाले तर व्यक्तिपूजा बळावते व एकखांबी नेतृत्व निर्माण होते. सर्व कार्यकर्त्यांना मान्य होणारे नेतृत्व असावे. चळवळीची समग्र अभिव्यक्ती

असणारं नेतृत्व हवं. चळवळ व कार्यकर्त्यांचं नातं एका व्यापक कुटुंबाप्रमाणे असावं; पण त्यात व्यक्तिनिष्ठा असावी. कार्यकर्ता व नेता यांत सतत संवाद असावा नाहीतर कार्यकर्त्यांत गैरसमज होतात, त्यांची नाळ तुटते.

राजकीय कार्यकर्ता व सामाजिक कार्यकर्ता यांच्या महत्त्वाकांक्षा आणि हेतू यांत खूप तफावत असते. समाजव्यवस्था बदलणारे कार्यकर्ते आपण समाजाचे देणे लागतो म्हणून काम करताना, तर राजकीय कार्यकर्ते चळवळी व संस्था यांना आपल्या हितासाठी व हेतूसाठी वापरत असतात. त्यांचं काम व्यापारी तत्त्वावर चाललेलं असतं. कार्यकर्ता सामाजिक प्रश्नांपेक्षा वैयक्तिक प्रश्नांना महत्त्व देऊ लागला की तो वाईट मार्गाला लागतो. कार्यकर्ता सुखवस्तू बनतो. त्याचा सामाजिक स्तर बदलला की तो आपल्या मर्यादा सांगू लागतो. त्याची कार्यकर्त्याची परिभाषा पूर्णपणे बदलते. ती त्याच्या सोयीची असते.

कार्यकर्त्याच्या मनात जेव्हा नेतृत्वाचा अंकुर फुटतो तेव्हा स्पर्धेला सुरुवात होते. कार्यकर्त्याची बांधिलकी हीच त्याची योग्यता असते. कार्यकर्त्याची पूर्ण बुद्धी, जिद्द, त्याची ऊर्मी चळवळीत पूर्णपणे वापरली जात नाही. कार्यकर्त्यांचा तात्कालिक व अंशतःच वापर करून घेतला जातो. कार्यकर्त्याचा उत्साह व उमेद तशीच वाया जाते. दूरगामी विचार करून कार्यकर्त्याला घडवलं जात नाही. यासाठी वर्कशॉप घेतला जात नाही. यासाठी योग्य व निर्णायक दिशेने कार्यक्रम राबविले पाहिजेत. प्रश्नाचा चिकाटीने पाठपुरावा केला पाहिजे. विचार व कार्यावर निष्ठा आहे; पण त्या प्रमाणात प्रतिसाद मिळत नसेल तर कार्यकर्त्यांत नाउमेद, निरुत्साह व निराशा पसरू शकते. हे फ्रस्ट्रेशन टाळणं महत्त्वाचं आहे.

कार्यकर्त्याला अंधारात ठेवून नेता जेव्हा निर्णय घेऊ लागतो तेव्हा चळवळीत अविश्वासाचं नातं निर्माण होतं. नेता जेव्हा कार्यकर्त्याला टाळू लागतो तेव्हा तो कार्यकर्ता खचू लागतो. त्याला असं तोडणं म्हणजे त्याला सार्वजनिक जीवनातून एक प्रकारे उठवणेच असते. सौद्यात अडकलेला नेता कुठलेही प्रश्न ताकदीने धसास लावू शकत नाही; कारण त्यात त्याचे हितसंबंध गुंतलेले असतात; पण निर्भय, निःस्वार्थी व निःस्पृह कार्यकर्ता प्रश्न धसास लावू शकतो आणि त्याच्यात व नेतृत्वात दरी वाढू लागते. कार्यकर्ता जर चळवळविरोधी असेल तर त्याला गुन्हेगार ठरवले जावे; पण वैयक्तिक हेवादाव्यातून त्याला बदनाम करू नये. गुन्हेगारांना चळवळीने प्रतिष्ठा देऊ नये; कारण यामुळे चळवळ बदनाम होण्याचा धोका असतो. संघटना, ऐक्य, विचार व कार्याशी फारकत झाली की कार्यकर्ता अप्रामाणिक बनतो. तो सर्वच पातळींवर भ्रष्ट ठरतो. त्याची सामाजिक उंची वाढली की तो चळवळीचा ठेकेदार बनतो. फुले–आंबेडकरांच्या नावाने शोषण सुरू करतो.

कार्यकर्त्याची सतत तळातल्या लोकांशी बांधिलकी असायला हवी. त्या

लोकांशी त्याचे नाते बरोबरीचे असावे. त्यांच्याशी वागताना, बोलताना साहेबी थाट नसावा. आपण ज्या लोकांचे प्रतिनिधी म्हणवून घेतो, त्यांच्यात व आपल्यात अंतर पडता कामा नये. सामान्य माणसाला सदैव समजून घेण्याची तत्परता असावी तरच लोकांशी असलेली नाळ तुटणार नाही. बुद्धी आणि मनाला जर समाजकार्य पटलेलं असेल तर तो कार्यकर्ता माघार घेत नाही. कार्यकर्ता मनाने व विचाराने पूर्ण तयार झालेला असावा.

स्वतःच्या हितसंबंधासाठी लढणे म्हणजे चळवळ नव्हे. दुसऱ्यासाठी लढणे म्हणजेच बांधिलकी होय. सर्वोच्च त्यागाला कार्यकर्त्याने सदैव तयार असायला हवे. कातडीबचावू धोरण असणारा कार्यकर्ता असू शकत नाही. कार्यकर्त्याच्या मनात सतत विचार करण्याची प्रक्रिया सुरू असायला हवी. त्याची बुद्धी सतत जागृत असायला हवी. तो सतत अन्यायात हस्तक्षेप करणारा असावा. तो उघड्या डोळ्यांनी दुसऱ्याचे शोषण पाहू शकत नाही. दुसऱ्यासाठी जगणे हे त्याचे आयुष्य असते. विचार, नेतृत्व, प्रश्न व साधने ही कार्यकर्त्यांना शक्ती देणारी चेतनाकेंद्रे असतात.

ज्या कार्यकर्त्यावर एक-दोन पोलीस केसेस होत नाहीत, जो दहावीस वेळा तुरुंगात जात नाही, जो दहापाच आंदोलनांत भाग घेत नाही, तो कार्यकर्ता म्हणून गणला जात नाही. कार्यकर्ता एकदा तुरुंगात गेला की मग त्याला निवृत्ती नाही. त्याला सदैव चळवळीत राहून लढावे लागते. तो पोलिसांच्या ब्लॅक लिस्टला जातो.

संघटना चालवणे एक शास्त्र आहे. बैठका बोलावणं, अजेंडा ठरवणं, सर्क्युलर्स काढणं, प्रोसीडिंग लिहिणं, बातम्या तयार करणं, निवेदन तयार करणं, पत्राचं ड्राफ्टिंग करणं, पॉईन्टस घेणं, कामाच्या नोटस् ठेवणं, डायरी बाळगणं, पत्त्यांची व फोनची यादी जवळ ठेवणं, कामाची नोंद ठेवणं, वेळा पाळणं, वेळा देणं, भेटणं, चर्चा करणं, सल्ला देणं–घेणं, चळवळीची व कार्यकर्त्यांची काही खासगी रहस्यं जोपासणं, कामातला चोख व प्रामाणिकपणा, स्वभावातली मैत्री व स्पष्टपणा, खोटी आश्वासने न देणं, थापा व लंब्याचवड्या वल्गना न करणं, अडीअडचणीला मदत करणं, सहानुभूती, क्षमा व संयम ही वृत्ती अंगी असणं या बाबी चळवळ व कार्यकर्त्याला स्थिर व धैर्य देणाऱ्या आहेत. बैठकीत कोण काय बोलतो, कसा बोलतो, याकडे सतत लक्ष असले पाहिजे. हॉटेल्स हे चळवळीचे अड्डे बनू नयेत. पार्टीपेक्षा प्रश्नात रस असावा.

चळवळीसाठी निधी जमवणं हे फार महत्त्वाचं काम असतं. लोक खुल्या दिलाने पैसे देतात. हे पैसे चळवळीपेक्षा कार्यकर्त्यांच्या प्रतिमेला पाहून देतात. त्यांचा कार्यकर्त्यावर विश्वास असतो. लोक निष्ठेने पैसे देतात. ज्या कारणासाठी

पैसा गोळा केलेला असतो, त्याच कारणासाठी पैसा खर्च केला पाहिजे. पैशाच्या व्यवहारात गोंधळ झाला तर लोकांचा विश्वास संपतो. लोक पुनःपुन्हा फसत नाहीत. ' तुम्ही धंदा मांडला आहे ' असं सुनवायला कमी करीत नाहीत.

सार्वजनिक पैशाचा हिशेब ठेवणे हे चळवळ व समाजाच्या दृष्टीने महत्त्वाचे असते. निधी उत्सवासाठी जमा केला जातो. निधीचा योग्य विनियोग न करता मंडप, लाऊडस्पीकर, रोषणाई यांत पैसा खर्च केला जातो. यापेक्षा व्याख्याने, परिसंवाद, शिबिरे व स्पर्धा भरवून वेगळा कार्यक्रम देता येतो. जयंतीच्या नावावर पैसे उकळले जातात. त्यात गैरप्रकार होतो. याचा चळवळीवर वाईट परिणाम होतो. निर्ढावलेले कार्यकर्ते हिशेब ठेवत नाहीत, हिशेब देत नाहीत. त्यामुळे इतर कार्यकर्त्यांची पुढे गोची होते. वर्गणी देणाऱ्याला हिशेब विचारण्याचा हक्क आहे. केवळ उत्सवप्रसंगी जमा करण्यापेक्षा सभासद वर्गणी जमा करावी. वर्गणी देणाऱ्यानेही विधायक दृष्टिकोन ठेवावा. निमूटपणे पैसे देऊ नयेत. निधीतून रचनात्मक कार्य उभे करता येते, हे कुणाच्या लक्षात येत नाही.

कार्यकर्त्याला बदनाम करणारी एक टोळी असते. जो टीकेला भीत नाही, तोच पाय रोवून उभा राहू शकतो. हळवा असेल तर दूर जाऊ शकतो. त्यामुळे चळवळीची हानी होते. समाजात काम करायचे म्हटले की हार व प्रहार स्वीकारण्याची तयारी ठेवावी लागते. ही कसोटी असते. आव्हाने असल्याशिवाय उभं राहण्यातही मजा नसते. निर्णयाचे परिणाम भोगण्याची तयारी ठेवूनच काम केले पाहिजे. टीका झाल्याशिवाय आपली परीक्षा आपल्याला घेता येत नाही.


प्रत्येक निवडणूक काही कार्यकर्त्यांना बरबाद करण्यासाठीच येते. निवडणुकीच्या राजकारणात अनेक कार्यकर्त्यांचा बळी दिला जातो. निवडणुकीत नष्ट होणं ही अत्यंत वाईट घटना आहे. पैशासाठी मते देणारा समाज आपला खराखुरा प्रतिनिधी निवडून देऊ शकत नाही. लोकांसाठी आयुष्य झिजवणारा प्रामाणिक कार्यकर्ता निवडणुकीत हरतो व ज्याच्या सत्तर पिढ्या शोषणावर जगत असतात, तो निवडून येतो. खरा कार्यकर्ता बळीचा बकरा बनतो.

कार्यकर्त्यांचेही काही प्रश्न असू शकतात. त्याकडे दुर्लक्ष करता येत नाही. एखादा कार्यकर्ता त्याच्या व्यक्तिगत समस्येत जखडला असेल तर त्याला समजून घेणं गरजेचं आहे. त्याच्या अडीअडचणीतून तो वेळ काढून येतोय याची जाणीव असायला हवी. कार्यकर्त्याचा अवमान होईल असे वागणे, बोलणे बंद झाले पाहिजे. कार्यकर्त्यांमध्ये मैत्रीचे वातावरण असले पाहिजे. मेळावे, परिषदा, शिबिरे व सत्याग्रहातून कार्यकर्ते घडवले जावेत. सतत नव्या नव्या प्रश्नांचा शोध घेऊन चळवळ बळकट केली पाहिजे. कार्यकर्त्याने कुठेही जाताना एकटे जाऊ नये. चार कार्यकर्त्यांना

सोबत घेऊन गेले पाहिजे. एकट्याने फिरणे, एकट्याने गाठीभेटी घेणे टाळले पाहिजे. चार कार्यकर्ते एकत्र असले की गैरसमज होत नाही. चार कार्यकर्ते एकत्र असले की त्यांचे शिक्षण होते. कुठे कसे वागावे, बोलावे हे त्यांना कळते.

कार्यकर्ता म्हणजे यंत्रमानव नाही. तोही माणूस आहे. त्याच्या हातूनही चुका घडू शकतात. समाजाने कार्यकर्त्याकडे उदार दृष्टीने पाहिले पाहिजे. पाठीमागे निंदानालस्ती करण्यापेक्षा समक्ष बोलून प्रश्न सोडवून घ्यावेत. आपल्या चुका कबूल करण्याची प्रवृत्ती असावी. दुसऱ्यासाठी जगायचे असेल तर आधी स्वतःसाठी जगायला शिकले पाहिजे; कारण स्वतः जगल्याशिवाय दुसऱ्यासाठी जगता येत नाही; म्हणून कार्यकर्त्यांनी आहार व निद्रेत नियमितपणा आणावा.

कार्यकर्त्याच्या जीवनात अनेक वीण असतात. मी इथं मोकळेपणाने काही गोष्टी मांडल्या आहेत. कार्यकर्त्यातील भल्याबुऱ्याची सूची मी इथे दिली आहे. हे लिहिताना सर्वच कार्यकर्ते डोळ्यांपुढे ठेवले आहेत. हे माझे वैयक्तिक मत आहे. ते एकांगीही असू शकते; पण या मताचीही दखल घेतली जावी, ही प्रामाणिक इच्छा आहे.



श्री. रमेशभाई खंडागळे आणि श्री. प्रकाश बन्सोड यांच्या पत्रांतली मानसिकता व मागणी एकच आहे. मीही एक कार्यकर्ता–मित्र म्हणून त्यांना लिहिण्याचं ठरवलं आणि त्यातूनच पत्राऐवजी पुस्तक पूर्ण झालं.

दलित पँथर ही तरुण रक्ताची संघटना आहे. दलित पँथर्सनी वादळासारखे अहोरात्र काम केले आहे. घरावर राख उडत असताना, भविष्याची कुठलीच हमी नसताना पँथर्स चळवळीत काम करीत आहेत. कुटुंबांना भोगाव्या लागणाऱ्या अडचणी, जुलूम व शोषण यांचा वाटा कार्यकर्त्यांनाही उचलावा लागतो. तेव्हा याही बाबीकडे समाजाने सहानुभूतिपूर्वक पाहिले पाहिजे.